आंतरवर्ग प्रशिक्षण

(सुधारित अभ्यासक्रमानुसार)

विषय क्र. : ३

भाग : ब

# भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क

## Indian Constitution and Human Rights

(तृतीय आवृत्ती : सन २०१५)

महाराष्ट्र पोलीस अकॅडमी,

नाशिक

# प्रस्तावना

भारतीय संविधान २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आले. संविधानाचा सर्वात महत्त्वाचा व वैश्विक मानव अधिकारांना प्रतिबिंबित करणारा भाग मूलभूत अधिकारांमध्ये सामावलेला आहे. संविधानाने या अधिकारांचे जतन व संवर्धन करण्यासाठी कार्यान्वित करण्यासाठी विविध यंत्रणांची - जसे न्यायपालिका, कार्यपालिका व प्रशासकीय व्यवस्था यांची-निर्मिती केली आहे.

संविधानामधील मूलभूत अधिकारांमध्ये सर्वांना कायद्यासमोर समानता, विनाकारण अटक न करणे, विचार अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटना स्थापणे, शांततापूर्णरीत्या एकत्र येणे, देशातील कुठल्याही भागात संचार स्वातंत्र्य, स्वेच्छेने कुठलाही धर्म पाळण्याचे किंवा न पाळण्याचे स्वातंत्र्य, विकासाच्या संधी व दर्जाच्या समानतेचा समावेश होतो आणि याच बाबी मानव अधिकारांच्या व्याप्तीतही येतात. सर्व जगभर हा विचार मान्य करण्यात आलेला असून, विविध राष्ट्रांनी त्या दृष्टीने उपाययोजना केल्या आहेत.

मानवी अधिकारांच्या उल्लंघनाबाबत सुयोग्य कार्यवाही करण्यासाठी स्वतंत्र व परिपूर्ण यंत्रणा आवश्यक असल्याचे लक्षात आल्यावरून भारत शासनाने १९९३ मध्ये मानवी हक्कांच्या संबंधात एक अध्यादेश जारी केला व नंतर संसदेच्या मान्यतेने या अध्यादेशाला अधिनियमाचे स्वरूप दिले. या सर्व बाबी तसेच मानवी हक्कांचा जाहीरनामा, बालविकास, महिला विकास, आदिवासी समाजाचा विकास, सामाजिकदृष्ट्या वंचित वर्गाचा विकास इत्यादीबाबत या पुस्तिकेत परामर्श घेतला आहे.

संविधान तसेच मानवी हक्कांचे संरक्षण याबाबत आवश्यक माहिति प्राप्त करून देणारी ही पुस्तिका पोलीस अधिकारी, प्रशिक्षणार्थी तसेच तत्सम विभांगाकरिता उपयुक्त असून त्या दृष्टीने अतिशय सोप्या भाषेत मराठीत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आपल्याला निश्चित आवडेल, अशी आशा आहे. या पुस्तिकेच्या भागांत भारतीय पुरावा कायदा, १८७२ चे मराठी रूपांतर प्रशिक्षणार्थींना उपलब्ध करून देण्यात आले आहे.

सदरील पुस्तिका ही प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना कायद्याचे सखोल, तंत्रशुद्ध ज्ञान व्हावे याकरिता महाराष्ट्र पोलीस अकादमीचे संचालक श्री. संजय बर्वे, भा.पो.से. यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासक्रम सुधारणा समितीच्या सूचनांनुसार बनविण्यात आली असून उपसंचालक, डॉ. निखिल गुप्ता, भा.पो.से., पोलीस अधीक्षक (प्रशि.); श्री. सुनिल फुलारी व पोलीस अधीक्षक (प्रशा.) श्री. संजय पाटील यांनी या कार्यात सहभाग घेतला. भारतीय संविधान आणि मानवी हक्क विषय क्रमांक - ३ (भाग ब) पुस्तिकेचे कामामध्ये विधी निदेशक ॲड. विजय सुभेदार, ॲड. संजय पाटील यांनी सतत परिश्रम घेऊन संकलन केले आहे.

सदर पुस्तिकेत काही त्रुटी राहिल्यास व त्याबाबतच्या सूचना आल्यास त्यांचा निश्चितच विचार केला जाईल.

**संजय बर्वे**
संचालक,
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

दिनांक : १५/१०/२०१२

# मनोगत

''**भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क**'' या पुस्तकाची प्रस्तुत तृतीय आवृत्ती तयार करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे संशोधन व विश्लेषण प्रकल्प हाती घेण्यात आला होता. मूलभूत प्रशिक्षण आढावा कार्यक्रम ''Training Needs Analysis'' हा प्रकल्प सन २०१४-१५ दरम्यान पूर्ण करण्यात आला. या अंतर्गत पोलीस दलातील कार्यकारी शाखा, विविध विशेष शाखा यामध्ये कार्यरत विविध दर्जाचे अधिकारी व कर्मचारी, समाजातील सर्व घटकांतील नागरिकांचे प्रतिनिधी, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील प्रशिक्षणार्थी, मागील साधारणतः १० वर्षांच्या कालावधीत सर्वोत्कृष्ट ठरलेले प्रशिक्षणार्थी अधिकारी यांना आमंत्रित करून विविध चर्चासत्रे व मंथन बैठकी आयोजित करण्यात आल्या होत्या. या चर्चासत्रात महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील मूलभूत प्रशिक्षण पद्धती व अभ्यासक्रम यात बदल करण्याची आवश्यकता आहे का? बदल करायचा असल्यास कशाप्रकारे? याबाबत सर्वांचे अभिप्राय नोंदवून घेण्यात आले होते. त्याअनुषंगाने अभ्यासक्रमात बदल करण्यात येऊन संबंधित विषयांचे पुस्तकांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. अशाप्रकारे आवश्यक बदल अंतर्भूत करून ही आवृत्ती प्रकाशित करण्यात आली आहे.

''**भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क**'' हे पुस्तक प्रशिक्षणार्थी यांना त्यांच्या विषयाचे सुलभ भाषेत ज्ञान मिळावे, यादृष्टीने संचालक श्री. नवल बजाज यांच्या मार्गदर्शनाखाली सहसंचालक श्री. निरंजन वायंगणकर, उपसंचालक (प्रशिक्षण) व Training Needs Analysis समन्वयक श्री. सुनील ब. फुलारी, उपसंचालक व अभ्यासक्रम पुस्तक समिती अध्यक्ष श्रीमती उज्वला वनकर, उपसंचालक श्री. शिवराज पाटील, विधी निदेशक ॲड. व्ही. डी. सुभेदार यांनी सतत परिश्रम घेऊन या कार्यात सहभाग घेतला आहे.

या पुस्तिकेत काही त्रुटी आढळल्यास किंवा काही सुधारणा वाचकांना सुचवायच्या असल्यास तसे कळवावे, त्यावर निश्चितच विचार केला जाईल.

नाशिक
दि. १ एप्रिल, २०१५

**नवल बजाज**
संचालक,
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

# विषय क्रमांक - ३ (भाग - ब)

# भारतीय राज्यघटना

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| **१.** | **भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना –** | ९ |
| | १.० प्रस्तावना– | |
| | १.१ भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका | |
| | **१) महत्त्व** | |
| | २) उद्देशपत्रिकेमध्ये पुढील तीन गोष्टींचा विचार केलेला असतो. | |
| | ३) उद्देशपत्रिका | |
| | ४) उद्देशपत्रिकेचे विभाग | |
| | ५) भारताच्या संविधानातील उद्दिष्टे | |
| | ६) उद्देशपत्रिका हा संविधानाचा भाग आहे किंवा नाही | |
| **२.** | **प्रकरण २ : मूलभूत अधिकार –** | १४ |
| | २.० मूलभूत अधिकाराचा अर्थ | |
| | २.१ मूलभूत अधिकारांचे महत्त्व | |
| | २.२ भारतीय घटनेचे मान्य केलेले मूलभूत अधिकार | |
| | २.३ राज्य आणि कायदा या शब्दाचा अर्थ | |
| | १) कलम १२ व्याख्या (राज्य) | |
| | २) कलम १३ – मूलभूत हक्कांशी विसंगत असलेले अथवा त्यांचे न्यूनीकरण करणारे कायदे :– | |
| | २.४ मूलभूत अधिकार कलम १४ ते ३५ | |
| | **I) समतेचा अधिकार कलम १४ ते १८** | |
| | १) कलम १४. कायद्यापुढे समानता | |
| | अ) कायद्याबाबत समानतेचा नियम (Rule of Law) | |
| | ब) अपवाद | |
| | २) कलम १५. धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई | |
| | ३) कलम १६. सार्वजनिक सेवायोजनाच्या बाबींमध्ये समान संधी | |
| | ४) कलम १७. अस्पृश्यता नष्ट करणे | |
| | ५) कलम १८. किताब नष्ट करणे | |

**II) स्वातंत्र्याचा अधिकार, (कलम १९ ते २२)**

१ ) कलम १९. स्वातंत्र्याचा हक्क –

२) कलम २०. अपराधांबद्दलच्या दोषसिद्धीबाबत संरक्षण

३) कलम २१. जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण

✻ जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण यामधील इतर हक्कांचा समावेश

४) कलम २१. क. शिक्षणाचा हक्क

५) कलम २२. विवक्षित प्रकरणी अटक व स्थानबद्धता यापासून संरक्षण

**III) शोषणाविरुद्ध हक्क (कलम २३ ते २४)**

१) कलम २३. माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई

२) कलम २४. कारखाने इत्यादींमध्ये बालकांना कामाला ठेवण्यास मनाई

**IV) धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम २५ ते २८)**

१) कलम २५. सदसद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रचार

२) कलम २६. धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य

३) कलम २७. एखाद्या विशिष्ट धर्माच्या संवर्धनाकरिता कर देण्याबाबत स्वातंत्र्य

४) कलम २८. विवक्षित शैक्षणिक सस्थांत धार्मिक शिक्षण अथवा धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र्य

**V) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम २९ ते ३०)**

१) कलम २९. अल्पसंख्याक वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण

२) कलम ३०. अल्पसंख्याक वर्गाचा शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क

**VI ) संविधानिक उपाय योजण्याचा हक्क (कलम ३२ ते ३५)**

१) कलम ३२. या भागाने प्रदान केलेले हक्क बजावण्याकरिता उपाय

✻ घटनात्मक अधिकाराचे महत्त्व

✻ याचिका अर्ज (Writs)

१. बंदीप्रत्यक्षीकरण (Habeas Corpus)

२. परमादेश (Mandamus)

३. प्रतिषेध (Prohibition)

४. पृच्छा अधिकार (Quo-Warranto)

५. उत्प्रेक्षण (Certiorari)

२) कलम ३३. या भागाने प्रदान केलेले हक्क हे सेना, इत्यादींना लागू करताना, त्यामध्ये फेरबदल करण्याचा संसदेस अधिकार

**३. प्रकरण ३ : मूलभूत कर्तव्ये** **३०**

५१–क. मूलभूत कर्तव्ये

**४. प्रकरण ४ : संकीर्ण –** **३१**

I) पोलिसांबाबत असलेल्या हक्कांची मर्यादा

II) संसदेची सभागृहे आणि त्यांचे सदस्य व समित्या यांचे अधिकार विशेषाधिकार इत्यादी आणि राज्य विधानमंडळे व त्यांचे सदस्य यांचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती

III) संघराज्य आणि राज्ये यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सेवा

IV) सातवी अनुसूची

i) सूची एक – संघ सूची

ii) सूची दोन – राज्य सूची

iii) सूची तीन – समवर्ती सूची

# विषय क्रमांक - ३ (भाग - ब)

# मानवी हक्क

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| प्रकरण १ | **मानवी हक्कांची संकल्पना व त्याचे महत्त्व** | ४५ |
| | १) प्रस्तावना | |
| | २) हक्क म्हणजे काय? | |
| | ३) मानवी हक्कांची व्याख्या | |
| | ४) हक्कांच्या रक्षणाची जबाबदारी राज्यावर | |
| | ५) मानवी हक्कांची आवश्यकता | |
| | ६) मानवी हक्क सर्वांना समान | |
| प्रकरण २ | **मानवी हक्क सरंक्षण अधिनियम १९९३** | ४८ |
| प्रकरण ३ | **पीडीत व्यक्ती, तक्रारदार, साक्षीदार यांच्या मानवी हक्कासंदर्भातील महत्त्वपूर्ण न्यायनिर्णय व खात्याअंतर्गत मार्गदर्शक सूचना** | ५३ |
| | १) प्रस्तावना | |
| | २) विविध न्यायनिवड्यातील सर्वोच्च न्यायालयाने सांगितलेल्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत– | |
| | I) State of Haryana V. Bhajan Lal & Oth, AIR 1992 SC 604 | |
| | II) State of West Bengal V. Swapan Fumar Guha & Oth, 1982 SSC 561 | |
| | III) Anthony V. State of Kerala, 2001 SCC 181 | |
| | IV) Nandini Satpathy V. P. L. Dani, AIR 1978 SC 1025 | |
| | V) D. K. Basu V. State of West Bengal, AIR 1997 SC 610 | |
| | VI) Sheela Barse V. State of Maharashtra, 1983 SCC 96 | |
| | VII) Nilbati Behera V. State of Orissa, 1993 SCC 473 | |
| | VIII) मजदूर चेतना संघटना विरुद्ध मध्यप्रदेश सरकार – AIR 1995 SC 31 | |
| प्रकरण ४ | **राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे अनुसूचित जाती आणि जमाती, महिला, बालक व अल्पसंख्याक याबाबतचे कार्ये व अधिकार** | ५७ |
| | I) अनुसूचित जमाती व मानवी हक्क | |
| | II) अनुसूचित जाती व मानवी हक्क | |
| | III) महिला व मानवी हक्क | |

IV) बालविकास व मानवी हक्क

V) अल्पसंख्याक वर्ग व मानवी हक्क

**प्रकरण ५ पोलीस तपासासंबंधी हवालतीमधील गुन्ह्यांबाबत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या मार्गदर्शक सूचना :–** ७२

१) प्रस्तावना

२) पोलिसांची मुख्य कर्तव्ये –

३) मानवी हक्क संरक्षण व पोलिसांची भूमिका

४) मानवी हक्क जोपासनेसाठी वागणूक

**प्रकरण ६ मानवी हक्क संरक्षणाबाबत पोलिसांची भूमिका** ७४

**प्रकरण ७ मानवी हक्कांसंबंधात पोलिसांविरुद्ध असणाऱ्या तक्रारी** ७७

**प्रकरण ८ पोलीस मानवी हक्कांचे संरक्षण करणारे असल्याची प्रतिमा वाढीस लावण्याची आवश्यकता –** ७८


---

**संदर्भीय ग्रंथ (Reference Book)**


१) मानवी हक्क – प्रा. व्ही. बी. पाटील

२) मानवी हक्कसंरक्षण अधिनियम – श्री. नि. सबनीस

३) मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन – प्रवीण दीक्षित (IPS)

४) Human Rights And Policing - Commonwealth Human Rights Initiative (CHRI)

५) भारताचे संविधान – ॲड. के. टी. शिरूरकर

६) भारतीय राज्यघटना – डॉ. जे. एन. पांडे

७) भारतीय राज्यघटना : स्वरूप आणि राजकारण – प्रा. घांगरेकर


●●●

## भारतीय राज्यघटना – Indian Constitution

### प्रकरण - १

# भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना

# (Introduction To The Constitution of India)

**१.० प्रस्तावना –**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतीय स्वातंत्र्याची लढाई, धडपड याला पूर्णविराम मिळाला. परंतु भारतीय स्वातंत्र्याची प्राप्ती एवढेच पुरेसे नसून खऱ्या अर्थाने स्वतंत्र राष्ट्र उभे करण्याची ही सुरुवात होती. स्वातंत्र्यानंतर भारताने न्याय, स्वातंत्र्य एकता आणि बंधुभाव या संकल्पनेवर आधारित लोकशाही शासनपद्धती स्वीकारली. या श्रेष्ठ संकल्पनेला, विश्वासाला मूर्त स्वरूप देण्यासाठी नवीन संविधानाची गरज होती, म्हणून नवीन संविधान तयार करणे हे स्वतंत्र भारतासमोर पहिलं काम होतं.

कॅबिनेट मिशनप्लॅन च्या तरतुदीप्रमाणे संविधान बनवण्याच्या दृष्टीने नोव्हेंबर १९४६ मध्ये घटनासमिती गठित झाली. ही घटना समिती ब्रिटिश शासनाच्या मर्जीतील/अधिकारातील असल्यामुळे त्यात बदल करणे, ती रद्द करणे याबाबत त्यांचे अधिकार होते. तसेच या समितीस मर्यादित अधिकार दिलेले होते. कॅबिनेट मिशनने तयार केलेल्या रचनेप्रमाणेच घटना समितीला काम करणे बंधनकारक होते. त्यात कोणताही बदल करण्याचा अधिकार समितीला नव्हता; परंतु भारताचा स्वातंत्र्याबाबत कायदा १९४७ या प्रमाणे सदरील बंधने, अधिकारांची मर्यादा समाप्त होऊन घटनासमिती स्वतंत्र, सार्वभौम झाली.

अशा या घटना समितीतील महत्त्वाचे सभासद पं. जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, सरदार पटेल, मौलाना आझाद, गोपाल स्वामी अय्यंगार, गोविंद वल्लभ पंत, अब्दुल गफार खान, टी.टी. क्रिष्णम्माचारी, अलैडी कृष्णस्वामी अय्यंगार, एच. एन. कुंझरू, आचार्य कृपलानी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राधाकृष्णन, डॉ. जयकर, लियाकत अलीखान, डॉ. शरदचंद्र सिन्हा हे होते.

स्वतंत्र, सार्वभौम भारतीय घटना समितीची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली होती. या समितीचे कायमस्वरूपी अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद यांची नियुक्ती झाली. तसेच संविधान तयार करण्याबाबत विविध समित्या गठित केल्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी ७ सदस्यीय मसुदा समिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली.

मसुदा समितीने तयार केलेला घटनेचा मसुदा जानेवारी १९४८ मध्ये प्रसिद्धीस आला. भारतीय जनतेला त्याबाबत स्वत:चे मत मांडण्यासाठी तसेच सुधारणा किंवा बदल सुचविण्यासाठी आठ महिने एवढा वेळ दिला. त्या प्रमाणे जवळपास ७,६३५ सुधारणा सुचवल्या गेल्या, त्यापैकी प्रत्यक्षात २,४७३ सुधारणांबाबतच चर्चा होऊ शकली. घटना समितीला भारतीय संविधान तयार करण्यासाठी ११ बैठका घ्याव्या लागल्या तसेच २ वर्ष ११ महिने आणि १८ दिवस एवढा कार्यकाळ लागला.

अशा प्रकारे घटना समितीने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी नवीन भारतीय संविधानाचा स्वीकार केला आणि त्यावर राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी स्वाक्षरी केली व त्याच वेळी कलम ५, ६, ७, ८, ९, ६०, ३२४, ३६६, ३६७, ३७२, ३८०, ३८८, ३९१, ३९२ आणि ३९३ अंमलात आले आणि उर्वरित संविधान २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आले.

**१.१ भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका (The Preamble of The Indian Constitution )**

**१) महत्त्व**

प्रत्येक घटनेला काही निश्चित ध्येय किंवा मौलिक लक्ष्य असते. त्या उद्देशांचा प्रस्तावनेत उल्लेख केलेला असतो, उद्देशपत्रिका त्या घटनेचे सार होय. घटनेचा आशय उद्देशपत्रिकेमध्ये स्पष्ट केलेला असतो. त्यामध्ये जनतेच्या भावनांना मूर्त स्वरूप दिलेले असते. घटनाकारांच्या अंत:करणातील विचार ह्या उद्देशपत्रिकेतून व्यक्त होत असतो.

**(२) उद्देशपत्रिकेमध्ये पुढील तीन गोष्टींचा विचार केलेला असतो. –**

(१) संविधान निर्माण करण्यामागे संविधान निर्मात्यांचा उद्देश कोणता आहे.

(२) त्या उद्देशाला संविधानामध्ये कितपत स्थान दिले; जर तसे स्थान दिले नसेल तर संविधान संशोधन करून त्याची पूर्तता करता येते.

(३) संविधानातील काही अस्पष्ट संधी किंवा उपबंध स्पष्ट करण्यासाठी उद्देशपत्रिकेचा उपयोग होतो.

भारताच्या राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेमध्ये भारताच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाची रूपरेषा दर्शविली आहे. भारताच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांनी अनेक दिवसपर्यंत बाळगलेली आशा या उद्देशपत्रिकेद्वारे स्पष्ट झालेली आहे. व्यक्तीची प्रतिष्ठा कायम ठेवून सामाजिक न्याय आणि सामाजिक उन्नती करण्यासाठी कोणते ध्येय आणि कोणते मार्ग स्वीकारले पाहिजे, यांची माहिती या उद्देशपत्रिकेद्वारे स्पष्ट होते.

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी भारतीय नेत्यांनी जी झुंज दिली आणि जी स्वप्ने बाळगली होती त्या स्वप्नांचा आविष्कार म्हणजेच भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका होय.

**(३) उद्देशपत्रिका – (Preamble)**

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम,
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य
घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस;
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय,
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य,
दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा गांभीर्यपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत: प्रत अर्पण करीत आहोत.

**(४) उद्देशपत्रिकेचे विभाग –**

या उद्देशपत्रिकेवरून पुढील तीन गोष्टी स्पष्ट होतात.

(१) घटनेचे उगमस्थान

(२) राज्यव्यवस्थेचे स्वरूप

(३) राज्यव्यवस्थेचा उद्देश

या तिन्ही विभागांचा अर्थ पाहणे आवश्यक आहे –

**(१) घटनेचे उगमस्थान : भारतीय जनता**

**''आम्ही भारतीय जनता, ही घटना आमच्यासाठी तयार, मान्य आणि स्वीकृत करीत आहोत.''**

या वाक्यावरून असे स्पष्ट होते की, ही घटना भारतीय जनतेने तयार केली आणि ती स्वइच्छेने स्वीकारली आहे. घटना आम्हीच (भारतीय जनतेने) तयार केली असल्यामुळे ती आम्हावर बंधनकारक आहे.

वास्तविक पाहता ही घटना, घटनासमितीने तयार केली. घटनासमितीमध्ये सर्व भारतीयांचा समावेश झाला नव्हता. तसेच घटनापरिषदेतील सदस्य भारतीय जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी नव्हते. ते कॅबिनेट मिशन योजनेच्या अंतर्गत अप्रत्यक्ष मतदानाच्या पद्धतीनेच घटनासमितीचे सभासद झाले होते.

घटनाकारांनी 'आम्ही भारतीय जनता ही घटना आमच्यासाठी तयार करून ती मान्य आणि स्वीकृती करीत आहेत.' असे शब्दप्रयोग करून घटनेचे श्रेय भारतीय जनतेला दिले आणि भारतीय जनतेचे सार्वभौमत्व मान्य केले, ही गोष्ट अत्यंत उल्लेखनीय आणि मार्मिक आहे. यावरून हीच गोष्ट स्पष्ट होते की, भारतीय घटनेचे उगमस्थान भारतीय जनताच आहे.

**(२) राज्यव्यवस्थेचे स्वरूप –**

भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरूप कसे राहील याविषयीचा स्पष्ट उल्लेख घटनेच्या दुसऱ्या भागात केलेला आहे.

**(I) सार्वभौम :–**

प्रस्तुत घटनेनुसार भारताचे सार्वभौम राज्य निर्माण झाले. भारत इतर कोणत्याही राज्याच्या प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष नियंत्रणात आता राहणार नाही. अंतर्गत किंवा बहिर्गतदृष्ट्या भारतावर आता कोणाचेही वर्चस्व राहिले नाही.

**(II) समाजवादी :–**

(४२ वी घटना दुरुस्ती १९७६) 'समाजवादी' हा नवीन शब्द घालून भारताने आर्थिक धोरण स्पष्ट केले. भारताला साम्यवादी किंवा भांडवलशाही अर्थव्यवस्था मान्य नाही. श्रमिकांचे शोषण थांबविण्यासाठी आणि श्रीमंताची श्रीमंती अधिक वाढू नये यासाठी उत्पादनाच्या साधनावर आणि वितरणावर सामाजिक मालकी व सामाजिक नियंत्रण ठेवणारी समाजवादी राज्यव्यवस्था भारताने स्वीकारली आहे.

**(III) धर्मनिरपेक्ष :**

(४२ वी घटनादुरुस्ती १९७६) भारत हे धर्माधिष्ठित राज्य नाही. भारतामध्ये कोणत्याही धर्माला राजाश्रय नाही. धर्म ही पूर्णत: व्यक्तिगत बाब आहे. प्रत्येक भारतीय स्वेच्छेनुसार कोणत्याही धर्माची उपासना करील आणि प्रचार करील. कोणावरही कोणताही धर्म जबरदस्तीने लादता येणार नाही. धर्मनिरपेक्षता म्हणजे नास्तिकता नसून सर्व धर्मांप्रती समान श्रद्धा असा त्याचा अर्थ होतो.

**(IV) प्रजासत्ताक :**

प्रजासत्ताक याचा अर्थ लोकानुवर्ती शासन असा होतो. प्रजासत्ताक राज्यात अंतिम सत्ता लोकांकडे असते. भारताचा सर्वोच्च शासक वंशतत्त्वानुसार सत्ता प्राप्त करणारा शासक नाही. भारतातील कोणतीही सत्ता अंतिम नाही. देशाचा शासनकारभार प्रजेच्या इच्छेनुसार चालतो. वयस्कर मताधिकाराचे आधारावर भारतीय जनता शासनकारभार चालविणारे प्रतिनिधी निवडते.

**(V) गणराज्य :**

प्रजासत्ताक आणि गणराज्य हे दोन्ही शब्द समान अर्थाचे नाहीत. गणराज्य म्हणजे राजा नसलेले राज्य होय. लोकशाही राज्यव्यवस्थेत राज्यप्रमुख लोकनियुक्ती किंवा वंशानुगत असतो. उदा. इंग्लंड हे प्रजासत्ताक राज्य असले तरी ते गणराज्य नाही, कारण इंग्लंडचा सार्वभौम (राजा) हा वंशपरंपरेनुसार आपले पद धारण करतो. गणराज्यातील सर्वोच्च शासनप्रमुख हा लोकनियुक्तच असतो. भारताने गणराज्य पद्धतीचा स्वीकार केला. हा भारताचा सर्वोच्च शासक राष्ट्रपती हा अनुवंशिक पद्धतीने आपले पद धारण करीत नसतो, तर त्याची निवड जनतेद्वारे अप्रत्यक्ष पद्धतीने होते.

**(३) राज्यव्यवस्थेचा उद्देश :**

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेच्या तिसऱ्या विभागामध्ये राज्यव्यवस्थेचा उद्देश स्पष्ट केला आहे. व्यक्तीप्रमाणे शासनालाही काही ध्येये असतात. त्या ध्येयांची पूर्तता शासनाने केली पाहिजे. त्याशिवाय समाजाला आणि पर्यायाने राज्याला स्थैर्य लाभत नसते.

**(५) भारताच्या संविधानात खालील चार उद्दिष्टे ( objectives) या उद्देशपत्रिकेत सांगितली आहेत.**

**भारताच्या सर्व नागरिकांना –**

| | | | |
|---|---|---|---|
| **(i)** | **Justice** | – | न्याय : सामाजिक, आर्थिक आणि राजकीय |
| **(ii)** | **Liberty** | – | स्वातंत्र्य : विचार, उच्चार, श्रद्धा, धर्म आणि उपासना |
| **(iii)** | **Equality** | – | समता : दर्जा आणि समानसंधी याबाबत |
| **(iv)** | **Fraternity** | – | बंधुता : व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकात्मता राखणारी |

या उद्देशांचा सविस्तर विचार खालीलप्रमाणे केला आहे.

**(i) न्याय (Justice) :-**

न्याय हा राज्यसंस्थेचा आत्मा आहे. न्याय म्हणजे व्यक्तीच्या वर्तणुकीचा समाजहिताशी मेळ बसवणे होय. न्यायाचा उद्देश समाजाचे जास्तीतजास्त कल्याण करणे हाच आहे. असा न्याय सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात प्रस्थापित केल्याशिवाय व्यक्तीची आणि पर्यायाने समाजाची सर्वांगीण उन्नती होणार नाही. राजनीतीची मार्गदर्शक तत्त्वे, अस्पृश्यता निवारण, बेकारी निवारण, मागासलेल्या जाती जमातींचा शैक्षणिक व आर्थिक विकास करणे या गोष्टी सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या निर्देशक गोष्टी आहेत. वयस्कर मताधिकार, जातीय मतदानाची समाप्ती, सरकारी पदप्राप्तीसाठी नागरिकांमध्ये भेदभाव न करणे या गोष्टींचा वापर राजकीय न्याय यामध्ये समावेश होतो.

**(ii) स्वातंत्र्य (Liberty) :-**

व्यक्तित्वाचा विकास करण्यास आवश्यक परिस्थितीचा उपभोग घेण्याची समान संधी म्हणजे स्वातंत्र्य होय. स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार नाही. अनुचित आणि स्वैराचारी वर्तनावर उचित बंधने घालणे म्हणजे स्वातंत्र्य होय. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे. भारतीय घटनेचे विचार, उच्चार, श्रद्धा, धर्म आणि उपासना याचा स्वमतानुसार (म्हणजेच, समाजहिताला व राज्याच्या हिताला बाधा येणार नाही, अशी दक्षता बाळगूनच) उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीला दिले. उद्देशपत्रिकेत व्यक्त केलेले स्वातंत्र्य मूलभूत अधिकारांच्या रूपाने घटनेत साकार झाले आहे.

**(iii) समता (Equality) :-**

मानवनिर्मित भेदाभेद नष्ट करणे आणि सर्वांना व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याची समान संधी देणे हाच समतेचा अर्थ होतो. भारतीय संविधानाने समता प्रस्थापित करण्यासाठी मानवनिर्मित विषमता. उदा. स्पृश्य–अस्पृश्यता नष्ट केली. भारतामध्ये सर्व व्यक्तींसाठी एकच कायदा केला आणि कायद्यासमोर प्रत्येकाला एक आणि एकच संबोधले. व्यक्तित्वाचा विकास करण्यासाठी प्रत्येकाला संधी दिली आहे.

**(iv) बंधुता (Fraternity) :-**

भारतामध्ये पूर्वीपासून जातीयवाद, धर्मवाद, भाषावाद आणि प्रांतीयवाद होते. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्य निर्मितीला बांधा येत असे. राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता कायम ठेवण्यासाठी हे भेदाभेद नष्ट करून सर्व नागरिकांमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण करणे अत्यावश्यक होते, याची जाणीव घटनाकारांना होती. त्यादृष्टीने सर्व स्त्री–पुरुषांना समान अधिकार, तसेच न्याय, स्वातंत्र्य आणि समतेच्या पायावर बंधुत्वाची शाश्वती देणे हेच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून घटनाकारांनी घटना तयार केली.

**(v) अखंडता (Integrity) :- (४२ वी घटनादुरुस्ती १९७६)**

भारताने संघराज्य व्यवस्था स्वीकारली आहे, परंतु या संघराज्यातून कोणत्याही घटकराज्याला बाहेर पडता येत नाही. भारताची अखंडता राखली जावी याच दृष्टीने केंद्र सरकार मजबूत केले आहे.

**(६) उद्देशपत्रिका हा संविधानाचा भाग आहे किंवा नाही?**

Case Law----

1) Berubaris Case, AIR 1960

2) Kesavanand Bharati v. State of Kerala, AIR 1973,
SC 1461 ( Fundamental Right Case)

भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका (Preamble) ही संविधानाचा भाग आहे किंवा नाही याबाबत, बेरूबारी केस (Berubaris Case) AIR 1960 या खटल्यात सुप्रीम कोर्टने आपले मत विशद केले.

उद्देशपत्रिका हा भारतीय संविधानाचा भाग नाही आणि म्हणून त्यात संसदेला दुरुस्ती करता येणार नाही. परंतु Kesavanand Bharati v. State of Kerala, AIR 1973, SC 1461 (Fundamental Right Case) या केसमध्ये सुप्रीम कोर्टाने आपले मत मांडले,

उद्देशपत्रिका ही संविधानाचा एक भाग आहे आणि संविधानाच्या कलम ३६८ प्रमाणे संसदेला त्यात दुरुस्ती करता येईल, परंतु संविधानाच्या मूलभूत संरचनेमधील तत्त्वे नामशेष होणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे.

●●●

## प्रकरण - २

# मूलभूत अधिकार

# (Fundamental Rights)

### २.० मूलभूत अधिकाराचा अर्थ –

प्रा. लास्कीच्या मते, अधिकार म्हणजे समाजजीवनाच्या अशा अटी आहेत, की ज्याशिवाय कोणतीही व्यक्ती स्वत:चा सर्वांगीण विकास करू शकत नाही. (Rights in fact are those conditions of social life without which, no man can seek in general to be himself at his best - prof. Laski )

प्रत्येक व्यक्तीला तिचा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक वगैरे दृष्टीने विकास करावयाचा असतो. हा विकास करण्यासाठी प्रत्येक राज्याने आवश्यक अशी परिस्थिती निर्माण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. जोपर्यंत अशी आवश्यक परिस्थिती राज्य निर्माण करीत नाही, तोपर्यंत व्यक्तींचा विकास अशक्य आहे. अशा व्यक्तीने केलेल्या मागणीला राज्याने मान्यता दिली म्हणजेच त्या मागणीला अधिकार असे म्हणतात. उदा. जीवन जगण्याचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार इ. या अधिकाराच्या प्राप्तीशिवाय व्यक्तित्वाचा विकास होणे अशक्य आहे.

### २.१ मूलभूत अधिकारांचे महत्त्व :

कोणत्याही राज्याचा दर्जा ते राज्य तेथील नागरिकांना किती अधिकार देते यावरून ठरतो असे प्रा. लास्कीचे मत आहे. निरंकुश शासनपद्धतीत व्यक्तीला कोणतेच अधिकार नसतात. परंतु लोकशाही शासनाचे ध्येय व्यक्तिमत्वाचा विकास करणे हेच असल्यामुळे मूलभूत अधिकाराचे कार्य नुसतेच नकारात्मक राहिले नाही. व्यक्तीचा आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात विकास करून न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही मूल्यांची जोपासना करणे हा त्यांचा सकारात्मक उद्देशाचा भाग आहे.

मूलभूत हक्कांचा घटनेत समावेश केल्यामुळे, कोणत्याही बहुमतप्राप्त पक्षाची हुकूमशाही निर्माण होत नाही. कारण त्या अधिकारावर झालेल्या आक्रमणाची दाद सर्वोच्च न्यायालयात मागता येते आणि न्यायालयाचा निर्णय सर्वांवर बंधनकारक असतो. जनतेचे कल्याण करणे आणि लोकहिताचे संवर्धन व संरक्षण करणे यांची हमी मूलभूत हक्कच देतात. मूलभूत अधिकारांमुळे न्याय, वर्तणूक आणि नागरिकता यांची पातळी ठरविली जाते. अशाप्रकारे मूलभूत अधिकार नागरिक स्वातंत्र्याची हमी देतात आणि त्याचवेळी शासनाधिकाऱ्यांच्या अधिकारावर नियंत्रण प्रस्थापित करतात. राज्याचा वाढता हस्तक्षेप आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांच्यात समन्वय साधण्यांचे कार्य मूलभूत अधिकारच करतात.

### २.२ भारतीय घटनेचे मान्य केलेले मूलभूत अधिकार :

भारतीय घटनेच्या तिसऱ्या अध्यायात नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा समावेश केला. भारतीय घटनेने नागरिकांना पुढील सात प्रकारचे मूलभूत अधिकार दिले आहेत.

(१) समतेचा अधिकार (Right to Equality ) कलम १४ ते १८

(२) स्वातंत्र्याचा अधिकार (Right to Freedom) कलम १९ ते २२

(३) शोषणाविरुद्धचा अधिकार (Right to Against Exploitation) कलम २३ ते २४

(४) धर्मस्वातंत्र्याचा अधिकार (Right to Freedom of Religon) कलम २५ ते २८

(५) संस्कृती व शिक्षणाचा अधिकार (Cultural and Educational Rights) कलम २९ ते ३०

(६) संपत्तीचा अधिकार (Right to Property )

**टीप :** हा अधिकार ४४ व्या घटनादुरुस्तीने १९७८ मध्ये रद्द केला.

(७) घटनात्मक उपायाचा अधिकार (Right to Constitutional Remedies) कलम ३२ ते ३५ या अधिकारांचे विवेचन खालीप्रमाणे केले आहे.

## २.३ कलम १२, राज्य या शब्दाचा अर्थ

### (१) कलम १२ – व्याख्या : –

या भागात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, राज्य या शब्दात भारताचे सरकार व संसद आणि राज्यांपैकी प्रत्येक राज्याचे शासन व विधानमंडळ आणि भारताच्या राज्यक्षेत्रातील अथवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील सर्व स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणे यांचा समावेश आहे.

**कलम १२ प्रमाणे राज्य शब्दाची व्याख्या (न्यायालयीन निवाडे) (Case Law)**

१) **वीरेंद्र कुमार श्रीवास्तव वि.यु.पी. राज्य कर्मचारी कल्याण निगम आणि इतर,**
ए. आय. आर.२००५ एस. सी. ४११

२) **कोहल शर्मा वि. युनियन ऑफ इंडिया.**
ए. आय. आर. २००५ पी. अँड एच ६७

या केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे मत स्पष्ट केले आहे की, वरील कॉर्पोरेशनच्या दैनंदिन कारभारावर संबंधित राज्य शासनाचे नियंत्रण असल्यामुळे, भारताचे संविधानाच्या कलम १२ प्रमाणे वरील कॉर्पोरेशन राज्य शब्दाच्या व्याख्येमध्ये येते. त्यामुळे त्या कॉर्पोरेशनविरुद्ध याचिका दाखल होऊ शकते.

३) **प्रदीपकुमार बिसवास वि. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ केमिकल बॉयॉलॉजी,**
२००२ (५) एस.एसी.सी. १ (७ न्यायाधीश न्यायपीठ )

या केसमध्ये (A.I.L) आर्मी इन्स्टिटयूट ऑफ लॉ, ही संस्था सार्वजनिक कार्य व शिक्षण देण्याचे कार्य करत होती म्हणून कलम १२ प्रमाणे राज्य या शब्दाच्या व्याख्येत येते. त्या संस्थेविरुद्ध याचिका दाखल करता येते.

### (२) कलम १३ – मूलभूत हक्कांशी विसंगत असलेले अथवा त्यांचे न्यूनीकरण करणारे कायदे :–

(१) या संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात अंमलात असलेले सर्व कायदे, ते जेथवर या भागाच्या तरतुदींशी विसंगत असतील तेथवर, ते अशा विसंगतीच्या व्याप्तीपुरते शून्यवत असतील.

(२) राज्य, या भागाने प्रदान केलेले हक्क हिरावून घेणार नाही किंवा त्यांचा संकोच करणारा कोणताही कायदा करणार नाही आणि या खंडाचे उल्लंघन करून केलेला कोणताही कायदा त्या उल्लंघनाच्या व्याप्तीपुरता शून्यवत असेल.

(३) या कलमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर :–

(क) कायदा – यात, भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्याइतकाच प्रभावी असलेला कोणताही अध्यादेश, आदेश, उपविधी, नियम, विनियम, अधिसूचना, रूढी किंवा परिपाठ यांचा समावेश आहे.

(ख) प्रवर्तनात असलेले कायदे – यात, भारताच्या राज्यक्षेत्रातील विधानमंडळाने किंवा अन्य सक्षम प्राधिकाऱ्याने या संविधानाच्या प्रारंभापूर्वी पारित केलेल्या किंवा केलेल्या व पूर्वी निरसित न झालेल्या कायद्यांचा समावेश आहे. मग असा कोणताही कायदा किंवा त्याचा कोणताही भाग त्यावेळी मुळीच किंवा विशिष्ट क्षेत्रांमध्ये अंमलात नसला तरी हरकत नाही.

(४) कलम ३६८ खाली संविधानात केलेल्या कोणत्याही सुधारणेला या कलमातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

**Case Laws :**

1) State of Kerala v. Chandra Mohan, AIR 2004, SC 1672
   शासकीय परिपत्रकांचा (Govt. Circulars) कलम १३ प्रमाणे कायद्यात समावेश होत नाही.
2) Union of India v. Navin Jindal, AIR 2004, SC 1559 :
   2004(2), SCC 510
   केंद्र शासनाने जारी केलेल्या प्रशासकीय सूचना (Flag Code) या कलम १३ प्रमाणे कायदा नाहीत म्हणून वरिष्ठ प्रशासकीय सूचनांचा कलम १९ चा वापर करताना अथवा अर्थ लावताना कायदा म्हणून विचार केला जाणार नाही.

**२.४ मूलभूत अधिकार (Fundamental Rights)**

**I) समतेचा अधिकार (कायद्याबाबत समानतेचा नियम)**

**Right To Equality (Rule of Law)**

**कलम १४ ते १८**

**(१) कलम १४ – कायद्यापुढे समानता :–**

राज्य, कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही.

Equality before law

Equal protection before law

State of West Bengal v. Anwar Ali Sarkar

Both concept one & the same

**अ) कायद्याबाबत समानतेचा नियम (Rule of Law)**

कायद्यापुढील समानता म्हणजेच इंग्लंडमधील प्रो. डायसी या विचारवंताच्या विचारसरणीच्या अनुरूप कायद्यापुढील समानतेचा नियम होय. म्हणजेच कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान – याचाच अर्थ असा की कोणतीही व्यक्ती कायद्यापेक्षा मोठी नाही. त्याचे पद, परिस्थिती काहीही असो, ती कायद्याच्या तसेच न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये येईल. प्रो. डायसी यांच्या मते, पंतप्रधान ते कॉन्स्टेबल किंवा कलेक्टर ते शिपाई हे कायद्याच्या उल्लंघनाबद्दल सारख्याच प्रमाणात जबाबदार असतील. कायद्यापुढील समानतेच्या नियमाबाबत कोणत्याहीप्रकारे भेदभाव होणार नाही. सर्व व्यक्तींना कायद्याचे समान संरक्षण अधिकार असेल. कोणालाही समान संरक्षणातून वंचित केले जाणार नाही. कायद्यासमोर धर्म, वंश, जात, स्त्री, पुरुष, श्रीमंत, गरीब, वरिष्ठ, कनिष्ठ, सरकारी अधिकारी, नोकर असा कोणत्याच प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही.

**ब) अपवाद**

समान परिस्थितीत समान वागणूक प्राप्त करण्याचा व्यक्तीला अधिकार असला किंवा कायद्यापुढे समान लेखण्याची आणि समान संरक्षणाची हमी दिली असली तरी सरकार मात्र योग्य असा भेदभाव करू शकते. उदा. श्रीमंतांवर जास्त कर लावू शकते आणि गरिबांवर कमी कर लावू शकते अथवा त्यांना माफ करू शकते. तसेच डॉक्टर, वकील, सैनिक इ. व्यक्तींसाठी कायद्याची विशेष व्यवस्था करू शकते. निरनिराळे वर्ग सरकार निर्माण करू शकेल आणि त्यांच्यासाठी कायदे करू शकेल.

**(१) नैसर्गिक न्याय तत्त्व :**

M/s Quality traders v. Union of India, AIR 2005, All 3

कॉन्ट्रॅक्टरच्या नावाचा ब्लॅक लिस्टमध्ये समावेश करण्याअगोदर त्यांचे म्हणणे एकून घेणे आवश्यक होते. त्यांना म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली नव्हती. म्हणून न्यायालयाने वादग्रस्त निर्णय रद्द केला.

**(२) वाजवी वर्गीकरण :**

भारताचे संविधानाचे कलम १४ प्रमाणे वाजवी वर्गीकरण करता येते. कायद्याचे समान तत्त्व असले तरी न्यायिक स्पष्टोच्चारानुसार वर्गीकरणाच्या शास्त्रीय चाचणीसाठी दोन अटी आहेत.

(१) वर्गीकरण हे सुबोध भेददर्शीवर आधारलेले असले पाहिजे आणि ते इतरांपेक्षा वेगळा वर्ग असे दर्शविलेले असले पाहिजे.

(२) आव्हान दिलेल्या कायद्यामधील उद्देशाशी भेददर्शी हे तर्कसंगत असले पाहिजे.

**Maneka Gandhi v. Union of India, 1978 ( Passport Case)**

**i) Chairman Railway Board v. Chandrimadas, AIR 2000 SC 988**

देशाच्या सुरक्षेसाठी आणि इतर महत्त्वाच्या बाबींसाठी मूलभूत अधिकारांवर वाजवी बंधने घालता येतात. अशी बंधने परकीय नागरिकालासुद्धा बंधनकारक असतात.

**ii) State of Rajasthan v. Vidyavati , AIR 1962, SC 933**

सरकारची सार्वभौम कार्ये पार पाडत असताना झालेल्या नुकसनीबद्दल दावा करता येत नाही.

**iii) D T C v. Mazdur Congress, AIR 1991, SC 101**

कोणत्याही कारणाशिवाय कायम कर्मचाऱ्याला कामावरून कमी करणारा नियम हा अवैध व निरर्थक आहे.

**iv) K.A. Abbas v. Union of India**

classification U & A certificate of films

not violative of Art. 14

**v) Ramana Dayaram Shetty v. International Airport Athority,**
AIR 1979, SC 1628

**vi) Mithu v. State of Punjab, AIR 1983, SC 473**

**vii) Air India v. Nergesh Meerza & others, 1981 (4), SCC 335**

**(२) कलम १५ – धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई : –**

(१) राज्य, कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही.

(२) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यांपैकी कोणत्याही कारणांवरून कोणताही नागरिक

(क) दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, हॉटेल आणि सार्वजनिक करमणुकीची स्थाने यांत प्रवेश :

–किंवा–

(ख) पूर्णत: किंवा अंशत: राज्याच्या पैशाने राखलेल्या अथवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरताच खास नेमून दिलेल्या अशा विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक राबत्याच्या जागा यांचा वापर, याविषयी कोणतीही नि:समर्थता, दायित्व, निर्बंध किंवा शर्त यांच्या अधीन असणार नाही.

(३) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, स्त्रिया व बालके यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(४) या कलमातील किंवा कलम २९ चा खंड (२) यातील कोणत्याही गोष्टीमुळे, नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(५) या कलमातील किंवा कलम १९ चे पोट-खंड (छ) खंड (१) यातील कोणत्याही गोष्टीमुळे, कायद्याप्रमाणे नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. जो पर्यंत, ही विशेष तरतूद खाजगी शैक्षणिक संस्थामध्ये, अनुदानित किंवा अनुदानित नसलेल्या, पण कलम ३० चा खंड(१) प्रमाणे अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना वगळता, फक्त प्रवेशासाठी असेल.

**Case Law :**

**(1) S.V. Patil v. State of Maharashtra, 2004 (2), M.L.J. 1109**

खोट्या जात प्रमाणपत्राच्या आधारे मिळवलेला लाभ शासन परत काढू शकते.

**(2) Indra Sohani v. Union of India, AIR1997, SC 597**

मागासवर्गीयांपैकी क्रीमीलेयरचा वेगळा वर्ग निर्माण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**(3) State of Rajasthan v. Pratapsingh**

- certain area as disturbed, established Police Station under Police Act1851, Bear cost for additional police station except Harijans, & Muslim-- contrary

**(4) Government of A.P. v. P.B. Vijaykumar**

- state service rule valid, providing preference to women in direct rebruitment.

**(5) Gita Hariharan v. Reserve Bank of India**

Mother & Father is natural guardian of their children –

sec.6(a) of Hindu minority & Guardianship Act against Art. 14, 15

**(३) कलम १६ सार्वजनिक सेवायोजनाच्या बाबींमध्ये समान संधी : –**

(१) राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील सेवायोजन किंवा नियुक्ती यासंबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समान संधी असेल.

(२) कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवास या किंवा यापैकी कोणत्याही कारणांवरून राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही सेवायोजन किंवा पद यांच्याकरिता अपात्र असणार नाही. अथवा त्यांच्याबाबत त्याचा प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.

(३) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे (एखादे राज्य किंवा संघराज्यक्षेत्र यांच्या शासनाच्या अथवा त्यांच्यातील कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील एखाद्या वर्गाच्या किंवा पदावरील सेवायोजन किंवा नियुक्ती यांच्यासंबंधात अशा सेवायोजनाच्या किंवा नियुक्तीच्यापूर्वी त्या राज्यातील किंवा संघ राज्यक्षेत्रातील निवासाविषयी एखादी आवश्यकता विहित करणारा) कोणताही कायदा करण्यास संसदेला प्रतिबंध होणार नाही.

(४) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या सेवांमध्ये नागरिकांच्या ज्या कोणत्याही मागासवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व नाही. अशा वर्गाकरिता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(४क) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या नियंत्रणाखालील क्षेत्रांमध्ये ज्या अनुसूचित जातींना किंवा अनुसूचित जनजातींना त्या राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व देण्यात आलेले नसेल त्यांना, राज्याच्या नियंत्रणाखालील सेवासंबंधातील (कोणत्याही वर्गामध्ये किंवा वर्गांमध्ये परिणामस्वरूप ज्येष्ठतेसह पदोन्नती देण्यासंबंधी, आरक्षण करण्यासाठी राज्याला कोणतीही तरतूद करण्यास प्रतिबंध होणार नाही.)

(४ख) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे राज्याला, खंड (४) किंवा खंड (४क) अन्वये आरक्षणासाठी केलेल्या

कोणत्याही तरतुदींनुसार, भरण्यासाठी म्हणून एखाद्या वर्षात राखून ठेवलेल्या परंतु त्या वर्षात रिक्त राहिलेल्या जागांच्या बाबतीत राज्याला, पुढील कोणत्याही वर्षात किंवा वर्षामध्ये भरावयाच्या रिक्त जागांचा एक स्वतंत्र वर्ग म्हणून विचारात घेण्यास प्रतिबंध होणार नाही. आणि अशा वर्गातील रिक्त जागा, ज्या वर्षांमध्ये त्या भरण्यात येतील त्या वर्षातील रिक्त जागांच्या पन्नास टक्के इतकी आरक्षणाची मर्यादा ठरविण्याकरिता, त्या वर्षातील इतर रिक्त जागा जमेस धरल्या जाणार नाहीत.

(५) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, एखाद्या धार्मिक किंवा सांप्रदायिक संस्थेच्या कारभाराशी संबंधित असलेल्या पदाचा किंवा तिच्या शासक मंडळाचा कोणताही सदस्य म्हणजे विशिष्ट धर्माची अनुयायी असणारी किंवा एखाद्या विशिष्ट संप्रदायाची व्यक्ती असली पाहिजे अशी तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही.

## Case Law

**1) C. B. Muthamma v. Union of India**

Provision in service rule, requiring permission of government, before her marriage—denying right to promotion– unconstitutional.

**2) Narsimharao v. State of A.P.**

residence signifies whole state, not particular area.

**3) Balaji v. State of Mysore**

Government reserved seats in medical & engineering college to backward classes 28%, more backward classes 20%, SC & ST 20%--held that,- special provision should be provided but not more than 50%

**4) Devdasan v. Union of India**

carry forward rule --- unconstitutional, not more than 50%.

**5) Indira Sawhney & others v. Union of India**

( Mandal Commission base)

- accept carry forward rule, not breach 50% condition except certain situation.
- backward class of citizen identified on the basis of caste and not only economic casis.
- creamy layer must be excluded from backward classes.
- reservation can be made by Executive Order
- no reservation in promotions.
- dispute regarding new criteria can be rised in supreme court.

### (४) कलम १७ अस्पृश्यता नष्ट करणे :

अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध करण्यात आले आहे. अस्पृश्यतेतून उद्भवणारी कोणतीही नि:समर्थता लादणे हा कायद्यानुसाार शिक्षापात्र अपराध असेल.

या कलमाच्या अंमलबजावणीकरिता संविधानाच्या कलम ३५ प्रमाणे दिलेल्या अधिकाराप्रमाणे संसदेने अस्पृश्यता (Untouchability offence) Abt,1955 अपराध कायदा, १९५५ अंमलात आणला.

## Case Law-

1) Peoples Union for Democratib Rights v. Union of India, AIR 1982, SC 1417

2) State of Karnataka v. Appa Balu Ingle, AIR 1993, SC 1126

**(५) कलम १८ – किताब नष्ट करणे :**

(१) सेवाविषयक किंवा विद्याविषयक मानविशेष नसलेला असा कोणताही किताब राज्याकडून प्रदान केला जाणार नाही.

(२) भारताचा कोणताही नागरिक कोणत्याही परकीय देशाकडून कोणताही किताब स्वीकारणार नाही.

(३) भारताची नागरिक नसलेली कोणतीही व्यक्ती ती राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही लाभांचे किंवा विश्वासाचे पद धारण करत असताना राष्ट्रपतीच्या संमतीशिवाय कोणत्याही परकीय देशाकडून कोणताही किताब स्वीकारणार नाही.

(४) राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही लाभाचे किंवा विश्वासाचे पद धारण करणारी कोणतीही व्यक्ती, राष्ट्रपतीच्या संमतीशिवाय परकीय देशाकडून किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील कोणत्याही प्रकारची कोणतीही भेट, वित्तलब्धी किंवा पद स्वीकारणार नाही.

**II) स्वातंत्र्याचा अधिकार, कलम १९ ते २२**

**(Right To Freedom)**

संविधानातील मूलभूत हक्कांपैकी व्यक्तीच्या वैयक्तिक स्वतंत्र्याचा हक्क हा सर्वात महत्त्वाचा मानला जातो. संविधानातील कलम १९ ते २२ मध्ये त्याबाबत तरतूद केलेली आहे.

**स्वातंत्र्याचा हक्क –**

**(१) कलम १९ – भाषणस्वातंत्र्य इत्यादी संबंधीच्या विवक्षित हक्कांचे संरक्षण–**

(१) सर्व नागरिकांस –

क) भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा :

ख) शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा :

ग) अधिसंघ वा संघ बनविण्याचा.

घ) भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा :

ड) भारताच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा
आणि

छ) कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालविण्याचा हक्क असेल.

(२) खंड (१) चा उपखंड (क) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या हक्काच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे भारताची सार्वभौमता व एकात्मता, राज्याची सुरक्षितता, परकीय देशांशी मैत्रीचे संबंध, सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता किंवा नीतिमत्ता यांच्या हितासाठी अथवा न्यायालयाचा अवमान, अब्रूनुकसानी किंवा अपराधास चिथावणी यांच्या संबंधात जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(३) वरील खंडाचा उपखंड (ख) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या हक्काच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे भारताची सार्वभौमता व एकत्मता किंवा सार्वजनिक सुव्यवस्था व नीतिमत्ता यांच्या हितासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(४) वरील खंडाचा उपखंड (ग) यामधील कोणत्याही गोष्टींमुळे, उक्त उपखंडाचे प्रदान केलेल्या हक्कांच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे भारताची सार्वभौमता व एकात्मता किंवा सार्वजनिक सुव्यवस्था व नीतिमत्ता यांच्या हितासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही. अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(५) वरील खंडामधील (उपखंड (घ) व (ड)) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडांनी प्रदान केलेल्या हक्कांपैकी कोणत्याही हक्काच्या वापरावर ज्या कायद्यांद्वारे, सर्वसाधारण जनतेच्या हितासाठी किंवा कोणत्याही अनुसूचित जनजातीच्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(६) वरील खंडाचा उपखंड (छ) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या हक्काच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे, सर्वसाधारण जनतेच्या हितासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही आणि विशेषत: वरील उपखंडातील कोणत्याही गोष्टीमुळे, जो कायदा –

(एक) कोणताही पेशा आचरण्याकरिता अथवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालवण्याकरिता आवश्यक असलेल्या पेशाविषयक किंवा तंत्रविषयक अर्हता किंवा

(दोन) नागरिकांना पूर्णत: किंवा अशंत: वगळून अथवा अन्यथा राज्याने अथवा राज्याचे स्वामित्त्व किंवा नियंत्रण असलेल्या महामंडळाने कोणताही व्यापार, धंदा, उद्योग किंवा सेवा चालवणे.

यांच्याशी जेथवर संबद्ध असेल तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास प्रतिबंध होणार नाही.

## Case Law —

1) Indian Express News Paper v. Union of India, AIR (1985), SC 641
2) Ramesh Thapper v. State of Madras, AIR 1950, SC 124
3) Dharam Datt v. Union of India, AIR 2004, SC1294
   या केसप्रमाणे मूलभूत अधिकार कोणत्याही कायद्याने काढून घेता येत नाही. मात्र कायद्याद्वारे वाजवी बंधने घालता येतात.
4) Bijoe Emmanuel v. State of Kerala, (Popularly known as National Anthem case)
   Held that, Freedom of speech & expression includes 'the right to observe silence'

### (२) कलम २० अपराधांबद्दलच्या दोषसिद्धीबाबत संरक्षण :–

संविधानाच्या विसाव्या कलमात असे स्पष्ट केले की, जोपर्यंत प्रचलित कायद्यानुसार गुन्हा झाला आहे असे सिद्ध होत नाही तोपर्यंत व्यक्तीला अपराधाकरीता शिक्षा देता येत नाही.

अ. कोणताही दंड कायदा ज्या दिवशी संमत झाला असेल त्याचे अगोदर घडणाऱ्या गुन्ह्या साठी तो लागू करता येणार नाही. क. २० (१)

ब. एकाच गुन्ह्यासाठी एकावेळी एकापेक्षा जास्त शिक्षा व्यक्तीला देता येणार नाही. क. २० (२)

क. स्वतःविरुद्ध साक्ष देण्यासाठी भाग पाडले जाणार नाही. क.२० (३)

(१) जे कृत्य अपराध असल्याचा दोषारोप करण्यात आला असेल ते कृत्य एखाद्या व्यक्तीने करण्याच्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याचा त्यामुळे भंग झाल्याखेरीज अशा कोणत्याही अपराधाबद्दल ती व्यक्ती दोषी ठरविली जाणार नाही. तसेच तो अपराध करण्याच्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याखाली जी शिक्षा करता आली असती त्यापेक्षा अधिक शिक्षेस ती पात्र ठरवली जाणार नाही.

(२) एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा अधिक वेळा कोणत्याही व्यक्तीवर खटला चालवला जाणार नाही आीण तिला शिक्षा दिली जाणार नाही.

(३) कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर स्वत:विरुद्ध साक्षीदार होण्याची सक्ती केली जाणार नाही.

**Case Law**

1) Haribhai Channabhai Vhora v. Keshubhai Haribhai Vhora, AIR 2005, Guj 157
   – सक्तीची डी एन ए टेस्ट म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यमध्ये हस्तक्षेप.
2) Solemuthu v. State , CRLJ 2005, 31
   – आरोपीला रक्ताचा नमुना देण्यास सांगणे म्हणजे कलम २०(३) चे उल्लंघन होत नाही.

**(३) कलम २१ जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण :–**

कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही.

**1) Kharag Singh v. State of UP, AIR1963, SC1295**
   एकांततेचा हक्क Right of Privacy
   Peoples Union for Civil Liberties v. Union of India, AIR1997,SC568
   (Telephone Tapping Case)

**2) Olga Tellis v. Bombay Municipal Corporation, AIR, 1986, SC180**
   उपजीविकेचा हक्क Right to Livelihood.

**3) Mohini Jain v. State of Karnataka, 1992 (3), SC 666**
   (Popularly known as Capitation Fee Case)

**जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण यामधिल इतर हक्कांचा सामावेश :**

जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण या प्रकारच्या हक्कांमध्ये सुप्रीम कोर्टाने विविध न्यायनिवाड्याअंतर्गत खालील प्रकारचे हक्क हे मूलभूत हक्कांमध्ये रूपांतरित केलेले आहेत. ते असे –

**Case Law -**

1) Motu Petitioner v. State of Rajasthan, AIR 2005, Raj 82
   – जीविताचा हक्क म्हणजे शुद्ध व स्वच्छ वातावरण असणे.
2) State of Sikkim v. T Lachugappa, 2005, CRLJ 201,
   – आरोपीचा जलद सुनावणी घेण्याचा अधिकार
3) A K Gopalan v. State of Madras, AIR 1950, SC27, Procedure established by law is understood as any type of procedure. But need not be just, reasonable, or fair.
4) Maneka Gandhi v. Union of India, AIR 1978, SC597 (Passport Case)-
   Held that, Procedure must be just, reasonable, and fair, but not any type of procedure.
5) Kharag Singh v. State of UP, AIR1963, SC1295
   एकांततेचा हक्क Right of Privacy

**(४) कलम २१. क. शिक्षणाचा हक्क :–**

राज्याने नि:शुल्क आणि सक्तीचे शिक्षण वय वर्षे सहा ते चौदापर्यंतच्या मुलांना राज्यातील अंमलात असलेल्या कायद्यानुसार पुरविले पाहिजे.

शिक्षणाचा हक्क Right to Education

Uni Krishnan v. State of AP, (1993) 1, SCC 111

**(५) कलम २२. विवक्षित प्रकरणी अटक व स्थानबद्धता यांपासून संरक्षण :–**

(१) अटक झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा अटकेची कारणे, शक्य तितक्या लवकर तिला कळवल्याशिवाय, हवालातीत स्थानबद्ध करण्यात येणार नाही किंवा आपल्या पसंतीच्या विधिव्यवसायीचा विचार घेण्याचा व त्याच्याकरवी बचाव करण्याचा हक्क तिला नाकारला जाणार नाही.

(२) जिला अटक केली आहे व हवालातील स्थानबद्ध केले आहे अशा प्रत्येक व्यक्तीला, अटकेच्या ठिकाणापासून सर्वात जवळच्या दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासास आवश्यक असलेल्या अवधी वगळून अशा अटकेपासून चोवीस तासांच्या कालावधीत त्या दंडाधिकाऱ्यापुढे हजर केले जाईल आणि अशा कोणत्याही व्यक्तीला उक्त कालावधीनंतर अधिक काळ दंडाधिकाऱ्याने प्राधिकृत केल्याशिवाय हवालातील स्थानबद्ध करण्यात येणार नाही.

(३) (क) जी व्यक्ती त्यावेळी शत्रूदेशीय असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, किंवा

(ख) ज्या व्यक्तीला प्रतिबंधक स्थानबद्धतेची तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली अटक केली आहे किंवा स्थानबद्ध केले आहे अशा कोणत्याही व्यक्तीला.

**खंड (१) व (२) यातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.**

(४) प्रतिबंधक स्थानबद्धतेची तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याद्वारे, दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्याचा प्राधिकार, समुचित उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीच्या शिफारशींनुसार घटित केलेल्या सल्लागार मंडळाने उक्त दोन महिन्यांच्या कालावधी संपण्यापूर्वी, आपल्या मते अशा स्थानबद्धतेला पुरेसे कारण आहे असा अभिप्राय दिलेला नसेल तर, दिला जाणार नाही:

(क) सल्लागार मंडळ हे, अध्यक्ष व किमान दोन अन्य सदस्य मिळून बनलेले असेल व अध्यक्ष हा समुचित उच्च न्यायालयाच्या सेवेमध्ये असणारा न्यायाधीश असेल आणि अन्य सदस्य हे, कोणत्याही उच्चन्यायालयाच्या सेवेमध्ये असलेले किंवा त्याचे सेवानिवृत्त न्यायाधीश असतील:

(ख) आणखी असे की, खंड ७ चा उपखंड (क) याखाली संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे विहित केलेल्या कमाल कालावधीच्या पलीकडे कोणत्याही व्यक्तीला स्थानबद्ध करण्यास या खंडातील कोणत्याही गोष्टींमुळे प्राधिकृती मिळणार नाही.

**स्पष्टीकरण :–** या खंडामध्ये समुचित उच्च न्यायालय याचा अर्थ,–

एक) भारत सरकारने अथवा त्या सरकारला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने दिलेल्या स्थानबद्धतेच्या आदेशानुसार एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात आले असेल त्याबाबतीत, दिल्ली या संघ राज्यक्षेत्राचे उच्च न्यायालय, असा आहे.

दोन) (संघराज्य सोडून अन्य) कोणत्याही राज्याच्या शासनाने दिलेल्या स्थानबद्धतेच्या आदेशानुसार एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात आले असेल त्याबाबतीत त्या राज्याचे उच्च न्यायालय. असा आहे; आणि

तीन) एखाद्या संघ राज्यक्षेत्राच्या प्रशासकाने अथवा अशा प्रशासकाला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने दिलेल्या स्थानबद्धतेच्या आदेशानुसार एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात आले असेल त्याबाबतीत, संसदेने त्यासंबंधात केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली विनिर्दिष्ट करण्यात येईल असे उच्च न्यायालय, असा आहे.

(५) प्रतिबंधक स्थानबद्धतेची तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली दिलेल्या आदेशानुसार कोणत्याही व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात आले असेल तेव्हा आदेश देणारा प्राधिकारी, ज्या कारणांवरून तो आदेश दिला गेला आहे ती कारणे, शक्य तितक्या लवकर, अशा व्यक्तीला कळवेल आणि त्या आदेशाविरुद्ध आपले अभिवेदन करण्याची तिला लवकरात लवकर संधी देईल.

(६) खंड (५) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, त्या खंडात निर्दिष्ट केलेला असा कोणताही आदेश देणाऱ्या प्राधिकाऱ्यास, जी तथ्ये प्रकट करणे सार्वजनिक हिताच्या विरोधी वाटेल ती तथ्ये प्रकट करणे अशा प्राधिकाऱ्यास आवश्यक असणार नाही.

(७) (क) प्रतिबंधक स्थानबद्धतेची तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली कोणत्याही एका वा अनेक वर्गातील प्रकरणी कोणत्याही व्यक्तीला जितका काळ स्थानबद्ध करता येईल तो कमाल कालावधी; आणि

(ख) खंड (४) याखालील चौकशीत सल्लागार मंडळाने अनुसरावयाची कार्यपद्धती, संसदेस कायद्याद्वारे विहित करता येईल.

### Case Law

**1) Farooq Ahamad Malik v. State & Oth. 2005, CRLJ 271**

- आरोपीच्या भाषेत स्थानबद्धतेची कारणे पुरवली पाहिजे.

**2) Abdul Razzak v. Union of India, 1986 (88), BLR 158**

- चौकशीच्या वेळी आपला वकील हजर ठेवता येतो.

**3) Hansmukh v. State of Gujrath, AIR,1981, SC28**

- अटकेच्या कारणांची माहिती देणे.

### (III) शोषणाविरुद्ध हक्क (कलम २३ ते २४)

(Right Against Exploitation)

**(१) कलम २३. माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई :-**

(१) माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे आणि या तरतुदींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

(२) सार्वजनिक प्रयोजनाकरिता सेवा करायला लावण्यास राज्याला या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही व अशी सेवा करावयास लावताना केवळ धर्म, वंश, जात वा वर्ग या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरून राज्य कोणताही भेदभाव करणार नाही

### Case Law -

**1) Vishaljeet v. Union of India, AIR1990, SC1412**

माणसांच्या व्यापारांमध्ये देवदासींचा सामावेश होतो.

**२) कलम २४ - कारखाने इत्यादींमध्ये बालकांना कामाला ठेवण्यास मनाई :-**

चौदा वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात वा खाणीत काम करण्यासाठी नोकरीत ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोक्याच्या कामासाठी त्यास लावले जाणार नाही.

**(IV) धर्मस्वातंत्र्याचा हक्क कलम (२५ ते २८)**

(Right To Freedom Of Religion)

**(१) कलम २५– सदसद्‌विवेक बुद्धी स्वातंत्र्य आणि धर्मांचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रचार :–**

(१) सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांच्या व या भागातील अन्य तरतुदींच्या अधीनतेने, सद्‌सद्‌विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्याला आणि धर्म मुक्तपणे प्रकट करण्याच्या, आचरण्याच्या व त्याचा प्रचार करण्याच्या अधिकाराला सर्व व्यक्ती सारख्याच हक्कदार आहेत.

(२) या या कलमातील कोणत्याही बाबीमुळे,

(क) धर्माचरणाशी निगडित असेल अशा कोणत्याही आर्थिक, वित्तीय, राजनैतिक वा अन्य धार्मिकतर कार्याचे विनियमन करणाऱ्या किंवा त्यावर निर्बंध घालणाऱ्या :

(ख) सामाजिक कल्याण व सुधारणा याबाबत अथवा सार्वजनिक स्वरूपाच्या हिंदू धार्मिक संस्था, हिंदूंचे सर्व वर्ग व पोट–भेद यांना खुल्या करण्याबाबत तरतूद करणाऱ्या,

कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही किंवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

**स्पष्टीकरण :**

एक – कृपाण धारण करणे व स्वत:बरोबर बाळगणे हे शीख धर्माच्या प्रकटीकरणात समाविष्ट असल्याचे मानले जाईल.

**स्पष्टीकरण :**

दोन – खंड (२) च्या उपखंड (ख) मध्ये हिंदू या शब्दोल्लेखात शीख, जैन व बौद्ध धर्म प्रकट करणाऱ्या व्यक्तींचा उल्लेख समाविष्ट आहे असा त्याचा अर्थ लावला जाईल, आणि हिंदू धार्मिक संस्थांच्या उल्लेखांचा अर्थही तद्‌नुसार लावला जाईल.

**(२) कलम २६ – धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य :–**

सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांच्या अधीनतेने प्रत्येक धार्मिक संप्रदायास अथवा त्यांच्यापैकी कोणत्याही गटास,

(क) धार्मिक व धर्मादायी प्रयोजनांकरिता संस्थांची स्थापना करून त्या स्वखर्चाने चालविण्याचा;

(ख) धार्मिक बाबींमध्ये आपल्या व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचा;

(ग) जंगम व स्थावर मालमत्ता मालकीची असण्याचा व ती संपादन करण्याचा;

(घ) कायद्यानुसार अशा मालमत्तेचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

**(३) कलम २७ – एखाद्या विशिष्ट धर्माच्या संवर्धनाकरिता कर देण्याबाबत स्वातंत्र्य :–**

ज्याचे उत्पन्न एखाद्या विशिष्ट धर्माचे अथवा धार्मिक संप्रदायाचे संवर्धन करण्यासाठी किंवा तो चालू ठेवण्यासाठी विनिर्दिष्टपणे विनियोजित केलेले आहे, असे कोणतेही कर देण्याची कोणत्याही व्यक्तीवर सक्ती केली जाणार नाही.

**(४) कलम २८ – विवक्षित शैक्षणिक संस्थात धार्मिक शिक्षण अथवा धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र्य :–**

(१) पूर्णत: राज्याच्या पैशातून चालवल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.

(२) जी शैक्षणिक संस्था राज्याकडून प्रशासली जात असेल परंतु धार्मिक शिक्षण देणे आवश्यक करणारा कोणताही दाननिधी किंवा न्यास याखाली ती स्थापन झालेली असेल तिला खंड (१) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(३) राज्याने मान्यता दिलेल्या किंवा राज्याच्या पैशातून साहाय्य मिळत असणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत जे काही धार्मिक शिक्षण दिले जाईल, त्यात भाग घेण्यास अथवा अशा संस्थेत किंवा तिच्याशी संलग्न असलेल्या कोणत्याही जागेत, जी काही धार्मिक उपासना चालविली जाईल, तिला उपस्थित राहण्यास, अशा संस्थेत जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा अशी व्यक्ती अज्ञान असल्यास तिच्या पालकाने, आपली संमती दिली असल्याखेरीज अशा व्यक्तीस तसे करणे आवश्यक केले जाणार नाही.

**(V) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क कलम २९ ते ३०**

(Cultural and Educational Rights)

**(१) कलम २९ – अल्पसंख्याक वर्गांच्या हितसंबंधांचे संरक्षण :–**

(१) भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वत:ची वेगळी भाषा लिपी वा संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा हक्क असेल.

(२) राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्य निधीतून साहाय्य मिळत असलेल्या कोणतयाही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म वंश जात भाषा या किंवा यांपैकी कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

**Case Law -**

1) Ahamadabad St.xeviour college society v. State of Gujrath, AIR 1974, SC1389

सांस्कृतिक व शैक्षणिकदृष्ट्या अल्पसंख्याक समाजाच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याचा त्यांना अधिकार आहे.

**(२) कलम ३० – अल्पसंख्याक वर्गांचा शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क :–**

१) धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

(१ क) खंड १ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे एखाद्या अल्पसंख्याक वर्गाने स्थापन केलेल्या व प्रशासलेल्या शैक्षणिक संस्थेची कोणतीही मालमत्ता सक्तीने संपादन करण्याची तरतूद करणारा कोणताही कायदा करताना राज्य, अशा मालमत्तेच्या संपादनाबद्दल अशा कायद्याने निश्चित केलेल्या किंवा त्याखाली ठरवलेल्या रकमेमुळे, त्या खंडाखाली हमी दिलेला अधिकार निर्बंधित किंवा निराकृत होणार नाही, अशा प्रकारची ती रक्कम आहे, याबद्दल खात्री करून घेईल.)

२) शैक्षणिक संस्थाना साहाय्य देताना राज्य, एखादी शैक्षणिक संस्था ही, धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या एखाद्या वर्गाच्या व्यवस्थापनाखाली आहे, या कारणावरून तिला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

**Case Law -**

**- Usha Mehta v. State of Maharashtra, 2005 (1), MLJ1(SC)**

शाळेमध्ये प्रांतीय भाषेची सक्ती कलम ३० चे उल्लंघन नाही.

**(VI) संविधानिक उपाय योजण्याचा हक्क कलम (३२ ते ३५)**

(Right To Constitutional Remedies )

**(१) कलम ३२ – या भागाने प्रदान केलेले हक्क बजावण्याकरिता उपाय :-**

(१) या भागाने प्रदान केलेले हक्क बजावण्याकरिता समुचित कार्यवाहीद्वारे सर्वोच्च न्यायालयास अर्ज विनंती करण्याच्या हक्काची हमी देण्यात आली आहे.

(२) या भागाने प्रदान केलेल्या हक्कांपैकी कोणताही हक्क बजावण्याकरिता समुचित असतील ते ते निदेश अथवा हेबियस कॉर्पस (देहोपस्थिति), मँडॅमस (महादेश), प्रोहिबिशन (प्रतिषेध), को वारंटो (क्वाधिकार) व सर्शिओराराय (प्राकर्षण) या स्वरूपाच्या प्राधिलेखांसह प्राधिलेख काढण्याचा सर्वोच्च न्यायालयास अधिकार असेल.

(३) खंड (१) व (२) द्वारे सर्वोच्च न्यायालयास प्रदान केलेल्या अधिकारांना बाध न येतो, खंड (२) खाली सर्वोच्च न्यायालयाला वापरता येतील असे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही अधिकार अन्य कोणत्याही न्यायालयाला आपल्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत वापरण्यास संसद कायद्याद्वारे अधिकार प्रदान करू शकेल.

(४) या संविधानाने अन्यथा तरतूद केलेली असेल तेवढी वगळता, या अनुच्छेदाने हमी दिलेला हक्क निलंबित केला जाणार नाही.

**घटनात्मक अधिकाराचे महत्त्व :**

भारतीय नागरिकांना जे मूलभूत अधिकार दिलेले आहेत त्यांचे संरक्षण करण्यासाठी या कलमाचा उपयोग होतो. नागरिकांच्या अधिकारांचे योग्यप्रकारे संरक्षण होत नसेल, अधिकारांवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींवर योग्य ती कारदेशीर कारवाई होत नसेल. तर अशा मूलभूत अधिकारांचा उपयोग होत नसतो; ते निरुपयोगी ठरतात. मूलभूत अधिकारावर झालेले अतिक्रमण दूर करण्यासाठी या कलमाच्या आधारे सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. न्यायालयाद्वारे नागरिकांच्या अर्जाचा विचार करून त्याबाबत आज्ञा काढल्या जातात. ''घटनात्मक उपायांचा अधिकार हा आमच्या राज्यघटनेचा आत्मा आणि हृदय आहे'', असे डॉ. आंबेडकर म्हणतात.

आपल्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकाला न्यायालयाकडे पुढील पाच प्रकारचे अर्ज करता येतात.

**१. बंदीप्रत्यक्षीकरण (Habeas Corpus)**

हेबीयस कॉर्पस हा लॅटिन शब्द आहे. त्याचा अर्थ आम्हाला शरीर द्या ( Let us have the body) इंग्लंड मध्ये हा कायदा १६७९ मध्ये पास झाला. त्यामुळे मानवी स्वातंत्र्याचे संरक्षण झाले. भारतीय संविधान निर्मात्यांनी व्यक्तींच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी हेबीयस कॉर्पस ही आज्ञा मान्य केली. कोणत्याही व्यक्तीला बेकायदेशीर अटक झाली असेल अन्यायपूर्वक दंड केला असेल. अथवा बेकायदेशीर अडकवून ठेवले तर आपल्या अटकेच्या कारणा संबंधी विचारणा करण्याचा अर्ज ती व्यक्ती स्वतः किंवा त्या व्यक्तीचे नातेवाईक अगर मित्रमंडळी करू शकतात. हा अर्ज उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयात करता येतो.

हा अर्ज न्यायालयाने मान्य केल्यास अटक व्यक्तीला न्यायालयासमोर उभे करण्याची आज्ञा न्यायालय देते. तिच्यावर झालेल्या अन्यायाची चौकशी न्यायालय करते. व्यक्तीची अटक बेकायदेशीर आहे असे न्यायालयाद्वारे सिद्ध झाल्यास व्यक्तीची सुटका करण्याचा आदेश न्यायालय देते.

या अर्जाच्या तरतुदीमुळे कोणत्याही व्यक्तीला सरकार अगर कोणतीही संस्था बेकायदेशीररीत्या अटकेत ठेवू शकत नाही.

## Case Law -

1) Rudal Shah v. State of Bihar, AIR 1983, SC 1086
2) Bhimsingh v. State of J&K, AIR 1986, SC 494

**२. परमादेश (Mandamus)**

या लॅटिन शब्दाचा अर्थ आम्ही आज्ञा देतो – We Command – असा होतो. या आज्ञाद्वारे कोणत्याही व्यक्तीला अगर संस्थेला तिचे कर्तव्यपालन करण्याची आज्ञा दिली जाते.

सरकार एखादी व्यक्ती किंवा संस्था आपल्या कर्तव्याचे पालन करीत नसेल त्यामुळे एखाद्या व्यक्तीवर अन्याय झाला असेल तर या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी त्या व्यक्तीने असा अर्ज उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाकडे करावयाचा असतो. हा अर्ज न्यायालयाने मान्य केल्यास तो अन्याय ताबडतोब नाहीसा करावा अशी आज्ञा न्यायालय अन्याय करणाऱ्या व्यक्तीला, संस्थेला अगर सरकारला देते. उदाः फॅक्टरी ॲक्टप्रमाणे मजुराला नुकसानभरपाई द्यावी लागते. परंतु ती देण्यासाठी टाळाटाळ मालक करीत असेल तर मँडॅमसचा अर्ज करता येतो आणि न्यायालयाने तो अर्ज मान्य केल्यास त्या मजुराला नुकसानभरपाई द्यावी अशी आज्ञा न्यायालय देते.

## Case Law

1) Gujarat State Financial Corporation v. Lotus Hotels (p) Ltd., AIR 1983, SC 848
2) Majula Manjari v. Director of Publib Instructions, AIR 1952, Ori. 344

### ३. प्रतिषेध (Prohibition)

एखादा खटला कनिष्ठ न्यायालयात चालू असताना काही अनियमित कारणांमुळे निर्णय घेणे इष्ट वाटत नसल्यास अथवा कनिष्ठ न्यायालयाला तो खटला चालविण्याचा कायदेशीर अधिकार नसल्यास त्या खटल्याची सुनावणी तहकूब करावी असा विनंतीअर्ज व्यक्तीला वरिष्ठ न्यायालयाकडे करता येतो. वरिष्ठ न्यायालय त्या अर्जावर विचार करते आणि तो खटला कनिष्ठ न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाहेर आहे, अशी खात्री झाल्यास त्याची सुनावणी संबंधित कनिष्ठ न्यायालयाने बंद करावी असा आदेश कनिष्ठ न्यायालयाला वरिष्ठ न्यायालय देते.

अशा रीतीने देण्यात आलेल्या प्रतिषेध आज्ञेची उपेक्षा कोणी करत असेल तर तो न्यायालयाची बेअदबी केल्याचा गुन्हा ठरतो. कनिष्ठ न्यायालयाने त्याच खटल्यातील आपला निर्णय बदलविला असेल किंवा रद्द केला असेल किंवा त्या न्यायाधीशाचे हितसंबंध विशिष्ट खटल्यात गुंतले असतील तरीही प्रतिषेध अर्ज करता येतो.

या अर्जामुळे न्यायाधीशांना आपल्या अधिकारक्षेत्रामध्येच कार्य करावे लागते.

### ४. पृच्छा अधिकार (Quo-Warranto)

कोणतेही सरकारी अगर सार्वजनिक पद - पात्रता नसतानाही जर कोणी व्यक्ती ते पद भूषवीत असेल तर त्या व्यक्तीच्या पदग्रहण करण्याविषयीची पृच्छा करण्याचा अधिकार व्यक्तीला आहे. परंतु अशा वेळी अर्जदाराने पुढील दोन अटी पूर्ण केल्या पाहिजे.

अ) ज्या पदाचेबाबत वाद चालू असेल त्या पदाशी त्या व्यक्तीचे हितसंबंध गुंतलेले असावे.

ब) ते पद कायम स्वरूपाचे असून ते पद प्राप्त करणाऱ्या व्यक्तीला कोणाच्याही इच्छेने काढून टाकता येणारे नसावे.

न्यायालयाने अर्ज मान्य केल्यास बेकायदेशीरपणे पद धारण करणाऱ्या व्यक्तीला ते पद सोडण्याची आज्ञा न्यायालय देते. त्याला Writ of Quo-Warranto असे म्हणतात.

## Case Law

1) K. Bhima Raju v. State of Andhra Pradesh, AIR 1981, AP 24
2) Lakhan Pal v. A.N.Ray, AIR 1975, Del.66

### ५. उत्प्रेक्षण (Certioraari)

कनिष्ठ न्यायालयाकडे चालणारा खटला वरिष्ठ न्यायालयाने चालवावा अशी विनंती करणारा अर्ज याला उत्प्रेक्षण असे म्हणतात. असा अर्ज वरिष्ठ न्यायालयात मान्य केल्यास, ते न्यायालय, कनिष्ठ न्यायालयाला संबंधित कागदपत्रे सादर करण्याची आज्ञा देते. कनिष्ठ न्यायालय एखादा खटला चालवण्यास असमर्थ आहे असे वरिष्ठ न्यायालयाला आढळून आल्यास न्यायदान कार्य लवकर, योग्य व्हावे ह्याच दृष्टीने असा आदेश वरिष्ठ न्यायालय देते. प्रतिषेध अर्ज हा प्रतिबंधक स्वरूपाचा असतो तर उत्प्रेक्षण अर्ज खालच्या कोर्टातील खटला वरिष्ठ न्यायालयात चालवावा ह्या संबंधी असतो.

**Case Law**

1) A.K. Kripak v. Union of India, AIR 1970, SC 150

2) Hari Vishnu v. Syed Ahmed, AIR 1955, SC 233

**(२) कलम ३३ – या भागाने प्रदान केलेले हक्क हे सेना, इत्यादींना लागू करताना, त्यामध्ये फेरबद्दल करण्याचा संसदेस अधिकार :–**

या भागाने प्रदान केलेले हक्क –

(क) सशस्त्र सेनादलांचे सदस्य, किंवा

(ख) ज्यांच्यावर सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आहे अशा दलांचे सदस्य, किंवा

(ग) राज्याने, गुप्तवार्ता किंवा प्रतिगुप्तवार्ता यांच्या प्रयोजनार्थ, स्थापन केलेला ब्यूरो किंवा इतर संस्था यामध्ये नेमलेल्या व्यक्ती, किंवा

(घ) खंड (क) ते (ग) यामध्ये निर्देशित केलेले कोणतेही दल, ब्यूरो किंवा संघटना यांच्या कामासाठी उभारलेल्या दूरसंचार यंत्रणेमध्ये किंवा त्यासंबंधात नेमलेल्या व्यक्ती यांना लागू करताना निश्चितपणे त्यांच्या कर्तव्यांचे योग्यप्रकारे पालन व्हावे व त्यांच्यामध्ये शिस्त राखली जावी यासाठी ते हक्क कोणत्या व्याप्तीपर्यंत निर्बंधित किंवा निराकृत करण्यात यावेत, हे संसदेला कायद्याद्वारे निर्धारित करता येईल.

**(३) कलम ३४ – एखाद्या क्षेत्रात लष्करी कायदा अंमलात असताना या भागाने प्रदान केलेल्या हक्कांवर निर्बंध :–**

या भागाच्या पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही असले तरी, भारताच्या राज्यक्षेत्रामध्ये जेथे लष्करी कायदा अंमलात होता अशा कोणत्याही क्षेत्रात सुव्यवस्था राखणे किंवा ती पूर्ववत प्रस्थापित करणे यासंबंधात संघराज्याच्या किंवा राज्याच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेल्या कोणत्याही कृतीबद्दल संसद कायद्याद्वारे केलेली शिक्षा, आदेशित समपहरण किंवा केलेली अन्य कृती विधिग्राह्य करू शकेल.

●●●

## प्रकरण - ३

# मूलभूत कर्तव्ये

# Fundamental Duties

**५१ – क. मूलभूत कर्तव्ये :–**

क) संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे;

ख) ज्यांमुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे;

ग) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्याचे संरक्षण करणे;

घ) देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे;

ड) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे;

च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मोल जाणून तो जतन करणे;

छ) वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे, आणि प्राणिमात्रांबद्दल दया–बुद्धी बाळगणे;

ज) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधक बुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे;

झ) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे;

त्र) राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे, ही प्रत्येक भारतीय नागरिकाची कर्तव्ये असतील.

ट) जे की, मुलांना शिक्षणाची संधी देण्यासाठी पालक किंवा पालनकर्ते असतील अथवा जेणेप्रमाणे वय वर्षे सहा ते चौदापर्यंत रखवाले असतील. **(८६ वी घटना दुरुस्ती, २००२)**

## Case Law

1) Bijoe Emmannuel v. State of Kerala,AIR 1987, SC 748

2) M.C. Mehta v. Union of India, (1983) 1, SCC 471

●●●

## प्रकरण - ४

# संकीर्ण

# (Miscellaneous)

**I) पोलिसांबाबत असलेल्या हक्कांची मर्यादा (Restriction on Rights of Police)**

**१) कलम ३३ (भाग तीन – या भागाने प्रदान केलेले हक्क हे सेना, इत्यादींना लागू करताना, त्यामध्ये फेरबदल करण्याचा संसदेस अधिकार) :–**

या भागाने प्रदान केलेले हक्क –

(क) सशस्त्र सेनादलांचे सदस्य, किंवा

(ख) ज्यांच्यावर सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आहे अशा दलांचे सदस्य, किंवा

(ग) राज्याने, गुप्तवार्ता किंवा प्रतिगुप्तवार्ता यांच्या प्रयोजनार्थ, स्थापन केलेला ब्यूरो किंवा इतर संस्था यामध्ये नेमलेल्या व्यक्ती, किंवा

(घ) खंड (क) ते (ग) यामध्ये निर्देशित केलेले कोणतेही दल, ब्यूरो किंवा संघटना यांच्या कामासाठी उभारलेल्या दूरसंचार यंत्रणेमध्ये किंवा त्यासंबंधात नेमलेल्या व्यक्ती, यांना लागू करतांना निश्चितपणे त्यांच्या कर्तव्यांचे योग्यप्रकारे पालन व्हावे व त्यांच्यामध्ये शिस्त राखली जावी यासाठी ते हक्क कोणत्या व्याप्तीपर्यंत निर्बंधित किंवा निराकृत करण्यात यावेत, हे संसदेला कायद्याद्वारे निर्धारित करता येईल.

**Case Law**

Delhi Police v. Union of India, AIR 1987, SC 379

कलम ३३, पोलीस फोर्सेस नियमांना कलम १९(१क) चे उल्लंघन होते म्हणून न्यायालयात आव्हान देता येत नाही. कारण संसदेची कलम ३३ खाली शक्तीही विधिग्राह्य मानली गेली आहे.

**II) संसदेची सभागृहे आणि त्यांचे सदस्य व समित्या यांचे अधिकार विशेषाधिकार इत्यादी आणि राज्य विधानमंडळे व त्यांचे सदस्य यांचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती**

(Powers & Privileges of MPs & MLAs (Articles 105,194)

**१) कलम १०५. संसदेची सभागृहे आणि त्यांचे सदस्य व समित्या यांचे अधिकार विशेषाधिकार इत्यादी :–**

१) या संविधानाच्या तरतुदी अणि संसदेच्या कार्यपद्धतीचे विनियमन करणारे नियम व स्थायी आदेश यांना अधीन राहून संसदेत भाषणस्वातंत्र्य असेल.

२) संसदेचा कोणताही सदस्य, संसदेत किंवा तिच्या कोणत्याही समितीत त्यांने केलेल्या कोणत्याही वक्तव्याचा किंवा त्याने केलेल्या कोणत्याही मतदानाच्या बाबतीत, कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस पात्र होणार नाही, आणि कोणतीही व्यक्ती संसदेच्या दोहोपैकी कोणत्याही सभागृहाच्या प्राधिकाराअन्वये किंवा त्याखाली कोणताही अहवाल, कागदपत्र, मतदान किंवा कामकाजवृत्त यांच्या प्रकाशनाबाबत याप्रमाणे पात्र होणार नाही.

३) अन्य बाबतीत, संसदेचे प्रत्येक सभागृह आणि प्रत्येक सभागृहाचे सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषधिकार व उन्मुक्ती या, संसद, कायद्याद्वारे वेळोवेळी निश्चित करील अशा असतील. आणि त्याप्रमाणे निश्चित होईपर्यंत, त्या,

सभागृहाला आणि त्याच्या सदस्यांना आणि समित्यांना संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७८ याचे कलम १५ अंमलात येण्याच्या लगतपूर्वी जशा होत्या तशा असतील.

४) खंड (१), (२) व (३) यांच्या तरतुदी जशा संसदेच्या सदस्यांच्या संबंधात लागू आहेत तशा त्या, या संविधानाच्या आधारे संसदेच्या कोणत्याही सभागृहात किंवा तिच्या कोणत्याही समितीत भाषण करण्याचा व अन्यथा तिच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींच्या संबंधात लागू असतील.

## Case Law

कॅप्टन वीरेंद्र कुमार वि. शिवराज पाटील स्पीकर, लोकसभा. १९९४, बी.सी.जे. ४९६

या केसप्रमाणे आणि कलम १०५ प्रमाणे लोकसभेला निर्णय घेण्याचे सार्वभौम अधिकार आहेत. जर काही सभासद मतदान करताना मुद्दाम गैरहजर असतील तर अशा राजकीय निर्णयाच्या बाबतीत कोर्ट हस्तक्षेप करू शकत नाही.

**२) कलम १९४. विधानमंडळाची सभागृहे आणि त्यांचे सदस्य व समित्या यांचे अधिकार विशेषाधिकार, इत्यादी :–**

(१) या संविधानाच्या तरतुदी आणि विधानमंडळाच्या कार्यपद्धतीचे विनियमन करणारे नियम व स्थायी आदेश यांना अधीन राहून, प्रत्येक राज्याच्या विधानमंडळास भाषणस्वातंत्र्य असेल.

(२) राज्य विधानमंडळाचा कोणताही सदस्य, विधानमंडळात किंवा त्याच्या कोणत्याही समितीत त्याने केलेल्या कोणत्याही वक्तव्याच्या किंवा त्याने केलेल्या कोणत्याही मतदानाच्या बाबतीत, कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस पात्र होणार नाही, आणि कोणतीही व्यक्ती अशा विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या प्राधिकारान्वये किंवा त्याखाली प्रकाशित झालेला कोणताही अहवाल, कागदपत्र, मतदान किंवा कामकाजवृत्त याच्या प्रकाशनाबाबत याप्रमाणे कार्यवाहीस पात्र होणार नाही.

(३) अन्य बाबतीत, राज्य विधानमंडळाचे सभागृह आणि अशा विधानमंडळाच्या सभागृहाचे सदस्य व समित्या, यांचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती या, ते विधानमंडळ कायद्याद्वारे वेळोवेळी निश्चित करील अशा असतील, आणि याप्रमाणे निश्चित होईपर्यंत, (त्या सभागृहाला आणि त्याच्या सदस्यांना आणि समित्यांना संविधान चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७८ याचे कलम २६ अंमलात येण्याच्या लगतपूर्वी जशा होत्या तशा असतील.)

(४) खंड (१), (२) व (३) यांच्या तरतुदी जशा राज्य विधानमंडळाच्या सदस्यांच्या संबंधात लागू आहेत तशा त्या, या संविधानाच्या आधारे त्या विधानमंडळाच्या सभागृहात किंवा तिच्या कोणत्याही समितीत भाषण करण्याचा व अन्यथा तिच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींच्या संबंधात लागू असतील.

**III) २) कलम २२६. विवक्षित प्राधिलेख काढण्याचे उच्च न्यायालयांचे अधिकार :–**

(१) कलम ३२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी प्रत्येक न्यायालयाला, ज्यांच्यासंबंधी ते अधिकारिता वापरते त्या राज्यक्षेत्रांमध्ये सर्वत्र, त्या राज्यक्षेत्रांतील कोणत्याही व्यक्तीला किंवा प्राधिकाऱ्याला, तसेच योग्य प्रकरणी कोणत्याही शासनालासुद्धा उद्देशून (भाग तीन याद्वारे प्रदान केलेल्यांपैकी कोणत्याही हक्काची बजावणी करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी निदेश, आदेश अथवा हेबियस कॉर्पस(देहोपस्थिती), मँडॅमस (महादेश), प्रोहिबिशन (प्रतिषेध), को–वॉरंटी (क्वाधिकार) व सर्शिओराराय (प्राकर्षण) या स्वरूपाच्या प्राधिलेखांसह प्राधिलेख किंवा त्यांपैकी कोणतेही प्राधिलेख काढण्याचा अधिकार असेल.)

(२) कोणत्याही शासनाला, प्राधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला उद्देशून निदेश, आदेश किंवा प्राधिलेख काढण्याचा खंड (१) द्वारा प्रदान केलेला अधिकार, अशा अधिकाराच्या वापरासाठी लागणारे वादकारण पूर्णत: किंवा अंशत: जेथे उद्भवते, त्या राज्यक्षेत्रांच्या संबंधात अधिकारिता वापरणाऱ्या कोणत्याही उच्च न्यायालयालाही वापरता येण्यासारखा असेल– मग असे शासन किंवा प्राधिकारी यांचे कार्यस्थान किंवा अशा व्यक्तीचे निवासस्थान त्या राज्यक्षेत्रांमध्ये नसले तरी हरकत नाही.

(३) ज्या कोणत्याही पक्षकाराविरुद्ध खंड (१) खालील विनंती अर्जावर किंवा त्यासंबंधीतील कोणत्याही कार्यवाहीमध्ये, त्यादेशाच्या किंवा स्थगितीच्या रूपात किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेचा अंतरिम आदेश काढलेला असून,–

(क) अशा पक्षकराला अशा विनंतीअर्जाच्या व अशा अंतरिम आदेशाबाबतच्या विनंतीला पुष्टीकारक असणाऱ्या सर्व दस्तऐवजांच्या प्रती पुरवल्या नसतील; आणि

(ख) अशा पक्षकाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिलेली नसेल त्या पक्षकाराने अशा आदेशाच्या विलोपनासाठी उच्च न्यायालयाकडे अर्ज केला व अशा अर्जाची एक प्रत, ज्याच्या बाजूने असा आदेश काढण्यात आलेला असेल त्या पक्षकाराला किंवा अशा पक्षकाराच्या समुपदेशीला पुरवली तर त्या बाबतीत, उच्च न्यायालय ज्या दिनांकास अर्ज मिळेल तो दिनांक किंवा ज्या दिनांकास अशा अर्जाची प्रत अशा रीतीने पुरवण्यात येईल तो दिनांक, यांपैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून दोन आठवड्यांच्या कालावधीच्या आत, अथवा त्या कालावधीच्या शेवटच्या दिवशी उच्च न्यायालय बंद असेल तर त्यानंतर जेव्हा उच्च न्यायालय चालू असेल असा पुढचा दिवस समाप्त होण्यापूर्वी त्या अर्जाचा निकाल करील : आणि जर अर्जाचा अशा रीतीने निकाल करण्यात आला नाही तर, अंतरिम आदेश तो कालावधी समाप्त होताच, किंवा यथास्थिती, उक्त पुढचा दिवस समाप्त होताच विलोपित होईल.

(४) या कलमाद्वारे उच्च न्यायालयाला प्रदान करण्यात आलेला अधिकार हा, कलम ३२, खंड (२) द्वारे सर्वोच्च न्यायालयाला प्रदान केलेल्या अधिकाराला न्यूनकारी असणार नाही.

**Case Law-**

1) N.G. Joshi v. Muncipal Corporation Kalyan & Dombiwali
AIR 2005, SC 34
2) State of UP v. Ram sukhi devi, AIR 2005, SC 284
3) Hari Bhai Hora v. Keshu Bhai Hora, AIR 2005, Guj.157

## IV) संघराज्य आणि राज्ये यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सेवा

## Service under union and State

**१) कलम ३०८. अर्थ लावणे :–**

या भागात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर, राज्य या शब्दप्रयोगात जम्मू व काश्मीर या राज्याचा समावेश होत नाही.

**२) कलम ३०९. संघराज्य किंवा राज्य यांच्या सेवेत असणाऱ्या व्यक्तींची भरती आणि त्यांच्या सेवाशर्ती :**

या संविधानाच्या तरतुदींना अधीन राहून, समुचित विधानमंडळाच्या अधिनियमांद्वारे संघराज्याच्या किंवा कोणत्याही राज्याच्या कारभारासंबंधातील लोकसेवांमध्ये आणि लोक पदांवर करावयाची भरती व तेथे नियुक्ती केल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या सेवाशर्ती यांचे विनियमन करता येईल.

परंतु, संघराज्याच्या कारभारासंबंधातील सेवा व पदे यांच्याबाबतीत राष्ट्रपती, किंवा तो निदेश देईल अशी व्यक्ती, आणि राज्याच्या कारभारासंबंधातील सेवा व पदे यांच्या बाबतीत राज्यपाल किंवा तो निदेश देईल अशी व्यक्ती, या अनुच्छेदाखालील समुचित विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली त्याबाबत तरतूद केली जाईपर्यंत, अशा सेवांमध्ये व पदांवर करावयाची भरती व तेथे नियुक्त केल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या सेवाशर्ती यांचे विनियमन करणारे नियम करण्यास सक्षम असेल, आणि याप्रमाणे केलेले कोणतेही नियम अशा कोणत्याही अधिनियमाच्या तरतूदींना अधीन राहून प्रभावी होतील.

**३) कलम ३१०. संघराज्य किंवा राज्य यांच्या सेवेत असणाऱ्या व्यक्तींच्या पदावधी :–**

(१) या संविधानामध्ये स्पष्टपणे तरतूद केली असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, जी जी व्यक्ती संघराज्याची संरक्षण सेवा

किंवा नागरी सेवा किंवा अखिल भारतीय सेवा यांची सदस्य असेल अथवा संघराज्याच्या अधीन असलेले, संरक्षणाशी संबद्ध असे कोणतेही पद किंवा त्याच्या अधीन असलेले कोणतेही पद किंवा त्याच्या अधीन असलेले कोणतेही नागरी पद धारण करीत असेल अशी प्रत्येक व्यक्ती, राष्ट्रपतीची मर्जी असेल तोवर ते पद धारण करील, आणि जी जी व्यक्ती राज्याच्या नागरी सेवेची सदस्य असेल किंवा राज्याच्या नियंत्रणाखाली असलेले कोणतेही नागरी पद धारण करत असेल अशी प्रत्येक व्यक्ती, राज्याच्या राज्यपालाची मर्जी असेल तोवर पद धारण करील.

**४) कलम ३११. संघराज्य किंवा राज्य यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या नागरी पदांवर सेवानियुक्त केलेल्या व्यक्तींना बडतर्फ करणे, पदावरून दूर करणे किंवा पदावनत करणे :–**

(१) जी व्यक्ती संघराज्याच्या नागरी सेवेची किंवा अखिल भारतीय सेवेची किंवा राज्याच्या नागरी सेवेची सदस्य असेल, अथवा संघराज्य किंवा राज्य यांच्या नियंत्रणाखाली असलेले नागरी पद धारण करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, ज्या प्राधिकाऱ्याने तिची नियुक्ती केली होती त्याहून दुय्यम असलेल्या प्राधिकाऱ्याकडून बडतर्फ केले किंवा पदावरून दूर केले जाणार नाही.

(२) पूर्वोक्त अशा कोणत्याही व्यक्तीला, ज्या चौकशीमध्ये तिच्यावरील दोषारोपांची माहिती करून दिलेली आहे आणि त्या दोषारोपांबाबत तिला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिलेली आहे, अशी चौकशी झाल्याखेरीज तिला बडतर्फ केले जाणार नाही किंवा पदावरून दूर केले जाणार नाही किंवा पदावनत केले जाणार नाही :

परंतु, अशा चौकशीअंती, तिला अशी कोणतीही शास्ती देण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल त्याबाबतीत, अशा चौकशीमध्ये सादर केलेल्या पुराव्याच्या आधारावर अशी शास्ती देता येईल आणि अशा व्यक्तीला प्रस्तावित शास्तीविरुद्ध अभिवेदन करण्यासाठी कोणतीही संधी देण्याची आवश्यकता असणार नाही :

परंतु, आणखी असे की, हा खंड पुढील बाबतीत लागू होणार नाही

(क) एखादी व्यक्ती ज्यामुळे फौजदारी दोषारोपावरून दोषी ठरलेली आहे अशा वर्तनाच्या कारणावरून तिला बडतर्फ किंवा पदावरून दूर करण्यात आले असेल किंवा पदावनत करण्यात आले असेल त्याबाबतीत : किंवा

(ख) एखाद्या व्यक्तीस बडतर्फ किंवा पदावरून दूर करण्याचा किंवा तिला पदावनत करण्याचा अधिकार असलेल्सा प्राधिकाऱ्याला काही कारणास्तव–ते कारण त्या प्राधिकाऱ्याला नमूद करावे लागेल–अशी चौकशी करणे वाजवीपणे व्यवहार्य नाही, असे खात्रीपूर्वक वाटेल त्याबाबतीत: किंवा

(ग) अशी चौकशी करणे राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने समयोचित नाही असे राष्ट्रपतीला, किंवा यथास्थिति, राज्यपालाला खात्रीपूर्वक वाटेल त्याबाबतीत.

(३) जर पूर्वोक्त अशा कोणत्याही व्यक्तीबाबत खंड (२) मध्ये निर्दिष्ट केलेली अशी बडतर्फ किंवा पदावरून दूर करण्याचा किंवा तिला पदावनत करण्याचा अधिकार असलेल्या प्राधिकाऱ्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

**५) कलम ३१२. आखिल भारतीय सेवा :–**

(१) भाग सहा–प्रकरण सहा किंवा भाग अकरा यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यसभेने, उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या तिच्या सदस्यांपैकी कमीत कमी दोन–तृतीयांश सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या ठरावाद्वारे जर तसे करणे राष्ट्रहितार्थ आवश्यक किंवा समयोचित आहे असे घोषित केले असेल तर, संसदेला कायद्याद्वारे संघराज्य आणि राज्ये यांना सामाईक अशा एक किंवा अनेक अखिल भारतीय सेवा अखिल भारतीय न्यायिक सेवा धरून निर्माण करण्याची तरतूद करता येईल, आणि, या प्रकरणाच्या अन्य तरतूदींना अधीन राहून, अशा कोणत्याही सेवेत करावयाची भरती व तीमध्ये नियुक्त होणाऱ्या व्यक्तींच्या सेवाशर्ती यांचे विनियमन करता येईल.

(२) या संविधानाच्या प्रारंभी भारतीय प्रशासकीय सेवा आणि भारतीय पोलीस सेवा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सेवा संसदेने या अनुच्छेदाखाली निर्माण केलेल्या सेवा असल्याचे मानले जाईल.

(३) खंड (१) मध्ये उल्लेखिलेल्या अखिल भारतीय न्यायिक सेवेमध्ये, कलम २३६ मध्ये व्याख्या केलेल्या जिल्हा न्यायाधिशांच्या पदापेक्षा कनिष्ठ असलेल्या कोणत्याही पदाचा समावेश असणार नाही.

(४) पूर्वोक्त अखिल भारतीय न्यायिक सेवा निर्माण करण्यासाठी तरतूद करणाऱ्या कायद्यामध्ये, त्या कायद्याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असतील अशा, भाग सहा-प्रकरण सहा यात सुधारणा करणाऱ्या तरतुदी अंतर्भूत असतील आणि असा कोणताही कायदा हा, कलम ३६८ च्या प्रयोजनार्थ या संविधानाची सुधारणा असल्याचे मानण्यात येणार नाही.

**V) सातवी अनुसूची (Schedule 7)**

**i) सूची एक – संघ सूची (Union List)**

**१. भारत व त्याचा प्रत्येक भाग यांचे संरक्षण :-**

संरक्षणाची सिद्धता आणि युद्धकाळात युद्ध चालू ठेवण्यास व ते संपल्यानंतर परिणामकारकपणे सेनाविसर्जन करण्यास साधक होतील अशा सर्व कृती यांसह

**२. नौसेना, भूसेना व वायुसेना, संघराज्याची अन्य कोणतीही सशस्त्र सेना**

२-क. संघराज्याची कोणतीही सशस्त्र सेना किंवा संघराज्याच्या नियंत्रणाधीन असणारी अन्य कोणतीही सेना किंवा तिची कोणतीही तुकडी किंवा पथक कोणत्याही राज्यामध्ये मुलकी सत्तेच्या साहाय्यार्थ प्रतियोजित करणे : याप्रमाणे प्रतियोजन केलेले असतानाच्या काळातील अशा सेनेच्या सदस्यांचे अधिकार, अधिकारिता, विशेषाधिकार आणि दायित्वे

३. छावणी क्षेत्रांचे परिसीमन, अशा क्षेत्रांतील स्थानिक स्वराज्य संस्था, छावणी प्राधिकरणांची घटना व अशा क्षेत्रांतील त्यांचे अधिकार आणि अशा क्षेत्रांतील निवासव्यवस्थेचे (भाडेनियंत्रणासह) विनियमन.

४. नौसैनिकी, भूसैनिकी व वायुसैनिकी कामे.

५. शस्त्रे, अग्निशस्त्रे, दारूगोळा आणि स्फोटक पदार्थ.

६. अणुऊर्जा व तिच्या उत्पादनास आवश्यक असलेली खनिज साधनसंपत्ती.

७. संसदेने कायद्याद्वारे संरक्षणाच्या प्रयोजनार्थ किंवा युद्ध चालू ठेवण्याकरिता आवश्यक असल्याचे घोषित केलेले उद्योगधंदे.

८. केंद्रीय गुप्तवार्ता व अन्वेषण केंद्र

९. संरक्षण, परराष्ट्र व्यवहार किंवा भारताची सुरक्षितता यांच्याशी संबंधित कारणांकरिता प्रतिबंधक स्थानबद्धता : अशा स्थानबद्धतेत ठेवलेल्या व्यक्ती.

१०. परराष्ट्र व्यवहार, ज्यामुळे संघराज्याचा कोणत्याही परकीय देशाशी संबंध येतो अशा सर्व बाबी.

११. राजदौतिक, वाणिज्यदौतिक व व्यापारी प्रतिनिधित्व

१२. संयुक्त राष्ट्र संघटना

१३. आंतरराष्ट्रीय परिषदा, अधिसंघ व अन्य निकाय यामध्ये सहभागी होणे आणि तेथे झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे.

१४. परदेशांशी तह व करार करणे आणि परदेशांशी केलेले तह, करार व अभिसंधी यांची अंमलबजावणी करणे.

१५. युद्ध व शांतता.

१६. विदेशविषयक अधिकारिता.

१७. नागरिकत्व, नागरिकीकरण व अन्यदेशीय व्यक्ती.

१८. प्रत्यर्पण.

१९. भारतात प्रवेश देणे आणि तेथून उत्प्रवासन व निर्यापन : पारपत्रे व प्रवेशपत्रे.

२०. भारताबाहेरील स्थळांच्या तीर्थयात्रा.

२१. खुल्या सागरात किंवा हवेत केलेली चाचेगिरी व गुन्हे : भूमीवर किंवा खुल्या सागरात किंवा हवेत आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरुद्ध केलेले अपराध.

२२. रेल्वे.

२३. संसदेने केलेल्या कायद्याद्वारे किंवा त्याखाली राष्ट्रीय महामार्ग असल्याचे घोषित केलेले महामार्ग.

२४. यंत्रचलित जलयानांसंबंधी संसदेने कायद्याद्वारे राष्ट्रीय जलमार्ग असल्याचे घोषित केलेल्या अंतर्देशीय जलमार्गावरील नौपरिवहन व नौकानयन, अशा जलमार्गावरील पथनियम.

२५. सागरी नौपरिवहन व नौकानयन–भरती–ओहोटीच्या पाण्यावरील नौपरिवहन व नौकानयन यांसह, व्यापारी नाविकांच्या शिक्षणाची व प्रशिक्षणाची सोय आणि राज्ये व अन्य संस्था यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे व प्रशिक्षणाचे विनियमन.

२६. दीपगृहे – प्रकाशनौका, संकेतदीप आणि नौका व विमाने यांच्या सुरक्षिततेकरिता अन्य तरतुदी यांसह.

२७. संसदेने केलेला कायदा किंवा विद्यमान कायदा याद्वारे किंवा त्याखाली मोठी बंदरे असल्याचे घोषित केलेली बंदरे – त्यांच्या परिसीमनासह आणि त्यांतील बंदर प्राधिकरणाची घटना व त्यांचे अधिकार.

२८. बंदरावरील पृथकवास – त्याच्याशी संलग्न असलेली रुग्णालये यांसह खलाशांची व सागरी रुग्णालये.

२९. हवाईमार्ग विमाने व हवाई नौकानयन : विमानतळांची सोय, हवाई वाहतूक व विमानतळ यांचे विनियमन व सुसूत्र व्यवस्था, विमानसेवेच्या शिक्षणाची व प्रशिक्षणाची सोय आणि राज्ये व अन्य संस्था यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे व प्रशिक्षणाचे विनियमन.

३०. रेल्वेमार्ग, समुद्रमार्ग किंवा हवाईमार्ग किंवा यंत्रचालित जलयनांमधून राष्ट्रीय जलमार्गांनी उतारूंची व मालाची ने–आण.

३१. डाक व तार, दूरध्वनी, बिनतारी यंत्रे, ध्वनिक्षेपण व अन्य तत्सम स्वरूपाची दळणवळण साधने.

३२. संघराज्याची संपत्ती व तिच्यापासून मिळणारा महसूल, पण राज्यात असलेल्या संपत्तीसंबंधात, संसद कायद्याद्वारे अन्यथा तरतूद करील तेवढी मर्यादा खेरीजकरून त्या राज्याच्या विधिविधानाच्या अधीनतेने.

३३. संविधान (सातवी सुधारणा) अधिनियम १९५६ द्वारे वगळले.

३४. भारतीय संस्थानांच्या अधिपतींच्या संपदांकरिता पाल्याधिकरणे.

३५. संघराज्याचे लोकऋण.

३६. चलन, नाणेयोजना आणि वैध निविदा : परकीय चलन.

३७. विदेशी कर्जे.

३८. भारतीय रिझर्व्ह बँक.

३९. डाकघर बचत बँक.

४०. भारत सरकारने किंवा राज्य शासनाने आयोजित केलेल्या लॉटरी.

४१. परदेशांशी व्यापार व वाणिज्य, सीमाशुल्क सरहद्दीवरून आयात व निर्यात, सीमाशुल्क सरहद्दींची निश्चिती.

४२. आंतरराज्यीय व्यापार व वाणिज्य.

४३. बँकव्यवसायी, विमाव्यवसायी व वित्तीय नियम धरून व्यापारी निगमांचे विधिसंस्थापन, विनियमन व परिसमापन. पण यात सहकारी सोसायट्यांचा समावेश नाही.

४४. ज्यांची उद्दिष्टे एका राज्यापुरती मर्यादित नाहीत अशा निगमांचे.. मग ते व्यापारी असोत वा नसोत-विधिसमापन, विनियमन व परिसमापन-पण यामध्ये विद्यापीठांचा समावेश नाही.

४५. बँक व्यवसाय

४६ विनिमयपत्रे, धनादेश, वचनचिठ्या व अन्य तत्सम संलेख

४७. विमा

४८. रोखे - बाजार व वायदे बाजार

४९. पेटंटस्, नवशोध व संकल्पचित्रे : कॉपीराईट, व्यापारचिन्हे व पण्यचिन्हे.

५०. वजने व मापे यांची मानके प्रस्थापित करणे

५१. भारतातून निर्यात करावयाच्या किंवा एका राज्यातून दुसऱ्या राज्यात वाहतूक करावयाच्या मालाच्या प्रतीची मानके प्रस्थापित करणे.

५२. ज्यांचे नियंत्रण सार्वजनिक हितार्थ संघराज्याकडून होणे समयोचित आहे असे संसदेने कायद्याद्वारे घोषित केले असेल ते उद्योगधंदे.

५३. तेलक्षेत्रे व खनिज तेलाची साधनसंपत्ती यांचे विनियमन व विकास, पेट्रोलियम व पेट्रोलियम उत्पादने, भयंकर ज्वालाग्रही असल्याचे संसदेने कायद्याद्वारे घोषित केलेले अन्य द्रव व घन पदार्थ.

५४. खाणीचे विनियमन व खनिज विकास ही जितक्या व्याप्तीपर्यंत सार्वजनिक हितार्थ संघराज्याच्या नियंत्रणाखाली असणे समयोचित आहे असे संसदेने कायद्याद्वारे घोषित केले असेल तेथवर असे विनियमन व विकास.

५५. खाणीतील व तेलक्षेत्रांतील श्रमिकांचे विनियमन व सुरक्षितता.

५६. आंतरराज्यीय नद्या व नद्यांची खोरी यांचे विनियमन व विकास ज्या व्याप्तीपर्यंत सार्वजनिक हितार्थ संघराज्याच्या नियंत्रणाखाली असणे समयोचित आहे असे संसदेने कायद्याद्वारे घोषित केले असेल तेथवर असे विनियमन व विकास.

५७. क्षेत्रीय जलधीच्या पलीकडील मच्छीमारी व मत्स्यक्षेत्रे.

५८. संघयी यंत्रणांच्याद्वारे मीठाचे उत्पादन, पुरवठा व वितरण, अन्य यंत्रणांच्याद्वारे होणारे मीठाचे उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन व नियंत्रण.

५९. अफूची लागवड, निर्मिती व निर्यातीसाठी विक्री.

६०. चलचित्रपटांना प्रदर्शनार्थ मंजुरी देणे. (जम्मू व काश्मीर राज्याला लागू नाही)

६१. संघराज्याच्या कर्मचाऱ्यांच्या संबंधातील औद्योगिक तंटे.

६२. या संविधानाच्या प्रारंभी राष्ट्रीय ग्रंथालय, भारतीय संग्रहालय, इम्पीरिअल युद्ध संग्रहालय, व्हिक्टोरिया स्मारक व भारतीय युद्ध स्मारक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्था आणि भारत सरकारकडून संपूर्णत: किंवा अशंत: जिचा खर्च चालवला जातो अशी व संसदेने कायद्याद्वारे राष्ट्रीय महत्त्वाची संस्था म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही तत्सम संस्था.

६३. या संविधानाच्या प्रारंभी बनारस हिंदू विद्यापीठ, अलीगढ मुस्लिम विद्यापीठ व ३ (दिल्ली विद्यापीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्था : अनुच्छेद ३७१ ड अनुसार झालेले विद्यापीठ) संसदेने कायद्याद्वारे राष्ट्रीय महत्त्वाची संस्था म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही संस्था.

६४. भारत सरकारकडून संपूर्णत: किंवा अंशत: ज्यांचा खर्च चालवला जातो व अशा संसदेने कायद्याद्वारे राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था म्हणून घोषित केलेल्या वैज्ञानिक किंवा तांत्रिक शिक्षणाच्या संस्था.

६५. (क) व्यवसायविषयक, व्यावसायिक किंवा तांत्रिक प्रशिक्षण – पोलीस अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण धरून : किंवा

(ख) विशेष अभ्यास किंवा संशोधन यांचे प्रवर्धन : किंवा

(ग) गुन्ह्याचे अन्वेषण किंवा तपास करण्याच्या कामी वैज्ञानिक तांत्रिक साहाय्य यांसाठी केंद्रीय अभिकरणे व संस्था.

६६. उच्च शिक्षणाच्या किंवा संशोधनाच्या संस्था आणि वैज्ञानिक व तांत्रिक संस्था यांमधील दर्जाचे समन्वयव निर्धारण.

६७. ५ (संसदेने केलेल्या कायद्याद्वारे किंवा त्याखाली) राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून घोषित केलेली प्राचीन व ऐतिहासिक स्मारकशिल्पे व अभिलेख आणि पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष.

६८. भारताचे सर्वेक्षण – भारताची भूशास्त्रीय, वनस्पतीशास्त्रीय, प्राणिशास्त्रीय आणि मानवशास्त्रीय सर्वेक्षण : हवामानशास्त्रीय संघटना.

६९. जनगणना.

७०. संघ लोकसेवा : अखिल भारतीय सेवा : संघ लोकसेवा आयोग.

७१. संघीय पेन्शने म्हणजे भारत सरकारकडून किंवा भारताच्या एकत्रित निधीतून प्रदेय असलेली पेन्शने.

७२. संसदेच्या, राज्यांच्या विधानमंडळाच्या आणि राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या पदांच्या निवडणुका, निवडणूक आयोग.

७३. संसदेचे सदस्य, राज्यसभेचा सभापती व उपसभापती आणि लोकसभेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे पगार व भत्ते.

७४. संसदेचे प्रत्येक सभागृह आणि प्रत्येक सभागृहाचे सदस्य व समित्या यांचे अधिकार, प्रवेशाधिकार व उन्मुक्ती संसदेच्या समित्यापुढे किंवा संसदने नियुक्त केलेल्या आयोगापुढे साक्ष देण्यासाठी किंवा दस्तऐवज दाखल करण्यासाठी व्यक्तींना उपस्थित राहण्यास भाग पाडणे.

७५. राष्ट्रपती व राज्यपाल यांच्या वित्तलब्धी, भत्ते, विशेषधिकार व अनुपस्थिती–रजेसंबंधीचे अधिकार, संघराज्याच्या मंत्र्यांचे पगार व भत्ते, नियंत्रक व महा लेखपरीक्षक याचा पगार, भत्ते व अनुपस्थिती – रजेसंबंधीचे अधिकार आणि अन्य सेवाशर्ती.

७६. संघराज्याच्या व राज्यांच्या लेख्यांची लेखापरीक्षा.

७७. सर्वोच्च न्यायालयाची घटना, रचना, अधिकारिता व अधिकार (अशा न्यायालयाच्या अवामानासंबंधाचे अधिकार धरून) आणि त्यात घेतल्या जाणाऱ्या फी, सर्वोच्च न्यायालयात व्यवसाय करण्यास हक्कदार असलेल्या व्यक्ती.

७८. उच्च न्यायालयांचे अधिकार व कर्मचारी याबाबतच्या तरतुदी खेरीजकरून उच्च न्यायालयांची घटना व रचना ७ (दीर्घ सुट्या धरून), उच्च न्यायालयात व्यवसाय करण्यास हक्कदार असलेल्या व्यक्ती.

७९. कोणत्याही संघ राज्यक्षेत्रावर एखाद्या उच्च न्यायालयाच्या अधिकारितेचे विस्तारण व त्यापासून उच्च न्यायालयाच्या अधिकारितेचे वर्जन.

८०. कोणत्याही राज्याच्या पोलीस दलांच्या सदस्यांच्या अधिकाराचे व अधिकारितेचे त्या राज्याबाहेरील कोणत्याही क्षेत्रावर विस्तारण – पण ज्यायोगे एका राज्याच्या पोलीस दलाला त्या राज्याबाहेरील कोणत्याही क्षेत्रात, ज्या राज्यात ते क्षेत्र असेल त्याच्या शासनाच्या अनुमतीशिवाय अधिकाराचा व अधिकारितेचा वापर करणे शक्य होईल अशाप्रकारे नव्हे. कोणत्याही राज्याच्या पोलीस दलाच्या सदस्यांच्या अधिकाराचे व अधिकारितेचे त्या राज्याबाहेरील रेल्वे क्षेत्रांवर विस्तारण.

८१. आंतरराज्यीय स्थलांतर, आंतरराज्यीय पृथकवास.

८२. कृषी–प्राप्तीहून अन्य प्राप्तीवरील कर.

८३. निर्यात शुल्कांसह सीमा शुल्के.

८४. भारतात निर्मिलेला किंवा उत्पादिलेला तंबाखू व अन्य माल यांवरील उत्पादनशुल्क –

(क) मानवी सेवनाकरिता मद्यार्कयुक्त दारू :

(ख) अफू, भांग, अन्य अंमली औषधीद्रव्ये व अंमली पदार्थ.

हे खेरीजकरून, पण मद्यार्काने किंवा या नोंदीच्या उपपरिच्छेद (ख) मध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही द्रव्याने युक्त असलेले औषधीय व प्रसाधन सिद्धपदार्थ धरून.

८५. निगम कर.

८६. व्यक्ती व कंपन्या यांच्या मत्तेच्या – शेतजमिनी वगळून – पुंजीगत मूल्यावरील कर, कंपन्यांच्या भांडवलावरील कर.

८७. शेतजमिनीहून अन्य मालमत्तेच्या संबंधातील संपदा शुल्क.

८८. शेतजमिनीहून अन्य मालमत्तेच्या उत्तराधिकाराच्या संबंधातील शुल्के.

८९. रेल्वेमार्ग, समुद्रमार्ग किंवा हवाईमार्ग यांद्वारे ने-आण केल्या जाणाऱ्या मालावरील किंवा उतारूंवरील सीमा कर, रेल्वे भाडी व वाहणावळी यांवरील कर.

९०. रोखे-बाजार व वायदे-बाजार यांमधील संव्यवहारांवरील मुद्रांक-शुल्कांसह अन्य कर.

९१. विनिमयपत्रे, धनादेश, वचनचिठ्या, भरणपत्रे, पतपत्रे, विमापत्रे, शेअर्सचे हस्तांतरण, ऋणपत्रे, परिपत्रे व पावत्या यांच्या संबंधातील मुद्राक शुल्कांचे दर.

९२. वृत्तपत्रांची विक्री किंवा खरेदी यांवरील व त्यांत प्रकाशित झालेल्या जाहिरातींवरील कर.

९२क. वृत्तपंत्राहून अन्य मालाची विक्री किंवा खरेदी जेथे आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात घडते तेथे, अशी विक्री किंवा खरेदी यांवरील कर

९२ख. आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यव्यवहार यांच्या ओघात मालाची पाठवणी करण्यात आली असेल तर, अशा मालाच्या पाठवणीवरील कर (मग असा माल तो पाठवणाऱ्या व्यक्तीकडेच पाठवण्यात आला असो वा अन्य कोणत्याही व्यक्तीकडे पाठवण्यात आला असो.)

९३. या सूचीत असलेल्यांपैकी कोणत्याही बाबीसंबंधीच्या कायद्यांविरुद्ध अपराध.

९४. या सूचीत असलेल्यांपैकी कोणत्याही बाबीच्या प्रयोजनार्थ चौकशी, सर्वेक्षण व आकडेवारी.

९५. या सूचीत असलेल्यांपैकी कोणत्याही बाबीसंबंधी सर्वोच्च न्यायालय खेरीजकरून सर्व न्यायालयांची अधिकारिता व त्यांचे अधिकार : नाविक अधिकारिता.

९६. या सूचीत असलेल्यांपैकी कोणत्याही बाबीसंबंधातील फी, पण यामध्ये कोणत्याही न्यायालयात घेतल्या जाणाऱ्या फीचा समावेश नाही.

९७. सूची दोन किंवा सूची तीन यामध्ये नमूद न केलेली अन्य कोणतीही बाब – त्यांपैकी कोणत्याही सूचीत न उल्लेखिलेला कोणताही कर धरून.

**ii) सूची दोन – राज्य सूची (State List)**

१. सार्वजनिक सुव्यवस्था (पण यात मुलकी सत्तेच्या साहाय्यार्थ १५ (नौसेना, भूसेना किंवा वायुसेना अथवा संघराज्याची अन्य कोणतीही सशस्त्र सेना यांचा किंवा संघराज्याच्या नियंत्रणाधीन असणाऱ्या अन्य कोणत्याही सेनेचा किंवा तिची कोणतीही तुकडी अगर पथक यांचा वापर समाविष्ट नाही).

२. पोलीस (रेल्वे व ग्राम पोलीस यांसह) – सूची एक मधील नोंद क्र. २ क च्या तरतुदीच्या अधीनतेने.

३. संविधान ४२ वी सुधारणा अधिनियम द्वारे १९७६ वगळले

उच्च न्यायालयाचे अधिकारी व कर्मचारी, भाडे व महसूल न्यायालयांतील प्रक्रिया, सर्वोच्च न्यायालय खेरीजकरून सर्व न्यायालयांत घेतली जाणारी फी.

४. कारागृहे, सुधारालये, बोर्स्टल संस्था व तत्सम स्वरूपाच्या अन्य संस्था आणि त्यांत अडकवून ठेवलेल्या व्यक्ती: कारागृहांच्या व अन्य संस्थांच्या वापराकरिता अन्य राज्यांबरोबर संव्यवस्था.

५. स्थानिक शासन म्हणजे महानगरपालिका, सुधारणा विश्वस्तमंडळ, जिल्हा मंडळे, खाणी वस्ती प्राधिकरणे आणि स्थानिक स्वयंशासन किंवा ग्राम प्रशासन यांच्या प्रयोजनार्थ असलेली अन्य स्थानिक प्राधिकरणे यांची घटना व त्यांचे अधिकार.

६. सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता रुग्णालये व दवाखाने.

७. भारताबाहेरील स्थळांच्या यात्रांहून अन्य यात्रा.

८. मादक दारू म्हणजे मादक दारूचे उत्पादन, निर्मिती, कब्जा, वाहतूक, खरेदी व विक्री

९. नि:समर्थ व निकामी असलेल्यांना साहाय्य.

१०. दफन व दफनभूमी, दहन व दहनभूमी

११ संविधानच्या ४२ वी दुरुस्ती १९७६ नुसार वगळले

१२. राज्याच्या नियंत्रणाखाली असलेली किंवा त्याच्याकडून ज्यांचा खर्च चालतो अशी ग्रंथालये, संग्रहालये व अन्य तत्सम संस्था : १९ (संसदेने केलेल्या कायद्याद्वारे किंवा त्याखाली) राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून घोषित केलेल्याहून अन्य प्राचीन व ऐतिहासिक स्मारकशिल्पे व अभिलेख.

१३. दळणवळण, म्हणजे सडका, पूल तरी व सूची एकमध्ये विनिर्दिष्ट न केलेली अन्य दळणवळण साधने : नगरपालिका ट्राममार्ग, रज्जुमार्ग, अंतर्देशीय जलमार्ग व त्यांवरील वाहतूक, अशा जलमार्गासंबंधी सूची एक व सूची तीनमध्ये असलेल्या तरतुदीं च्या अधीनतेने : यंत्रचलित वाहनांहून अन्य वाहन.

१४. कृषी–कृषिविषयक शिक्षण व संशोधन, उपद्रवी जीव जंतूंपासुन संरक्षण व वनस्पतीरोगांस प्रतिबंध यांसह.

१५. पशुधनाचे जतन, संरक्षण व सुधारण आणि पशुरोगास प्रतिबंध, पशुवैद्यकीय प्रशिक्षण व व्यवसाय.

१६. कोंडवाडे व पशु–अतिचारास प्रतिबंध.

१७. पाणी, म्हणजे सूची एकमधील नोंद ५६ च्या तरतुदींच्या अधीनतेने, पाण्याचे साठे, जलसिंचन व कालवे, जलनिस्सारण व बंधारे, पाण्याची साठवण व जलशक्ती.

१८. भूमी म्हणजे भूमीतील किंवा तिच्यावरील अधिकार, जमीनमालक व कूळ यांचे संबंध धरून भूधृती आणि खडांची वसुली, शेतजमिनीचे हस्तांतरण व अन्यक्रामण, जमीन सुधारणा व कृषिविषयक कर्जे, वसाहतीकरण.

१९. संविधानच्या ४२ वी दुरुस्ती १९७६ नुसार वगळले

२०. संविधानच्या ४२ वी दुरुस्ती १९७६ नुसार वगळले

२१. मत्स्यक्षेत्रे

२२. पाल्याधिकरणे सूची एकमधील नोंद ३४ च्या तरतुदींच्या

२३. खाणींचे विनियमन व खनिज विकास सूची एकमधील संघराज्याच्या नियंत्रणाखाली होणारे विनियमन व विकास यासंबंधीच्या तरतुदींच्या अधीनतेने.

२४. उद्योगधंदे सूची एकमधील (७ व ५२ या नोंदीच्या) तरतुदींना अधीनतेने.

२५. गॅस व गॅसचे कारखाने.

२६. राज्यातील व्यापार व वाणिज्यव्यवहार–सूची तीनमधील नोंद ३३ च्या तरतुदींच्या अधीनतेने.

२७. मालाचे उत्पादन, पुरवठा व वितरण–सूची तीनमधील नोंद ३३ च्या तरतुदींच्या अधीनतेने.

२८. बाजार व जत्रा.

२९. संविधानच्या ४२ वी दुरुस्ती १९७६ नुसार वगळले

३०. सावकारी व सावकार; शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणातून मुक्तता.

३१. पांथगृहे व पांथगृहपाल.

३२. सूची एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्याहून अन्य निगमांचे व विद्यापीठांचे विधिसंस्थापन, विनियमन व समापन; विधिसंस्थापित नसलेल्या अशा व्यापारी, वाङ्मयीन, वैज्ञानिक, धार्मिक व अन्य संस्था व अधिसंघ; सहकारी सोसायट्या.

३३. नाट्यगृहे व नाट्यप्रयोग; चित्रपट–सूची एकमधील नोंद ६० च्या तरतुदींच्या अधीनतेने; क्रीडा, करमणूक व मनोविनोदन.

३४. पैज लावणे व जुगार खेळणे.

३५. राज्याच्या ठायी निहित असलेली किंवा त्याच्या कब्जातील बांधकामे, जमिनी व इमारती.

३६. संविधानच्या ४२ वी दुरुस्ती १९७६ नुसार वगळले.

३७. राज्याच्या विधानमंडळाच्या निवडणुका–संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या अधीनतेने.

३८. राज्य विधानमंडळाचे सदस्य, विधानसभेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष आणि तेथे विधान परिषद असेल तर, तिचा सभापती व उपसभापती यांचे वेतन व भत्ते.

३९. विधानसभा आणि तिचे सदस्य व समित्या आणि, विधान परिषद असेल तर, ती परिषद आणि तिचे सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती; राज्याच्या विधानमंडळाच्या समित्यांपुढे साक्ष देण्याकरिता किंवा दस्तऐवज दाखल करण्याकरिता व्यक्तींना उपस्थित राहण्यास भाग पाडणे.

४०. राज्याच्या मंत्र्याचे वेतन व भत्ते.

४१. राज्य लोकसेवा; राज्य लोकसेवा आयोग.

४२. राज्य पेन्शने, म्हणजे राज्याकडून किंवा राज्याच्या एकत्रित निधीतून प्रदेय असलेली पेन्शने.

४३. राज्याचे लोकऋण.

४४. निखात निधी.

४५. जमीन महसूल–महसुलाची आकारणी व उगराणी व भूमि–अभिलेख ठेवणे, महसुली प्रयोजनांकरिता भूमापन व हक्कनोंदणी आणि महसुलांचे अन्यक्रामण यांसह.

४६. कृषी–प्राप्तीवरील कर.

४७. शेतजमिनीच्या उत्तराधिकारासंबंधी शुल्के.

४८. जमिनी व इमारती यांवरील कर.

५०. खनिज अधिकारांवरील कर–खनिज विकासासंबंधीच्या कायद्याद्वारे संसदेने घातलेल्या कोणत्याही मर्यादांच्या अधीनतेने.

५१. राज्यात निर्मिलेल्या किंवा उत्पादिलेल्या अशा पुढील मालावरील उत्पादन शुल्के आणि भारतात इतरत्र निर्मिलेल्या किंवा उत्पादिलेल्या सदृश्य मालावरील त्याच दराची किंवा त्याहून कमी दराची प्रतिशुल्के:–

(क) मानवी सेवनाकरिता मद्यार्कयुक्त दारू;

(ख) अफू, भांग, अन्य अंमली औषधीद्रव्ये व अंमली पदार्थ;

पण मद्यार्काने किंवा या नोंदीच्या उपपरिच्छेद (ख) मध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही द्रव्याने युक्त असलेले

औषधीय व प्रसाधन सिद्धपदार्थ सोडून.

५२. एखाद्या स्थानिक क्षेत्रामध्ये उपभोग, वापर किंवा विक्री यासाठी येणाऱ्या मालाच्या प्रवेशावरील.

५३. विजेचा वापर किंवा विक्री यांवरील कर.

५४. वृत्तपत्रांहून अन्य मालाची विक्री किंवा खरेदी यांवरील कर-सूची एकमधील नोंद ९२ क च्या तरतुदींच्या अधीनतेने.)

५५. वृत्तपत्रांत प्रकाशित झालेल्या जाहिराती २३ (आणि आकाशवाणी किंवा दूरदर्शन याद्वारा प्रक्षेपित केल्या जाणाऱ्या जाहिराती) सोडून अन्य जाहिरातींवरील कर.

५६. सडकेने किंवा अंतर्देशीय जलमार्गांनी ने-आण केल्या जाणाऱ्या मालावरील किंवा उतारूंवरील कर.

५७. सडकांवर चालवण्यास योग्य अशा, यंत्रचालित असलेल्या वा नसलेल्या वाहनांवर -
यात ट्रामगाड्यांचा समावेश आहे- आकारण्यात येणारा कर-सूची तीनमधील नोंद ३५ च्या तरतुदींच्या अधीनतेने.

५८. प्राणी व नौका यांवरील कर.

५९. पथकर.

६०. व्यवसाय, व्यापार, आजीविका व नौकऱ्या यांवरील कर.

६१. डोईपट्टी.

६२. चैनीच्या वस्तूंवरील कर-करमणूक, मनोविनोदन, पैज व जुगार यांवरील कर धरून.

६३. मुद्रांक शुल्काच्या दरांविषयी सूची एकमध्ये असलेल्या तरतुदींमध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांहून अन्य दस्तऐवजांच्या संबंधातील मुद्रांक शुल्काचे दर.

६४. या सूचीत असलेल्यांपैकी कोणत्याही बाबीसंबंधीच्या कायद्यांविरुद्ध अपराध.

६५. या सूचीत असलेल्यांपैकी कोणत्याही बाबीसंबंधी सर्वोच्च न्यायालय खेरीजकरून सर्व न्यायालयांची अधिकारिता व त्यांचे अधिकार.

६६. या सूचीत असलेल्यांपैकी कोणत्याही बाबीसंबंधातील फी, - पण कोणत्याही न्यायालयात घेतल्या जाणाऱ्या फींचा त्यात समावेश नाही.

**iii) सूची तीन समवर्ती सूची (Concurrent List)**

१. फौजदारी कायदा या संविधानाच्या प्रारंभी भारतीय दंड संहितेत समाविष्ट असलेल्या सर्व बाबी धरून, पण सूची एक किंवा सूची दोन यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणत्याही बाबीसंबंधातील कायद्याविरुद्ध केलेले अपराध वगळून आणि मुलकी सत्तेच्या सहाय्यार्थ नौसेना भूसेना किंवा वायुसेना यांचा अथवा संघराज्याच्या अन्य कोणत्याही सशस्त्र सेनांचा वापर वगळून.

२. फौजदारी प्रक्रिया या संविधानाच्या प्रारंभी फौजदारी प्रक्रिया संहितेत समाविष्ट असलेल्या सर्व बाबी धरून.

३. एखाद्या राज्याची सुरक्षितता सार्वजनिक सुव्यवस्था राखणे किंवा जनतेला अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा व सेवा चालू ठेवणे यांच्याशी संबधित असलेल्या कारणास्तव प्रतिबंधक स्थानबद्धता अशा स्थानबद्धतेत ठेवलेल्या व्यक्ती.

४. कैदी आरोपी व्यक्ती आणि या सूचीच्या नोंद तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणांकरिता प्रतिबंधक स्थानबद्धतेत ठेवलेल्या व्यक्ती यांना एका राज्यातून दुसऱ्या राज्यात हलवणे.

५. विवाह, घटस्फोट, अर्भके व अज्ञान व्यक्ती, दत्तक, मृत्युपत्रे, विनामृत्युपत्रता व उत्तराधिकार एकत्र कुटुंब व वाटण्या, न्यायिक कार्यवाहीतील पक्षकार या संविधानाच्या प्रारंभीपूर्वी ज्या बाबतीत आपल्या व्यक्तिगत कायद्यास अधीन होते

त्या सर्व बाबी.

६. शेतजमिनीहून अन्य मालमत्तेचे हस्तांतरण, विलेख व दस्ताऐवज यांची नोंदणी.

७. संविदा, भागीदारी, अभिकरण, परिवहान, संविदा व संविदांचे अन्य विशेष प्रकार यांसह पण यामध्ये शेतजमिनीसंबंधातील संविदांचा समावेश नाही.

८. कारवाईयोग्य दुष्कृती

९. दिवाळखोरी व नादारी

१०. विश्वस्तव्यवस्था व विश्वस्त

११. महाप्रशासक आणि पदस्थविश्वस्त

११.क. न्यायदान, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालये खेरीज करून सर्व न्यायालयांची घटना व रचना.

१२. साक्षीपुरावा व शपथा, कायदे, अधिशासकीय कृती व अभिलेख आणि न्यायिक कार्यवाही यांना मान्यता

१३. या संविधानाच्या प्रारंभास दिवाणी प्रक्रिया संहितेत समाविष्ट असलेल्या सर्व बाबी धरून दिवाणी प्रक्रिया मुदत मर्यादा व लवाद.

१४. न्यायालयाचा अवमान पण यामध्ये सवौच्च न्यायालयाच्या अवमानाचा समावेश नाही.

१५. उनाडकी, भटक्या व प्रवासनशील जनजाती.

१६. वेड व मानसिक वैगुण्य, वेडे व मनोवैगुण्ययुक्त व्यक्तींचा स्वीकार किंवा त्यांच्यावर उपचार करण्यासाठी असलेली ठिकाणे सुद्धा.

१७. प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध

१७ क. वने

१७ ख. वन्य पशु व पक्षी यांचे संरक्षण

१८. खाद्यपदार्थातील व अन्य मालातील भेसळ.

१९. औषधीद्रव्ये व विषद्रव्ये अफूसंबंधी सूची एकमधील नोंद ५९ च्या तरतुदींच्या अधीनतेने

२०. आर्थिक व सामाजिक नियोजन.

२० क. लोकसंख्या नियंत्रण व कुटुंबनियोजन

२१. वाणिज्यिक औद्योगिक मक्तेदारी व्यवसाय संहती व एकाधिकार न्यास

२२. व्यवसाय संघ औद्योगिक व कामगार तंटे

२३. सामाजिक सुरक्षा व सामाजिक विमा रोजगार व बेकारी

२४. कामगार कल्याण बाबतची परिस्थिती, भविष्य निधी सेवायोजकाचे दायित्व कामगार भरपाई अपंग व वार्धक्य पेन्शने, प्रसूतिविषयक लाभ यांसह.

२५. शिक्षण तंत्र शिक्षण वैद्यकीय शिक्षण व विद्यापीठे यासह सूची एक मधील ६३ ६४ ६५ व ६६ या नोंदी मधील तरतुदींच्या अधिनतेने कामगारांचे व्यासयिक व तंत्रशिक्षण

२६. विधिव्यवसाय, वैद्यकीय व अन्य व्यवसाय

२७. भारत व पाकीस्तान ही डोमिनियन स्थापन झाल्याकारणाने आपल्या राहण्याच्या मूळ ठिकाणापासून विस्थापित झालेल्या व्यक्तींना साहाय्य व त्यांचे पुनर्वसन.

२८. धर्मदाय व धर्मदायी संस्था, धर्मदायी व धार्मिका, दाननिधी व धार्मिक संस्था

२९. माणसे प्राणी किंवा वनस्पती यांना बाधक होणारे संसर्गजन्य किंवा स्पर्शजन्य रोग किंवा उपद्रवी जीवजंतू यांचा एका राज्यातून दुसऱ्या राज्यात फैलाव होण्यास प्रतिबंध.

३०. जीवनविषयक आकडेवारी जन्म व मृत्यू यांची नोंदणी धरून

३१. संसदेने केलेल्या कायद्याच्या किंवा विद्यमान कायद्याच्या द्वारे किंवा त्याखाली मोठी बंदरे म्हणून घोषित केलेल्या बंदराहून अन्य बंदरे.

३२. यंत्रचलित जलयानापुरते अंतर्देशीय जलमार्गावरील नौपरिवहान व नौकानयन आणि अशा जलमार्गावरील पथनियम आणि अंतर्देशीय जलमार्गांनी उतारूंची व मालाची ने-आण राष्ट्रीय जलमार्गाबाबत सूची एकमध्ये असलेल्या तरतुदींच्या अधीनतेने.

३३. एखाद्या उद्योगाचे नियंत्रण सार्वजनिक हितार्थ संघराज्याकडून होणे समयोचित आहे असे संसदेने कायद्याद्वारे घोषित केले असेल त्या बाबतीत, अशा उद्योगातील उत्पादने आणि असे उत्पादान म्हणून तशाच प्रकारचा आयात केलेला माल

क - खाद्य पदार्थ - गळिताची धान्ये व तेले यांसह

ख - गुरांची वैरण - पेंड आणि अन्य सत्त्वे यांसह

ग - कच्चा कापूस - मग तो सरकी काढलेला असो की सरकी न काढलेला असो व सरकी आणि

घ - कच्चा ताग यांचा व्यापार व वाणिज्य आणि त्यांचे उत्पादन पुरवठा व वितरण.

ड - वजने व मापे - मानके प्रस्थापित करणे खेरीज करून.

३४. किंमतीचे नियंत्रण.

३५. यंत्रचलित वाहने - ज्यांनुसार अशा वाहनांवर कर बसवावयाचा त्या तत्त्वांसह.

३६. कारखाने.

३७. बॉयलर्स.

३८. वीज.

३९. वृत्तपत्रे, पुस्तके व मुद्रणालये

४०. संसदेने केलेल्या कायद्याद्वारे किंवा त्या खाली राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून घोषित केलेली याहून अन्य पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष.

४१. निर्वासितांची संपत्ती म्हणून घोषित झालेल्या शेत जमीन धरून संपत्तीची अभिरक्षा, व्यवस्थापन व विल्हेवाट.

४२. संपत्तीचे संपादन व अधिग्रहण.

४३. कर व अन्य सरकारी येणी यांच्या बाबतीतील मागणी - रकमांची राज्यातील वसुली त्या राज्याबाहेर उत्पन्न होणाऱ्या जमीन महासुलाची थकबाकी व अशी थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असलेल्या रकमा यांसह

४४. न्यायिक मुद्रकाद्वारे वसूल केलेली शुल्के किंवा फीस यांहून अन्य मुद्रांक शुल्के, पण यामध्ये मुद्रांक शुल्कदरांचा समावेश नाही.

४५. सूची दोन किंवा तीन यात विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही बाबींच्या प्रयोजनार्थ चौकशी व आकडेवारी.

४६. या सूचीत असलेल्यांपैकी कोणत्याही बाबीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयखेरीज करून सर्व न्यालयांची अधिकारीता व त्यांचे अधिकार.

४७. या सूचीत असलेल्यापैकी कोणत्याही बाबीसंबंधातील फी, पण कोणत्याही न्यायालयात घेतल्या जाणाऱ्या फींचा यात समावेश नाही.

●●●

# मानवी हक्क – Human Rights

## प्रकरण - १

# मानवी हक्कांची संकल्पना व त्याचे महत्त्व-

# Concept of Human Rights & its importance

**१) प्रस्तावना**

दुसऱ्या महायुद्धात साम्राज्यवादी हुकूमशाही राष्ट्रांकडून भयानक मानवसंहार झाला. जर्मनी, इटली या राष्ट्रांमध्ये जी वांशिक झोटींगशाही फोफावली व त्यातून ज्यू जमातीचे जे शिरकाण झाले, ते पाहून सर्व जग हादरले. भविष्यामध्ये असा संहार मानवजातीस पाहावा लागू नये यासाठी अनेक देश, संस्था, व्यक्ती पुढे सरसावल्या. मानवजातीला आदर्शवत ठरणाऱ्या मूल्यांच्या पुनर्विचारातून मानवी हक्कांची संकल्पना उदयास आली. दुसऱ्या महायुद्धानंतर अस्तित्वात आलेल्या संयुक्त राष्ट्र परिषदेने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांचा जाहीरनामा घोषित केला. या जाहीरनाम्यानुसार जगातील सर्व लोक हे जन्मत: स्वतंत्र आहेत. वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राजकीय विचारप्रणाली यांच्या आधारावर कुणालाही भेदभावाची वागणूक मिळणे गैर आहे. सर्व व्यक्तींना समान मूल्य असून कोणी उच्च किंवा नीच नाही.

मानवी अधिकारांच्या सार्वत्रिक घोषणेनंतर संयुक्त राष्ट्रांनी या अधिकारांबाबत व्यापक जागृती करण्याकरिता सन १९६८ हे ''**आंतरराष्ट्रीय मानवाधिकार वर्ष**'' म्हणून घोषित केले. जगातील वाढत्या दहशतवादाच्या पार्श्वभूमीवरील ''**मानवाधिकार वर्ष**'' या संकल्पनेस व्यापक स्वरूप व संरक्षण आणि सर्व सहमती देण्याच्या उद्देशाने १९६८ मध्ये व्हिएन्ना येथे शासकीय व बिगर शासकीय संस्थांची एक परिषद बोलावण्यात आली होती. या परिषदेत लोकशाही व्यवस्था हीच मानवअधिकारास पोषक व्यवस्था असल्याचे व लोकांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक हक्क हे या व्यवस्थेचे अंगभूत घटक असून त्यांची जोपासना व संवर्धन हे शासनाचे कर्तव्य असल्याचे नमूद केले गेले.

**२) मानवी हक्क म्हणजे काय ?**

मानवी हक्कांची चर्चा करताना प्रथम व्यक्तीच्या दृष्टीने हक्कांना इतके महत्त्व का दिले जाते हे समजावून घेतले पाहिजे. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. तो समाजाचा घटक या नात्यानेच आपले जीवन जगत असतो. मानवी जीवनाच्या अनेकविध गरजा असतात. व्यक्तीला समाजात राहूनच या गरजांची पूर्ती करणे शक्य होते. मानवाच्या समाजातील वास्तव्यामुळेच त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते, म्हणजे मानवाचे एका जैविक प्राण्यापासून सामाजिक प्राण्यात रूपांतर होण्याचे कार्य त्याच्या समाजातील वास्तव्यामुळेच शक्य होते.

**३) मानवी हक्काची व्याख्या –**

१) **मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ प्रमाणे.**

''**मानवी हक्क**''– व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य, समता व प्रतिष्ठा यासंबंधीचे संविधानाने हमी दिलेले किंवा आंतरराष्ट्रीय प्रसंविदेमध्ये संनिविष्ट करण्यात आलेले आणि भारतातील न्यायालयांना अंमलबजावणी करता येईल असे हक्क असा होतो.

२) **प्रा. एच. जे. लास्की** यांनी हक्कांची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे – हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की, ज्याशिवाय व्यक्तीला सामान्यत: स्वत:चा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही.

३) **प्रा. बोझांके यांच्या मते,** आपण ज्या समाजाचे घटक असतो त्या समाजाच्या सर्वोच्च कल्याणाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे हक्क होत.

**४) हक्कांच्या रक्षणाची जबाबदारी राज्यावर**

हक्कांचा उद्‌गम सामाजिक परिस्थितीतून होत असल्याने राज्य हक्कांची निर्मिती करीत नाही हे लक्षात घेतले पाहिजे. सामाजिक परिस्थितीतून निर्माण झालेल्या हक्कांना मान्यता देण्याचे कार्य राज्य करते. तथापि, राज्याच्या मान्यतेनंतरच व्यक्तीला खऱ्या अर्थाने हक्कांचा उपभोग घेणे शक्य होते, म्हणून हक्कांच्या रक्षणाची खरी जबाबदारी राज्यावर येते असे म्हटले जाते. एखादे राज्य किती व कोणत्या हक्कांना मान्यता देते यावरून त्या राज्याचे स्वरूप कसे आहे हे ठरविता येते, म्हणून प्रा. लास्कींनी असे म्हटले आहे की, राज्य मान्यता देत असलेल्या हक्कांवरून त्या राज्याची ओळख आपणास पटते.

**५) मानवी हक्कांची आवश्यकता**

हक्कांचा उगम किंवा निर्मिती यासंबंधी राजकीय विचारवंतांनी विविध प्रकारची मते व्यक्त केली असली तरी मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी हक्क आवश्यक असतात. यावर सर्वांचेच एकमत आहे. म्हणूनच आधुनिक काळात मानवी हक्कांचा विशेष आग्रह धरला जातो. मानवी हक्क हे व्यक्ती व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग होत. हक्कांशिवाय मानवप्राणी या नात्याने चांगले जीवन जगणे आपणास शक्य होणार नाही. मानवाचे व्यक्तिमत्त्व, गुणवत्ता, सदसद्विवेकबुद्धी यांच्या विकासासाठी हक्क आवश्यक असतात. हक्कांशिवाय कोणत्याही व्यक्तीला स्वत:चा विकास करून घेता येत नाही. व्यक्तीचा आंतरिक विकास तसेच भौतिक विकास या दोहोंचाही आधार हक्क हेच असतात, म्हणून मानवी हक्क हे मानवाच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाशी निगडित झालेले असतात. मानवी जीवनापासून ते अलग केले जाऊ शकत नाहीत.

मानव अधिकारांच्या व्याप्तीमध्ये प्रत्येक व्यक्तीस न्याय्य परिस्थितीमध्ये कामाचा अधिकार, शारीरिक, मानसिक व आर्थिक उन्नतीचा अधिकार, आपला जीवनस्तर उंचावण्याचा, विकास करण्याचा आणि त्यासाठी वैज्ञानिक प्रगतीचा लाभ घेण्याचा अधिकारही समाविष्ट आहे.

२६ जानेवारी १९५० रोजी भारताचे संविधान अंमलात आले. संविधानात सर्वात महत्त्वाचा व वैश्विक मानव अधिकारांना प्रतिबिंबित करणारा भाग हा मूलभूत अधिकारामध्ये सामावलेला आहे. सर्व भारतीयांना राजकीय व आर्थिक स्वातंत्र्याची, विकासाची, समान दर्जाची, न्यायाची हमी देणारे मूलभूत अधिकारांमध्ये, सार्वत्रिक मानवी अधिकारही सामावलेले आहेत. संविधानाने या अधिकारांचे जतन व संवर्धन करण्यासाठी त्यांना कार्यान्वित करण्यासाठी विविध यंत्रणाची – न्यायपालिका, कार्यपालिका व प्रशासन– निर्मिती केली आहे.

संविधानातील मूलभूत अधिकारांमध्ये सर्वांना कायद्यासमोर समानता, विनाकारण अटक न करणे, विचार अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटना स्थापन करणे, शांततापूर्णरीत्या एकत्र येणे, विकासाच्या संधी व दर्जाची समानता यांचा समावेश होतो, आणि याच बाबी मानव अधिकाराच्या बाबतीतही येतात.

व्यक्तीला दिल्या गेलेल्या या सर्व अधिकारांचा संबंध राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीशी आहे. हे अधिकार कार्यान्वित करण्यासाठी पूरक वातावरणनिर्मिती करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. सर्व व्यक्तींना सन्मानाने जगता येईल. यासाठी विकासाच्या योजना आखून कार्यान्वित करणे ही जशी शासनाची जबाबदारी; तशीच शोषण, भय, गुलामगिरीपासून मुक्ती, निर्भय वातावरण व्यक्ती व समूहांसाठी तयार करणे हीसुद्धा शासनाची अंगभूत कामे आहेत. केवळ अशा वातावरणात व्यक्तींच्या अधिकारांची अंमलबजावणी होऊ शकते. या सर्व प्रक्रियेमध्ये नागरिकांच्या संस्था संघटनांचाही अतिशय महत्त्वाचा सहभाग आहे. असा एक अनुभव आहे की, स्वत:च्या हक्कांसाठी, अधिकारांसाठी लोक लढत नाहीत, संघर्ष करीत नाहीत तोपर्यंत हे अधिकार त्यांना मिळणार नाहीत. किंबहुना मानवी विकासाच्या प्रक्रियेमध्ये वेळोवेळी अन्याय, शोषणाविरुद्ध झालेल्या संघर्षातूनच स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये अधिक दृढमूल होत गेली आहेत व हीच मूल्ये मानवी हक्कांचा पाया आहेत. मानवी हक्कांच्या अंमलबजावणीबरोबरच त्यांचे जतन व संवर्धन करण्याच्या कामी राज्यसंस्थेची व शासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. राज्य

संस्थेकडे शासन करण्याच्या कामी अधिकार व सत्ता एकवटले जातात. या अधिकार व सत्तेचा शासनकर्त्यांकडून व सरकारी अधिकाऱ्यांकडून बऱ्याच वेळेस गैरवापर होताना दिसतो. मानवी हक्कांचे सर्वात जास्त उल्लंघन सरकारी यंत्रणेकडून होताना दिसते. आजची शासनव्यवस्था व सरकारी यंत्रणा या मुख्यत: आर्थिक व सामाजिकरीत्या संपन्न असलेल्या वर्गाच्या हाती आहे. त्यामुळे समाजातील दुर्बल घटकांना प्रबळ समाजाकडून होणाऱ्या शोषणाबरोबरच सामना करावा लागतो. वास्तविक शासन, सरकार हे लोकांच्या हक्कांचे रक्षक, पालक असतात; परंतु या हक्कउल्लंघनांच्या घटनाही त्यांच्याकडून प्रबळपणे होताना दिसतात. म्हणून मानवी हक्कांबाबतचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

### ६) मानवी हक्क सर्वांना समान

मानवी हक्कांचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की, मानवजातीच्या सर्व घटकांना, म्हणजेच सर्व व्यक्तींना, ते समानतेने प्राप्त झालेले असतात. हक्कांच्या बाबतीत व्यक्तीव्यक्तीमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव असू शकत नाही. मानवी हक्क हे अशाप्रकारे व्यक्तीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण असल्याने त्यांना राज्याच्या कायद्याचे संरक्षण मिळाले पाहिजे असे प्रतिपादन मानवी हक्कांचे समर्थक करतात.

●●●

## प्रकरण - २

# मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३

# Protection of Human Rights Act, 1993

## प्रारंभिक

**कलम १. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ**

(१) या अधिनियमाला **मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३** असे संबोधण्यात येईल.

(२) याचा विस्तार संपूर्ण भारतभर असेल. मात्र जम्मू व काश्मीर या राज्यांच्या बाबतीत, संविधानाच्या सातव्या अनुसूचीमधील सूची एक व सूची तीनमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही नोंदीमधील त्या राज्यांशी संबंधित असलेल्या बाबींच्या बाबतीतच फक्त तो त्या राज्यांना लागू असेल.

(३) तो **दिनांक २८ सप्टेंबर १९९३** रोजी अमलात आल्याचे मानण्यात येईल.

**टीप : या अधिनियमाचा प्रारंभ व प्रमुक्ती –** मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ मध्ये, मानवी हक्कांचे अधिक चांगल्या प्रकारे संरक्षण करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, राज्यांमध्ये राज्य मानवी हक्क आयोग आणि मानवी हक्क न्यायालये स्थापन करण्याची तरतूद केलेली आहे. या अधिनियमास, **दि. ८–१–१९९४** रोजी मा. राष्ट्रपतींची संमती मिळाली आहे आणि तो, **दि. १०–१–१९९४** रोजी भारताचे राजपत्र, भाग–दोन, कलम–१, सर्वसाधारण पी–१ (क्र. १०) मध्ये प्रसिद्ध करण्यात आला.

**कलम २. व्याख्या**

(ब) **'अध्यक्ष'** याचा अर्थ, आयोगाच्या किंवा प्रकरणपरत्वे राज्य आयोगाच्या अध्यक्षस्थानी असलेली व्यक्ती असा आहे.

(क) **'आयोग'** याचा अर्थ, कलम ३ अनुसार स्थापन करण्यात आलेला राष्ट्रीय मानवी हक्क आयोग असा आहे.

(ड) **'मानवी हक्क'** याचा अर्थ, व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य, समता व प्रतिष्ठा यासंबंधीचे संविधानाने हमी दिलेले किंवा आंतरराष्ट्रीय प्रसंविदेमध्ये संनिविष्ट करण्यात आलेले आणि भारतातील न्यायालयांना अंमलबजावणी करता येईल, असे हक्क, असा होतो.

(एम) **'लोकसेवक'** या संज्ञेला भारतीय दंडसंहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ मध्ये जो अर्थ नेमून देण्यात आला असेल तोच अर्थ असेल.

●●●

## राष्ट्रीय मानवी हक्क आयोग

**कलम ३. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना –**

(१) या अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व सोपवण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी केंद्र शासन, 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोग' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका आयोगाची स्थापना करील.

(२) या आयोगामध्ये –

(अ) सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाचे पद धारण केले असेल असा एक सभाध्यक्ष –

(ब) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदावर असेल किंवा असे पद धारण केलेले असेल असा एक सदस्य-

(क) उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश पदावर असेल किंवा असे पद धारण केलेले असेल असा एक सदस्य-

(ड) मानवी हक्कांशी संबंधित बाबींचे ज्ञान असलेल्या किंवा त्यामधील प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तींमधून नियुक्त करावयाचे दोन सदस्य यांचा समावेश असेल.

(३) कलम १२ च्या खंड (ब) ते (जे) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी, अल्पसंख्याकांसाठी राष्ट्रीय आयोग, अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग, अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग आणि महिलांसाठी राष्ट्रीय आयोग यांचे सभाध्यक्ष या आयोगाचे सदस्य असल्याचे मानण्यात येईल.

(४) एक **महासचिव** असेल जो आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल व तो आयोगाकडून किंवा यथास्थिती अध्यक्षाकडून त्याच्याकडे सोपवण्यात येतील अशा (कलम ४०-ख) खालील विनियम करण्याची कार्ये आणि अधिकार खेरीज करून आयोगाच्या अधिकारांचा वापर करील आणि आयोगाची अशी कर्तव्ये पार पाडील.

(५) आयोगाचे **मुख्यालय दिल्ली** येथे असेल आणि आयोग, केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीने भारतातील अन्य ठिकाणी कार्यालये स्थापन करील.

**कलम ४. सभापतिपदस्थ व्यक्तीची आणि अन्य सदस्यांची नेमणूक –**

(१) राष्ट्रपती, आपली सही व मुद्रा असलेल्या वॉरंटाद्वारे सभाध्यक्षाची आणि सदस्यांची नेमणूक करील :

मात्र या पोटकलमाखालील प्रत्येक नेमणूक ही पुढील व्यक्तींचा समावेश असलेल्या समितीच्या शिफारशी मिळवूनच करण्यात येईल. समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :

(अ) पंतप्रधान – सभाध्यक्ष.

(ब) लोकसभेचा अध्यक्ष – सदस्य.

(क) भारत सरकारच्या गृह मंत्रालयाचा प्रभारी मंत्री – सदस्य.

(ड) लोकसभेतील विरोधी पक्ष नेता – सदस्य.

(ई) राज्य सभेतील विरोधी पक्ष नेता – सदस्य.

(फ) राज्यसभेतील उपसभापती – सदस्य.

मात्र असे की, भारत सरकारच्या मुख्य न्यायाधीशांशी विचारविनिमय केल्याशिवाय सर्वोच्च न्यायालयाच्या पदस्थ न्यायाधीशांची किंवा उच्च न्यायाधीशाच्या मुख्य न्यायाधीशाची नेमणूक करता येणार नाही.

(२) (पोट-कलम १ च्या पहिल्या परंतुकात निर्देश केलेल्या समितीमध्ये कोणतेही सदस्याचे पद रिक्त आहे.) एवढ्याच केवळ कारणावरून सभाध्यक्षाची किंवा एखाद्या सदस्याची केलेली नेमणूक बेकायदेशीर ठरणार नाही.

**कलम ५. सभाध्यक्ष आणि सदस्य यांची नेमणूक आणि त्यांना पदावरून दूर करणे –**

(१) सभाध्यक्षास किंवा कोणत्याही सदस्यास भारताच्या राष्ट्रपतींना उद्देशून लेखी सूचना देऊन त्याच्या पदाचा राजीनामा देता येईल.

(२) पोट-कलम (३) च्या तरतुदीस अधीन राहून, आयोगाचा सभाध्यक्ष किंवा अन्य कोणताही सदस्य याच्याबाबतीत राष्ट्रपतीने सर्वोच्च न्यायालयाकडे निर्देश केल्यावरून त्या न्यायालयाने त्या संबंधात विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार चौकशी करून नंतर त्या सभाध्यक्षास किंवा, यथास्थिती अन्य सदस्यास शाबीत झालेल्या दुर्वर्तनाच्या किंवा असमर्थतेच्या कारणास्तव पदावरून दूर करावयास पाहिजे असा अभिप्राय कळवल्यानंतरच, राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे अशा कोणत्याही कारणास्तव त्याला त्याच्या पदावरून दूर केले जाईल.

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, समितीचा सभाध्यक्ष, किंवा यथास्थिती अन्य सदस्य जर,

(क) नादार म्हणून अभिनिर्णित झाला असेल तर; किंवा

(ख) त्याच्या पदावधीत त्याच्या पदाच्या कर्तव्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही वेतनी सेवेत काम करीत असेल; किंवा

(ग) मानसिक किंवा शारीरिक दुर्बलतेमुळे त्या पदावर राहण्यास अयोग्य ठरत असेल तर; किंवा

(घ) विकल मनाचा असेल व सक्षम न्यायालयाने तसे घोषित केले असेल तर किंवा;

(ड) सिद्धदोषी (Conviction) असेल आणि राष्ट्रपतीच्या मते नैतिक अधःपतनाचा (Natural Justice) अंतर्भाव असलेल्या अपराधासाठी त्याला कारावासाची शिक्षा झालेली असेल तर, राष्ट्रपती त्या सभाध्यक्षास किंवा सदस्यास, आदेशाद्वारे पदावरून दूर करू शकेल.

**कलम ६. सभाध्यक्षाचा आणि सदस्यांचा पदावधी – (कारकिर्द)**

(१) सभाध्यक्ष म्हणून नियुक्त झालेली व्यक्ती, ती ज्या दिनांकास आपले पद ग्रहण करील तेव्हापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत किंवा ती व्यक्ती सत्तर वर्षे वयाची होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्या घटनेपर्यंत पद धारण करील.

(२) सदस्य म्हणून नियुक्त झालेली व्यक्ती, ती ज्या दिनांकास आपले पद ग्रहण करील त्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीसाठी आपले पद धारण करील आणि आणखी पाच वर्षांच्या कालावधीसाठी पुनर्नियुक्ती होण्यासाठी पात्र असेल.

(३) पद धारण करणे समाप्त झाल्यावर, सभाध्यक्ष किंवा सदस्य हा भारत सरकारच्या अखत्यारीखाली किंवा कोणत्याही राज्यशासनाच्या अखत्यारीखाली, त्यापुढे नोकरी करण्यास अपात्र असेल.

●●●

## आयोगाची कार्ये व अधिकार

**कलम १२. आयोगाची कार्ये**

आयोग पुढीलपैकी सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये पार पाडील. ती म्हणजे –

(अ) स्वतःहून किंवा एखाद्या बळी पडलेल्या व्यक्तीने इतर विनंती अर्ज केला असल्यास किंवा कोणत्याही न्यायालयाने त्यावर निदेश किंवा आदेश दिला असल्यास.

(एक) मानवी हक्कांचे उल्लंघन केल्याबाबतच्या किंवा त्यासाठी चिथावणी दिल्याबाबतच्या तक्रारीची चौकशी करणे.

(दोन) अशा उल्लंघनास प्रतिबंध करण्यात एखाद्या लोकसेवकाने दुर्लक्ष केल्याबाबतच्या तक्रारीची;

(ब) मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा कोणताही आरोप ज्यामध्ये अंतर्भूत आहे अशा न्यायालयाकडे प्रलंबित असलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये अशा न्यायालयाच्या संमतीने मध्यस्थी करणे.

(क) त्यावेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यशासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या ज्या कोणत्याही तुरुंगात किंवा अन्य एखाद्या संस्थेत उपचाराच्या, सुधारण्याच्या किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनार्थ व्यक्तीस स्थानबद्ध केलेले किंवा ठेवून घेण्यात आलेले असेल त्या तुरुंगाचा वा संस्थेचा, त्या निवासी व्यक्तींच्या जीवन परिस्थितीचा अभ्यास करून त्यावर शिफारशी देण्यासाठी राज्यशासनास सूचना देऊन भेट देईल.

(ड) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी संविधानाने किंवा त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कायद्यांनी तरतूद केलेल्या संरक्षणाचा आढावा घेणे आणि ते अधिक परिणामकारक ठरावे यासाठी उपाययोजना करणे.

(ई) मानवी हक्कांचा उपभोग घेणाऱ्या दहशतवादासह सर्व घटकांचा आढावा घेणे आणि योग्य ते सुधारात्मक उपाय सुचविणे.

(फ) मानवी हक्कांच्या संबंधातील संशोधनात्मक ग्रंथांचा आणि आंतरराष्ट्रीय दस्तऐवजांचा अभ्यास करणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे.

(ग) मानवी हक्कांच्या क्षेत्रातील संशोधन सुरू करणे आणि त्यासाठी प्रोत्साहन देणे.

(ह) समाजाच्या विविध थरांमध्ये मानवी हक्कविषयक साक्षरतेचा प्रसार करणे आणि या हक्कांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या संरक्षणात्मक उपायांच्या संबंधात लोकांना प्रकाशने, प्रसारमाध्यमे, चर्चासत्रे आणि इतर उपलब्ध मार्गांनी जागरूकता निर्माण करणे.

(आय) मानवी हक्कांच्या क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या बिगर सरकारी संघटना व संस्था यांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे.

(जे) मानवी हक्कांच्या प्रचालनासाठी त्याला आवश्यक वाटतील अशी इतर कार्ये करणे.

**कलम १३. चौकशीच्या संबंधातील अधिकार –**

(१) या अधिनियमाखालील तक्रारींची चौकशी करताना आयोगाला, दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (१९०८ चा ५) याखालील दाव्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाला जे अधिकार असतात ते सर्व अधिकार असतील आणि विशेषतः पुढील बाबतींतील अधिकार असतील :–

(अ) साक्षीदारांना उपस्थित राहण्याबाबतचे समन्स काढणे व त्यांना उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि त्यांची शपथेवर तपासणी करणे.

(ब) कोणतेही दस्तऐवज शोधून काढणे व सादर करणे.

(क) शपथपत्रावरील पुरावा स्वीकारणे.

(ड) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणत्याही शासकीय अभिलेखाची किंवा त्याच्या प्रतीची मागणी करणे.

(ई) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे.

(फ) विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(२) त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यांद्वारे ज्या विशेषाधिकारांचा दावा करता येईल त्यास अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीला चौकशीच्या विषय वस्तूला उपयुक्त ठरतील किंवा उपयुक्त ठरतील असे आयोगाचे मत असेल, अशा मुद्द्यांवर किंवा अशा बाबतीत माहिती देण्यास फर्मावण्याचा अधिकार आयोगाला असेल आणि अशा प्रकारे फर्मावण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने अशी माहिती पुरविणे हे भारतीय दंडसंहितेच्या (१८६० चा ४५) कलम १७६ आणि कलम १७७ अन्वये तिच्यावर कायद्याने बंधनकारक असल्याचे मानण्यात येईल.

(३) ज्या कोणत्याही इमारतीत किंवा जागेत चौकशीच्या विषयवस्तूंशी संबद्ध असे कोणतेही दस्तऐवज आढळून येतील, असे आयोगाला सकारण वाटत असेल, अशा इमारतीत किंवा जागेत आयोगाला किंवा आयोगाने या बाबतीत विशेषरीत्या अधिकार प्रदान केलेल्या राजपत्रित अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याला प्रवेश करता येईल आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३. (१९७४ चा २) याचे कलम १०० ते जितपत लागू असेल तितपत, त्याच्या तरतुदींस अधीन राहून असे दस्तऐवज जप्त करता येतील किंवा त्यांचे सारांश किंवा प्रती काढून घेता येतील.

(४) आयोग हा दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि भारतीय दंडसंहिता (१८६० चा ४५) हिच्या कलम १७५, कलम १७८, कलम १७९, कलम १८० किंवा कलम २२८ मध्ये वर्णन करण्यात आलेला कोणताही अपराध आयोगाच्या मते किंवा त्याच्या उपस्थितीत करण्यात आला असेल तर आयोग, अपराध ठरविणारी तथ्ये नमूद करून आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या तरतुदींनुसार आरोपी व्यक्तीचे निवेदन नमूद केल्यानंतर ते प्रकरण, अशा प्रकरणाची न्यायचौकशी करण्याची असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे अग्रेषित करील आणि असे कोणतेही प्रकरण ज्याच्याकडे अग्रेषित करण्यात आले असेल, असा दंडाधिरी अशा प्रकरणाची आरोपीच्या विरुद्धच्या तक्रारींच्या

सुनावणीची कार्यवाही जणू काही फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम ३४६ अन्वये त्याच्याकडे ते प्रकरण अग्रेषित करण्यात आल्याप्रमाणे सुरू करील.

(५) आयोगापुढील प्रत्येक कार्यवाही ही भारतीय दंडसंहितेच्या (१८६० चा ४५) कलम १९३ व २२८ च्या अर्थानुसार आणि कलम १९६ च्या प्रयोजनासाठी न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १९५ आणि प्रकरण सव्वीसच्या प्रयोजनासाठी आयोग हा दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

(६) जर आयोगाला तसे करणे आवश्य वा इष्ट वाटत असेल तर, तो आदेशाद्वारे त्याच्यासमोर दाखल केलेली किंवा प्रलंबित असलेली कोणतीही तक्रार ती ज्या राज्यात उद्भवली असेल, त्या राज्याच्या राज्य आयोगाकडे हस्तांतरित करू शकेल.

परंतु, अशी कोणतीही तक्रार, ती त्या राज्य आयोगाच्या संबंधित अधिकारितेत असल्याखेरीज, ती त्या आयोगाकडे हस्तांतरित करण्यात येणार नाही.

(७) पोट–कलम (६) अन्वये हस्तांतरित केलेली कोणतीही तक्रार ही जणू काही ती त्याच न्यायालयात पूर्वी दाखल करण्यात आली असल्याप्रमाणे हाताळण्यात येईल व त्याच्याकडून निकालात काढण्यात येईल.

**कलम १४. अन्वेषण –**

(१) आयोगाला चौकशीशी संबंधित असलेले कोणतेही अन्वेषण करण्यासाठी केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा अन्वेषण एजन्सीच्या सेवा प्रकरणपरत्वे केंद्र सरकारच्या किंवा राज्य सरकारच्या संमतीने वापरता येतील.

(२) चौकशीशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीचे अन्वेषण करण्याच्या प्रयोजनासाठी पोटकलम (१) अन्वये ज्यांच्या सेवांचा वापर करण्यात आला असेल, असा कोणताही अधिकारी किंवा एजन्सी आयोगाच्या निदेशांना आणि नियंत्रणाला अधीन राहून,

(अ) कोणत्याही व्यक्तीला उपस्थित राहण्यासाठी, समन्स काढू शकेल व त्याची अंमलबजावणी करू शकेल आणि त्या व्यक्तीची तपासणी करू शकेल.

(ब) कोणतेही दस्तऐवज शोधण्यास व सादर करण्यास फर्मावू शकेल आणि –

(क) कोणत्याही व्यक्तीकडून कोणत्याही सरकारी अभिलेखाची किंवा त्याच्या प्रतीची मागणी करू शकेल.

(३) कलम १५ च्या तरतुदी, एखाद्या व्यक्तीने आयोगासमोर पुरावा देण्याच्या ओघात केलेल्या निवेदनाच्या संबंधात त्या जशा लागू होतात तशाच पोटकलम (१) अन्वये ज्यांच्या सेवांचा वापर करण्यात आला असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यासमोर किंवा एजन्सीसमोर करण्यात आलेल्या कोणत्याही निवेदनाच्या संबंधात लागू होतील.

(४) पोटकलम (१) अन्वये ज्यांच्या सेवा वापरण्यात आल्या असतील असे अधिकारी किंवा एजंट चौकशीशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीचे अन्वेषण करील आणि आयोगाने या बाबतीत विनिर्दिष्ट केला असेल अशा कालावधीत त्यावरील अहवाल सादर करील.

(५) पोटकलम (४) अन्वये आयोगाला सादर करण्यात आलेल्या अहवालात नमूद करण्यात आलेल्या तथ्यांची आणि त्यात कोणताही निष्कर्ष काढण्यात आला असेल, तर त्याची अचूकता या बाबतीत आयोग स्वतःचे समाधान करून घेईल आणि या प्रयोजनासाठी आयोग (ज्यांनी अन्वेषण केले त्यांपैकी एका किंवा अनेक व्यक्तींची तपासणी करण्यासह) त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करील.

●●●

## प्रकरण - ३

# पीडित व्यक्ती, तक्रारदार, साक्षीदार यांच्या मानवी हक्कासंदर्भातील महत्त्वपूर्ण न्यायनिर्णय व खात्याअंतर्गत मार्गदर्शक सूचना

# (Important court judgements on the issue of human rights & departmental instructions regarding treatment of victim of crime, complainant, witness and accused)

**१) प्रस्तावना :**

आपल्या देशामध्ये संविधान म्हणजे सर्वोच्च मानक कायदा आहे. त्याप्रमाणे भारतातील प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या मानवी हक्कांची जोपासना, संरक्षण करता येते. या संविधानातील भाग III प्रमाणे असलेले मूलभूत हक्क हे मानवी हक्कांची हमी देतात. यानुसार राज्य हे प्रत्येक नागरिकाच्या मानवी हक्कांची सुरक्षितता तसेच त्याच्या उल्लंघनाबाबत, संरक्षणाची ग्वाही देते.

सर्वोच्च न्यायालय पूर्वीपासून मूलभूत हक्कांबाबतची व्याप्ती व्यापक स्वरूपात विविध न्याय निवड्यातून स्पष्ट करीत आहे. सरकार किंवा सरकारी एजंटकडून होणाऱ्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्याबाबत न्यायालय वेळोवेळी विरोध करून त्याबाबत कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेला मार्गदर्शक सूचना देत असते. अशा प्रकारच्या मार्गदर्शक सूचना ह्या –

१) पोलीस स्टेशनमध्ये काम करणे

२) अपराधाची नोंदणी

३) तपास करण्याची पद्धत

४) अटक करणे

५) अटक व्यक्तीशी वागणूक

६) संशयित व्यक्तीला विचारपूस

७) महिला, गरीब व्यक्ती व असाहाय्य व्यक्तींच्या हक्कांबाबत असतात.

संविधानाच्या कलम १४१ प्रमाणे या मार्गदर्शक सूचनांना कायद्याप्रमाणे महत्त्व असते. अंमलबजावणी करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याने या मार्गदर्शक सूचनांची अवहेलना जाणून बुजून केली तर त्याविरूद्ध भा.दं.सं. किंवा न्यायालयाचा अवमान कायदा १९७१ प्रमाणे कारवाई करता येते.

विविध न्याय निवाड्यांतील सर्वोच्च न्यायालयाने सांगितलेल्या मार्गदर्शक सूचनांची अवहेलना जाणूनबुजून केली तर त्या विरुद्ध भा. दं. सं. किंवा न्यायालयाचा अवमान कायदा १९७१ प्रमाणे कारवाई करता येते.

**२) विविध न्याय निवाड्यातील सर्वोच्च न्यायालयाने सांगितलेल्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत –**

**1) State of Haryana V. Bhajan lal & Oth, AIR 1992, SC 604**

**मार्गदर्शक सूचना**

१) दखलपात्र अपराधाची माहिती मिळताच त्याची पहिली खबर (FIR) नोंदवली पाहिजे.

२) तपासाची सुरुवात करण्याअगोदर, दखलपात्र अपराध घडल्याचे योग्य सयुक्तीक अनुमान काढले पाहिजे. असे अनुमान पूर्णपणे पहिल्या खबरीच्या (FIR) माहितीवरून काढले पाहिजे.

३) न्यायालय तपासामध्ये हस्तक्षेप करणार नाही, परंतु उच्च न्यायालय खालील अपवादांमध्ये करू शकेल–

i) पहिल्या खबरीमध्ये केलेल्या आरोपातून दखलपात्र अपराध घडल्याचे निष्पन्न होत नसेल किंवा पोलीस तपासास कारण नसेल.

ii) पहिल्या खबरीमधील आरोपाबाबत गोळा केलेला पुरावा. आरोपीने केलेल्या अपराधास सहायभूत नसेल.

iii) अदखलपात्र अपराधाबाबत न्यायालयाच्या आदेशाशिवाय तपास सुरू केला असेल.

iv) फौजदारी प्रक्रिया संहिता किंवा इतर कायद्याप्रमाणे आरोपीविरुद्धची फौजदारी कार्यवाही मनाई केलेली असता सुरू केली असेल.

v) आरोपी विरुद्ध द्वेषबुद्धीने कार्यवाही सुरू केली असेल.

**2) State of west Bengal V. Swapan Kumar Guha & Oth, 1982, SSC 561**

**मार्गदर्शक सूचना :–**

१) तपास सुरू करण्यापूर्वी हे आवश्यक आहे की, पहिल्या खबरीतील नमूद माहितीनुसार दखलपात्र अपराध घडल्याचे निष्पन्न होते.

२) संविधानाने दिलेल्या हमी आणि कायद्याच्या तरतुदीप्रमाणेच तपासाचे अधिकार वापरले पाहिजेत.

३) व्यक्तींच्या अधिकारांचे उल्लंघन होऊन त्यांना त्रास होत असेल आणि योग्य कार्यपद्धतीचा वापर तपासाच्या कार्यवाहीत होत नसेल तर हस्तक्षेप करण्याचे न्यायालयाचे कर्तव्य आहे.

**3) Anthony V. State of Kerala, 2001, SCC 181**

**मार्गदर्शक सूचना –**

१) घटनेची एकच पहिली खबर (FIR) असेल

२) जर पहिली खबर नोंदवल्यानंतर अधिकची माहिती मिळाली तर पोलीस त्याबाबत तपास करून त्याचा अहवाल न्यायदंडाधिकाऱ्याकडे पाठवतील.

३) तपासी अंमलदार अधिकाऱ्याला अहवाल न्यायदंडाधिकाऱ्याकडे पाठवल्यावर एखादा पुरावा मिळून आल्यावर त्याबाबत तपास करून पुरवणी अहवाल न्यायालयाकडे पाठवावा.

४) चौकशी समितीचा अहवाल तपासणी यंत्रणेवर बंधनकारक नाही. तपासणी यंत्रणा त्याबाबत वेगळे मत घेऊ शकते.

**4) Nandini Satpathy v. P. L . Dani, AIR 1978, SC 1025**

**मार्गदर्शक सूचना –**

१) आरोपी व्यक्तीला तिने केलेल्या अपराधाबाबत जबाब देण्यासाठी भाग पाडता येणार नाही.

२) आरोपी व्यक्तीला शांत राहण्याच्या अधिकाराबाबत आणि स्वत:च्याविरुद्ध साक्ष न देण्याच्या अधिकाराबाबत माहिती दिली पाहिजे.

३) व्यक्तीला विचारपूस (प्रश्नउत्तर) दरम्यान अधिवक्त्याच्या वकिलांकरवी त्याची बाजू मांडण्याचा अधिकार

४) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६० (१) चा भंग करून महिलेला उत्तर (जबाब) देण्यासाठी पोलीस स्टेशनला बोलावण्यात येऊ नये.

5) **D. K. Basu v. State of West Bengal, AIR 1997, SC 610**

**मार्गदर्शक सूचना –**

१) जे पोलीस अधिकारी तपास आणि आरोपीची चौकशी करत असतील त्यांना आपली स्वत:ची अचूक स्पष्ट ओळख पुरवावी. स्वत:चे नाव, हुद्दा दर्शविणे अशा पोलीस अधिकाऱ्याची माहिती रजिस्टरमध्ये नोंदविणे.

२) संबंधित पोलीस अधिकाऱ्याने अटक करताना अटक मेमो लिहिणे आणि त्यावर कमीत कमी एकाची सही घ्यावी ती सही अटक आरोपीच्या कुटुंबातील असावी अगर या वस्तीत आरोपीस पकडले त्या भागातील वजनदार अब्रूदार माणसाची सही घ्यावी. तसेच त्यावर अटक आरोपीची सही, अटकेची वेळ, तारीख असावी.

३) आरोपीला अटक होताच तो आरोपी कोणत्या ठिकाणी लॉकअपमध्ये अगर इतरत्र विचारपूस करता जेथे असेल त्याची माहिती अटक आरोपीच्या मित्रास, नातेवाईकास लवकरात लवकर कळवावी; परंतु अटक मेमोवर अशा मित्राची अगर नातेवाईकाची सही असेल तर गोष्ट वेगळी.

४) जर अटक आरोपीचा असा मित्र अगर नातेवाईक जिल्ह्याचे बाहेर अगर शहराबाहेर राहात असेल तर त्यास अटकेची वेळ, ठिकाण आणि कोठे ठेवले आहे त्याची माहिती जिल्हा कायदा साहाय्यक केंद्र आणि पोलीस स्टेशनमार्फत त्वरित तारेने ८ ते १२ तासाचे आत कळवावी.

५) आरोपीला अटक होताच अगर स्थानबद्ध होताच यावरील अधिकारांची जाणीव नातेवाईक, मित्रांना कळविण्याची आरोपीस करून घ्यावी.

६) ज्या ठिकाणी आरोपीस डांबून ठेवले त्या ठिकाणाच्या डायरीत अटकेची नोंद करावी. तसेच आरोपीचे नातेवाईक – ज्यांना अटकेचे वृत्त कळविले त्यांची नावे लिहावीत. तसेच ज्या पोलीस अधिकाऱ्याचे कब्जात आरोपी आहे त्याची सविस्तर नावे, माहिती द्यावी.

७) अटकेच्या वेळी आरोपीने विनंती केल्यास त्याची शारीरिक तपासणी करून त्याचे शरीरावरील लहान–मोठ्या जखमांची नोंद करावी. या तपासणी मेमोवर आरोपीची आणि पोलीस अधिकाऱ्याची सही घ्यावीच, आणि त्याची एक नक्कल आरोपीस द्यावी.

८) आरोपी अटकेत असेतोपर्यंत दर ४८ तासांनी प्रशिक्षित डॉक्टरामार्फत त्याची तपासणी करून घ्यावी. असा डॉक्टर तयार केलेल्या पॅनेलवरील असला पाहिजे. आणि ते पॅनल राज्य अगर केंद्राच्या आरोग्य सेवेच्या संचालकाने मान्य केलेले असावे. अशा संचालकांनी सर्व तालुके, जिल्ह्याकरिता तयार करावे.

९) वर सांगितलेल्या दस्तऐवजांच्या नकला त्यात अटक मेमोसह संबंधित मॅजिस्ट्रेटकडे रेकॉर्ड म्हणून पाठवून देणे.

१०) अटक आरोपीस त्याची पोलिसांकडून विचारपूस होत असताना त्यांचे वकिलास भेटण्याची परवानगी द्यावी. अशी परवानगी संपूर्ण विचारपूस होईपावेतो आवश्यक नाही.

११) सर्व जिल्हा आणि राज्याचे ठिकाणी पोलीस नियंत्रण कक्ष असावे. त्या ठिकाणी अटक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने अटक केल्यापासून १२ तासांचे आत माहिती ते कळवावे. आणि ती माहिती पोलीस नियंत्रण कक्षेत ठळकपणे दिसेल अशा जागी बोर्डावर लिहावी.

6) **Sheela Barse v. State of Maharashtra, 1983, SCC 96**

**मार्गदर्शक सूचना –**

१) संशयित महिलेला स्वतंत्र लॉकअपमध्ये महिला कॉन्स्टेबलच्या देखरेखीखाली ठेवले पाहिजे.

२) महिला पोलीसव्यक्ती समोर महिलेची विचारपूस (प्रश्न–उत्तरे)

३) अधिपत्राशिवाय अटक केलेल्या व्यक्तीला तत्काळ अटकेची कारणे आणि जामिनाच्या अधिकाराबाबत सांगितले पाहिजे.

४) अटक होताच, अटक झालेल्या व्यक्तीकडून अटकेचे वृत्त कळवण्यासाठी त्याच्या नातेवाईक किंवा मित्रांचे नाव घेतले पाहिजे आणि त्यांना अटकेबाबत कळविले पाहिजे.

५) पोलीसांनी व्यक्तीला अटक केल्यानंतर आणि लॉकअपमध्ये ठेवल्यानंतर लगेच जवळच्या कायदा साहाय्य समिती (Legal aid committee) ला कळवले पाहिजे.

६) अशा व्यक्तीने कायद्याचे साहाय्य स्वीकारण्याची इच्छा दर्शविल्यानंतर या Legal aid committee ने ते साहाय्य राज्याच्या खर्चाने पुरवले पाहिजे.

**7) Behera v. State of Orissa, 1993, SCC 746 -**

**मार्गदर्शक सूचना –**

१) राज्य सरकारच्या घटकांकडून मूलभूत हक्कांचे उल्लंघन झालेल्या व्यक्तींना किंवा त्यांच्या वारसांना नुकसानभरपाई देणे हे राज्य सरकारला बंधनकारक आहे.

२) योग्य चौकशी किंवा कार्यवाही झाल्यानंतर राज्य सरकारला अपराधी अधिकाऱ्याकडून नुकसानभरपाई मिळविण्याचा अधिकार आहे.

३) फौजदारी खटल्यातील राज्य सरकारचे नुकसानभरपाईचे आदेश बळीत पडलेल्या व्यक्तीला किंवा त्याच्या वारसांना पुन्हा दिवाणी खटल्यातून मिळणाऱ्या नुकसानभरपाईला आडकाठी होणार नाही.

(for loss of earning capacity)

**८) मजदूर चेतना संघटना विरुद्ध मध्यप्रदेश सरकार – AIR 1995, SC 31**

**मार्गदर्शक सूचना –**

– जे आरोपी किंवा कैदी पोलीस किंवा जेल अधिकाऱ्यांच्या मते हिंसक आहेत, पळून जातील अशा व्यक्तींना कोर्टासमोर हजर करताना जर बेड्या घालाव्या लागल्या तर त्यासाठी सबळ कारण संबंधित अधिकाऱ्याने कोर्टासमोर लेखी स्वरूपात दिले पाहिजे आणि त्याबाबत न्यायालयाची पूर्ण संमती घेऊनच संबंधित व्यक्तीला बेड्या घातल्या पाहिजेत.

●●●

## प्रकरण - ४

# राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची अनुसूचित जाती आणि जमाती, महिला, बाल व अल्पसंख्याक याबाबतची कार्ये व अधिकार

# Functions & Powers of National Commissions for Human Rights, Scheduled Castes & Scheduled Tribes, Women, Children, Minorities.

### I) अनुसूचित जमाती व मानवी हक्क

#### १) प्रस्तावना :

आदिवासी समाज हा भारतीय समाजातील दुर्बल घटकांपैकी एक होय. आदिवासी समाजाला मूळ निवासी किंवा अगदी मूळचे रहिवासी, वनवासी, जंगलचे राजे, आदिम जमाती, भूमिपुत्र अशा वेगवेळ्या नावांनी संबोधले जाते. भारतीय राज्यघटनेत आदिवासी जमातींचा उल्लेख अनुसूचित जमाती असा करण्यात आला आहे.

#### २) आदिवासी समाजाची व्याख्या

आदिवासी समाज म्हणजे प्रगत समाजापासून अलिप्त असलेला दूर रानावनात व डोंगरदऱ्यात वास्तव्य करणारा आणि धर्म, बोलीभाषा इत्यादी बाबतीत समानता असलेला असा साधा सामाजिक समूह होय.

**गिलीन व गिलीन** यांनी आदिवासी समाजाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

एका विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणारा, समान बोलीभाषा बोलणारा आणि समान सांस्कृतिक जीवन जगणारा; परंतु अक्षरओळख नसलेला स्थानिक गटांचा समुच्चय म्हणजे आदिवासी समाज होय.

#### ३) घटनात्मक उपाययोजना

भारतीय राज्यघटनेतही आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी काही खास उपाययोजना करण्यात आल्या आहेत. आपल्या घटनाकारांनी सर्व भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची हमी दिली आहे. सामाजिक न्यायाची प्रस्थापना झाल्याखेरीज लोकशाही व्यवस्थेला खराखुरा अर्थ प्राप्त होणार नाही हे आपल्या घटनाकारांनी अचूक जाणले होते, म्हणून त्यांनी भारतीय समाजातील दुर्बल व मागासलेल्या घटकांच्या कल्याणासाठी प्रत्यक्ष राज्यघटनेतच काही खास तरतुदी करून ठेवल्या आहेत.

भारतीय राज्यघटनेत आदिवासी जमातींना अनुसूचित जमाती असे संबोधण्यात आले आहे. अनुसूचित जमातींसाठी राज्यघटनेत करण्यात आलेल्या महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे सांगता येतील –

**i) मूलभूत हक्क**

भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांत आदिवासींच्या संदर्भात खालील हक्कांचा उल्लेख करता येईल –

**ii) समानतेचा हक्क**

भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांमध्ये दुर्बल घटकांच्या हितांचा विचार करण्यात आला आहे. त्यासंदर्भात मूलभूत हक्कांच्या यादीतील समतेच्या हक्काचा खास उल्लेख केला पाहिजे. राज्य नागरिकांमध्ये वंश, धर्म, जात, जन्मस्थान,

लिंग यापैकी कोणत्याही गोष्टीच्या आधारे भेदभाव करणार नाही, तसेच देशातील सर्व नागरिकांना सर्व बाबतीत समान संधी दिली जाईल असे राज्यघटनेने स्पष्ट केले आहे.

**iii) स्वातंत्र्याचा हक्क**

स्वातंत्र्याचा हक्क हा भारतीय राज्यघटनेतील आणखी एक महत्त्वाचा हक्क होय. भारतीय राज्यघटनेने सर्वच नागरिकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची हमी दिली आहे.

**iv) शोषणविरुद्धचा हक्क**

भारतीय राज्यघटनेच्या २३व्या कलमान्वये माणसांचा क्रयविक्रय करणे किंवा त्यांच्याकडून वेठबिगाराप्रमाणे सक्तीने काम करवून घेणे यांसारख्या प्रकारांवर बंदी घालण्यात आली आहे. आदिवासींच्या दृष्टीने या हक्काला विशेष महत्त्व आहे. कारण आदिवासी जमातींच्या लोकांना प्रगत समाजातील काही घटकांकडून वेठबिगाराप्रमाणे राबवून घेतले जात होते.

**v) मार्गदर्शक तत्त्वे**

राज्याच्या धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा राज्यघटनेतील समावेश हे आपल्या राज्यघटनेचे एक ठळक वैशिष्ट्य समजले जाते. राज्यघटनेतील या भागातही समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याच्या आणि त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याच्या अभिवचनासंबंधी अनेक तरतुदी आहेत. मार्गदर्शक तत्त्वातील सामाजिक तत्त्वे आणि आर्थिक तत्त्वे ही प्रामुख्याने राज्याच्या कल्याणकारी कार्याशी निगडित असलेली तत्त्वे आहेत. त्यापैकी काही महत्त्वाच्या तत्त्वांचा आपण या अगोदरच्या विवेचनात परामर्श घेतला आहे.

## ४) अनुसूचित आणि आदिवासी प्रदेश

राज्यघटनेच्या २४४ व्या कलमात अनुसूचित प्रदेश आणि आदिवासी प्रदेश यांच्या प्रशासनासंबंधी (Administration Scheduled areas and Tribal areas) तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्याकरिता राज्यघटनेत पाचवे व सहावे परिशिष्ट अंतर्भूत करण्यात आले आहे.

राज्यघटनेतील पाचव्या परिशिष्टात अनुसूचित प्रदेश आणि आदिवासी प्रदेश यांच्या प्रशासनासंबंधी व नियंत्रणासंबंधी तरतुदी आहेत. राज्यघटनेने भारताच्या राष्ट्रपतीला कोणत्याही राज्यातील अथवा केंद्रशासित प्रदेशातील विशिष्ट प्रदेश हा अनुसूचित प्रदेश म्हणून घोषित करण्याचे अधिकार दिले आहेत. त्यानुसार आदिवासी जमातीचे वास्तव्य असलेल्या प्रदेशांना राष्ट्रपती अनुसूचित प्रदेश म्हणून घोषित करू शकतो.

कोणताही प्रदेश अनुसूचित प्रदेश म्हणून घोषित करण्यात आला तर त्याचे लाभ पुढीलप्रमाणे मिळू शकतात –

१) राज्याचा राज्यपाल अनुसूचित प्रदेशातील आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरणाला प्रतिबंध करू शकतो.

२) राज्यपाल त्या प्रदेशातील सावकारीवर नियंत्रण घालू शकतो. त्यासाठी नियम करताना संसद, राज्य कायदेमंडळ यांनी केलेल्या कायद्यातील तरतुदींना स्थगिती देण्याचा अधिकारही राज्यपालाला मिळाला आहे, म्हणजे राज्यपाल हे असे घोषित करू शकतात की, संसदेचा किंवा राज्य कायदेमंडळाचा विशिष्ट कायदा अथवा त्या कायद्यातील विशिष्ट तरतुदी अनुसूचित विभागाला लागू होणार नाहीत.

३) राज्यपाल अनुसूचित प्रदेशाच्या प्रशासनाविषयी राष्ट्रपतींना वेळोवेळी अहवाल पाठवू शकतो.

४) अनुसूचित प्रदेशांचा समावेश असलेल्या राज्यात आदिवासी सल्लागार मंडळाची स्थापना केली जाऊ शकते.

आदिवासी सल्लागार मंडळ आदिवासी जमातींच्या कल्याणाविषयी राज्यपालांना सल्ला देण्याचे कार्य करते. या मंडळात जास्तीत जास्त २० सभासद असतात. त्यापैकी तीन-चतुर्थांश सभासद हे अनुसूचित जमातींच्या आमदारांमधून घेतले जातात.

### ५) आदिवासी महिला सशक्तीकरण योजना

केंद्र सरकारने सन २००२-०३ मध्ये आदिवासी महिला सशक्तीकरण योजना या नावाने एक नवी योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखाली असलेल्या आदिवासी महिलांना किरकोळ स्वरूपाच्या कामासाठी ५० हजार रुपयांपर्यंत ४ टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध करून दिले जाते. दारिद्र्यरेषेखालील आदिवासी कुटुंबांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी ही योजना अत्यंत उपयुक्त ठरली आहे.

## II) अनुसूचित जाती व मानवी हक्क

भारतीय समाजातील जे वर्ग किंवा घटक परंपरेने सामाजिक अन्यायाचे बळी ठरले आहेत आणि ज्यांचे आर्थिक व सामाजिक शोषण वर्षानुवर्षे अव्याहतपणे चालू राहिले आहे अशा वर्गांत किंवा घटकांत अनुसूचित जातींचा समावेश होतो. भारतीय समाजातील अत्यंत दुर्बल किंवा कमकुवत घटक म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. पारंपरिक भारतीय समाजात अनुसूचित जातींना अस्पृश्य जाती असे म्हटले जात होते. त्यांना दलित जाती असेही संबोधले जाते. भारतीय राज्यघटनेने त्यांना अनुसूचित जाती असे संबोधले आहे. महात्मा गांधींनी त्यांचे हरिजन असे नामकरण केले होते.

### १) जातींची व्याख्या

जातिव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी काही समाजशास्त्रज्ञांनी जात या शब्दांच्या केलेल्या व्याख्या आपण विचारात घेऊ.

**डॉ. मुजूमदार व मदन यांची व्याख्या**

जात हा एक बंदिस्त वर्ग आहे.

**सर हर्बर्ट रिस्ले यांची व्याख्या**

समान नाव धारण करणारा, मानवी किंवा दैवी अशा काल्पनिक पूर्वजांपासून आपली उत्पत्ती झाली आहे असे समजणारा, आपला पिढीजात व्यवसाय करणारा आणि आपले मत व्यक्त करण्यास समर्थ असलेल्या अधिकारी व्यक्तींकडून तो एक एकसंध समुदाय आहे अशी मान्यता मिळालेला कुटुंबांचा समुच्चय म्हणजे जात होय.

### २) घटनात्मक तरतुदी

भारतात लोकशाही शासनपद्धती यशस्वी व्हायची असेल तर या ठिकाणच्या सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांना समाजातील इतर वर्गाच्या बरोबरीचे स्थान प्राप्त करून दिले पाहिजे. ही गोष्ट आपल्या घटनाकारांनी ओळखली होती. त्यांनी या देशात कल्याणकारी राज्याची स्थापना करण्याचे स्वप्न पाहिले होते, त्यामुळे समाजातील दुर्बल घटकांच्या हिताचे रक्षण व्हावे आणि त्यांना आपला विकास करून घेण्याची संधी मिळावी याकरिता घटनाकारांनी राज्यघटनेत काही महत्त्वपूर्ण तरतुदी करून ठेवल्या आहेत.

अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी राज्यघटनेत करण्यात आलेल्या काही महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे सांगता येतील-

**i) सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची हमी :**

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात सर्व भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळवून देण्याची हमी देण्यात आली आहे. सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणाचा विचार अग्रक्रमाने झाला पाहिजे ही गोष्ट ओघानेच येते.

**ii) स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यांची हमी :**

राज्यघटनेच्या सरनाम्यात स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या उदात्त तत्त्वांचीही हमी देण्यात आली आहे. समता व बंधुभाव यांची हमी देताना घटनाकारांनी समाजातील मागासलेल्या वर्गांचाच विचार प्रामुख्याने केला होता.

### ३) अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग

भारतीय राज्यघटनेच्या ३३८ व्या कलमात अनुसूचित जातींसाठी एक राष्ट्रीय आयोग स्थापन करण्यासंबंधी तरतूद आहे. सुरुवातीला अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी अशा प्रकारचा एकच राष्ट्रीय आयोग स्थापन करण्याची तरतूद होती, परंतु सन २००३ च्या ८९ व्या घटनादुरुस्तीअन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी दोन स्वतंत्र आयोग स्थापन करण्यासंबंधी तरतूद करण्यात आली.

#### i) आयोगाची रचना :

सन २००३ च्या ८९ व्या घटनादुरुस्तीअन्वये अनुसूचित जातींसाठीच्या राष्ट्रीय आयोगात एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष आणि तीन इतर सदस्य यांचा समावेश असतो.

आयोगाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांची नियुक्ती भारताच्या राष्ट्रपतींकडून केली जाते, तसेच आयोगाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांच्या सेवाशर्ती व कार्यकाल यासंबंधीचे नियम तयार करण्याचे अधिकारही राष्ट्रपतींना देण्यात आले आहेत.

#### ii) आयोगाची कार्ये :

अनुसूचित जातीसाठींच्या राष्ट्रीय आयोगाची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील

१) अनुसूचित जातींच्या संरक्षणासाठी राज्यघटनेत करण्यात आलेल्या तरतुदी, वेळोवेळी अंमलात आणले गेलेले कायदे किंवा शासनाने काढलेले आदेश यासंबंधीच्या बाबींची चौकशी करणे व त्यावर लक्ष ठेवणे, तसेच त्यासंबंधी करण्यात आलेल्या कार्यवाहीचे मूल्यमापन करणे.

२) अनुसूचित जातींचे हक्क व सवलती हिरावून घेतल्या गेल्यासंबंधीच्या किंवा अनुसूचित जातींना त्यापासून वंचित ठेवण्यात आल्यासंबंधीच्या विशिष्ट तक्रारींची चौकशी करणे.

३) अनुसूचित जातींच्या सामाजिक आणि आर्थिक विकास नियोजनाच्या प्रक्रियेत सहभागी होणे आणि त्यासंबंधी सल्ला देणे, तसेच केंद्र सरकार आणि कोणतेही राज्य सरकार यांनी हाती घेतलेल्या विकासकार्याच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे.

४) अनुसूचित जातींच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी केल्या जात असलेल्या कार्यासंबंधी राष्ट्रपतींना वार्षिक, तसेच आयोगाला उचित वाटेल अशा इतर वेळीही, अहवाल सादर करणे.

५) अनुसूचित जातींच्या रक्षणासाठी राज्यघटनेत असलेल्या तरतुदींची केंद्र व राज्ये यांच्याकडून परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी कोणते उपाय योजले जावेत, तसेच त्यांचे रक्षण, कल्याण आणि सामाजिक – आर्थिक विकास यांकरिता अन्य कोणते उपाय अंमलात आणले जावेत यांसंबंधी शिफारशी करणे.

६) संसदेने केलेल्या कायद्यांतील तरतुदींच्या अधीन राहून अनुसूचित जातींचे कल्याण, संरक्षण आणि विकास यासंबंधी राष्ट्रपतींनी वेळोवेळी सोपविलेली कामे पार पाडणे.

### ४) नागरी हक्क संरक्षण कायदा

भारतीय संसदेने सन १९५५ मध्ये अस्पृश्यता – निवारणासंबंधीचा एक कायदा संमत केला होता. संसदेच्या या कायद्यान्वये व्यक्तिगत जीवनात अथवा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यतेचे पालन करण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला होता, तसेच त्या कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस शासन करण्याची तरतूदही त्यामध्ये करण्यात आली होती.

वरील कायदा आणखी परिणामकारक बनविण्यासाठी आणि त्याची व्याप्ती वाढविण्यासाठी त्यामध्ये व्यापक दुरूस्त्या करण्यात आल्या. त्यानंतर त्याचे नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ असे नामांतर करण्यात आले.

या कायद्यातील तरतुदीनुसार अस्पृश्यतेच्या कारणासाठी एखाद्या व्यक्तीला तिच्या हक्कांपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस शासन केले जाऊ शकते.

**५) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८४**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यावर होत असलेल्या अत्याचाराला प्रतिबंध करण्यासाठी संसदेने १९८९ मध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा संमत केला. ३० जानेवारी, १९९० पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

संसदेच्या या कायद्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यावरील अत्याचारांशी संबंधित गुन्हे कोणते हे स्पष्ट करण्यात आले आहे, तसेच अशा गुन्ह्यांसाठी कडक शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. या कायद्यांतर्गत विशेष नियम बनविण्यात आले असून त्यांमध्ये बाधित व्यक्तीला साहाय्य करण्यासंबंधी आणि तिचे पुनर्वसन करण्यासंबंधी तरतुदी आहेत. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सर्व राज्यांनी विशेष न्यायालयांची स्थापना केली आहे. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या खर्चापैकी ५० टक्के रक्कम राज्यांना केंद्राकडून दिली जाते.

**६) सफाई कर्मचाऱ्यांसाठीचा राष्ट्रीय आयोग**

सफाई कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रीय आयोग कायदा : या कायद्यातील तरतुदीनुसार १२ ऑगस्ट, १९९४ रोजी सफाई कर्मचाऱ्यांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

सफाई कर्मचाऱ्यांचे हितसंबंध व हक्क यांचे रक्षण करणे आणि त्यांना चालना देणे हा या आयोगाच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश आहे.

सफाई कर्मचाऱ्यांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे आहेत –

१) सफाई कर्मचाऱ्यांच्या तक्रारी व समस्या यांची चौकशी करणे.

२) सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी असलेले कार्यक्रम व योजना यांच्या अंमलबजावणीशी संबंधित बाबींची चौकशी करणे.

सफाई कर्मचाऱ्यांवर परिणाम करणाऱ्या सर्व महत्त्वाच्या धोरणात्मक बाबीसंबंधी आयोगाशी विचारविनिमय करणे सरकारवर बंधनकारक असते.

**७) मंडल आयोग**

सन १९७७ मध्ये देशाच्या राजकारणात मोठे परिवर्तन झाले. त्या वर्षी झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव होऊन त्याची सत्तेतील मक्तेदारी संपुष्टात आली. नव्यानेच स्थापन झालेला जनता पक्ष केंद्रात सत्तेवर आला. या पक्षात इतर मागासवर्गाच्या नेत्यांची बरीच संख्या होती. पक्षात त्यांचा बऱ्यापैकी प्रभाव होता, त्यामुळे जनता पक्षाच्या सरकारने इतर मागासवर्गांच्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेतली. त्याचा दृश्य परिणाम म्हणजे नव्या मागासवर्ग आयोगाची झालेली स्थापना होय.

केंद्र सरकारने सन १९७९ मध्ये बिंदेश्वरीप्रसाद मंडल यांच्या अध्यक्षतेखाली नवा मागासवर्ग आयोग स्थापन केला. या आयोगाने १९८० मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला.

मंडल आयोगाने आपल्या अहवालात देशातील ३,७६६ जातींचा इतर मागासवर्गात समावेश करण्यासंबंधी शिफारस केली होती.

## मंडल आयोगाने निर्धारित केलेले निकष

मंडल आयोगाने अत्यंत वस्तुनिष्ठपणे देशातील इतर मागासवर्गाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीची पाहणी केली. इतर मागासवर्गात कोणत्या जातीचा समावेश करावयाचा याचा निर्णय घेण्यासाठी आयोगाने तीन प्रकारच्या निकषांचा आधार

घेतला. ते निकष पुढीलप्रमाणे सांगता येतील –

**i) सामाजिक निकष –**

१) समाजातील इतर विभाग ज्या जातींना व वर्गांना सामाजिकदृष्ट्या मागासलेले मानतात असे जाती/वर्ग

२) शारीरिक श्रमावर अवलंबून असतात असे जाती/वर्ग

३) त्या त्या राज्यातील एकत्रित सरासरीपेक्षा ग्रामीण भागात २५ टक्के स्त्रिया व १० टक्के पुरुष (शहरी भागात १० टक्के स्त्रिया व ५ टक्के पुरुष) १७ वर्षाच्या आत लग्न करतात असे जाती/वर्ग

४) राज्यातील एकूण सरासरीपेक्षा २५ टक्के जास्त स्त्रिया श्रमात प्रत्यक्ष भागीदारी करतात असे जाती/वर्ग

**ii) शैक्षणिक निकष**

१) ५ ते १५ या वयोगटातील शाळेत न जाणाऱ्या मुलांची सरासरी संख्या राज्याच्या सरासरीपेक्षा २५ टक्क्यांहून जास्त आहे असे जाती/वर्ग

२) ५ ते १५ या वयोगटातील शाळा मधूनच सोडणाऱ्या मुलांची सरासरी संख्या राज्याच्या एकत्रित सरासरीपेक्षा २५ टक्क्याहून जास्त आहे असे जाती जाती/वर्ग

३) मॅट्रिकपर्यंत शिकणाऱ्या मुलांची सरासरी संख्या राज्याच्या एकत्रित सरासरीपेक्षा २५ टक्क्याहून कमी आहे असे जाती/वर्ग

**iii) आर्थिक निकष**

१) राज्याच्या एकत्रित सरसरीपेक्षा ज्यांच्या कुटुंबाची मालमत्ता २५ टक्क्याहून कमी आहे असे जाती/वर्ग

२) राज्याच्या एकत्रित सरासरीपेक्षा कच्च्या किंवा मातीच्या घरात राहणाऱ्यांची सरसरी संख्या २५ टक्क्याहून जास्त आहे असे जाती/वर्ग

३) अर्ध्या किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरून पिण्याचे पाणी आणावे लागते अशा कुटुंबांची संख्या ५० टक्के आहे असे जाती/वर्ग

४) राज्याच्या एकत्रित सरसरीपेक्षा खावटी तगाई घेणाऱ्यांची सरासरी संख्या २५ टक्क्याहून जास्त आहे असे जाती/वर्ग

आयोगाने निश्तिच केलेले वरील तीन गटांतील निकष सारखेच महत्त्वाचे नाहीत, त्यामुळे आयोगाने त्याना वेगवेगळे गुण प्रदान केले होते. यांपैकी सामाजिक निकषांना प्रत्येकी ३ गुण, शैक्षणिक निकषांना प्रत्येक २ गुण आणि आर्थिक निकषांना प्रत्येकी १ गुण अशी गुणांची विभागणी करण्यात आली होती. याप्रमाणे एकूण २२ गुण निश्चित करण्यात आले होते. ज्या जातींना त्यापैकी ११ किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळाले त्या जाती इतर मागासवर्गीय ठरविण्यात आल्या.

## आयोगाच्या अन्य शिफारशी

मंडल आयोगाने इतर मागासवर्गीय आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक महत्त्वाच्या शिफारशी केल्या होत्या. त्यांपैकी काही शिफारशी पुढीलप्रमाणे होत –

१) शासकीय व निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, अनुदानित खासगी संस्था आणि शासनाचे सार्वजनिक उद्योग अशा सर्व ठिकाणी इतर मागासवर्गांसाठी २७ टक्के जागा राखीव ठेवल्या जाव्यात.

२) खुल्या स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या इतर मागासवर्गीय उमेदवारांचा समावेश खुल्या गटात करण्यात यावा.

३) इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी नोकरीसाठीची वयोमर्यादेची अट शिथिल करण्यात यावी.

४) शासकीय सेवेतील सेवकांसाठी पदोन्नतीतही वरीलप्रमाणे आरक्षण असावे.

५) वरील शिफारशींच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांत व नियमांत आवश्यक ते बदल करण्यात यावे.

६) ज्या भागात इतर मागासवर्गीयांची मोठी संख्या आहे त्या ठिकाणी प्रौढ शिक्षणवर्ग सुरू करावेत.

७) इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा तसेच वसतिगृहे स्थापन करावीत.

८) इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यवसायशिक्षणाची व तंत्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जावी.

९) इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यवसायशिक्षणाची व तंत्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जावी.

१०) इतर मागासवर्गातील लोकांना व्यवसाय किंवा उद्योग सुरू करण्यासाठी अर्थपुरवठा करणाऱ्या संस्थांची उभारणी करण्यात यावी.

११) कमाल जमीन धारणा कायद्याने अतिरिक्त ठरलेली जमीन इतर मागासवर्गीयांना वाटून देण्यात यावी, इत्यादी.

## III) महिला व मानवी हक्क

बालविकासाइतकाच महत्त्वपूर्ण विषय म्हणून महिला विकासाकडे पाहिले जाते. महिला विकासाला खास महत्त्व किंवा प्राधान्य देण्याची गरज भासण्याचे प्रमुख कारणे असे की, आतापर्यंत सर्वच समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले होते, त्यामुळे त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या मार्गात अनेक अडथळे उभे राहिले होते. वास्तविक पाहता मनुष्यप्राणी या नात्याने पुरुषांइतक्याच स्त्रियाही महत्त्वाच्या ठरतात. पुरुष व स्त्री हे परस्परांना पूरक असलेले घटक होत.

### १) संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेतच लिंगसमानतेचा आग्रह

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेतच स्त्रियांच्या हक्कांचा स्पष्ट शब्दांत उल्लेख करण्यात आला आहे. लिंगभेदासह कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्ये यांविषयी आदर व्यक्त करणे आणि त्यांस चालना देणे हे आपले एक महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याचे संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेत नमूद करण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेच्या पहिल्या कलमात असे म्हटले आहे की, वंश, लिंग, भाषा किंवा धर्म या आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वांकरिता मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्य वृद्धिंगत करणे व त्यांना सन्मान प्राप्त करून देणे यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळविणे हे संयुक्त राष्ट्रसंघाचे एक उद्दिष्ट असेल. याशिवाय संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेतील अनेक कलमांत स्त्रियांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे उल्लेख आहेत.

### २) मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्काविषयक सार्वत्रिक जाहीरनाम्यातही स्त्री–पुरुषांच्या समान हक्कांच्या तत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे. या जाहीरनाम्याच्या पहिल्या कलमात असे म्हटले आहे की, सर्व मानव प्रतिष्ठा व हक्क याबाबतीत जन्मत:च स्वतंत्र व समान आहेत. तसेच जाहीरनाम्याच्या दुसऱ्या कलमात असा उल्लेख आहे की, कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता या जाहीरनाम्यातील हक्क व स्वातंत्र्य प्राप्त करण्यास प्रत्येकजण पात्र आहे. लिंगभेद विचारात न घेता प्रत्येक मानवाला सर्व प्रकारच्या मानवी हक्कांचा लाभ मिळाला पाहिजे, किंवा लाभ घेता आला पाहिजे असे त्यामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्काविषयक आंतरराष्ट्रीय करारनामा तसेच नागरी व राजकीय हक्कविषयक आंतरराष्ट्रीय करारनामा यांतही स्त्री–पुरुष समानतेच्या तत्त्वाला मान्यता देण्यात आली आहे.

### ३) महिला आयोग

स्त्रियांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या दूर करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने १९४६ मध्ये महिला आयोगाची स्थापना केली. या आयोगाने स्त्रियांच्या विविध समस्यांचे अध्ययन करण्याच्या कामी पुढाकार घेतला आणि

त्यासंबंधी अत्यंत महत्त्वपूर्ण अशा सूचना व शिफारशी केल्या. महिलांना समाजात पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळावे आणि स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व मान्य व्हावे या दृष्टीने महिला आयोगाने महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे.

### ४) आंतरराष्ट्रीय महिला परिषद

आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने १९७५ मध्ये मेक्सिको शहरात आंतरराष्ट्रीय महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत महिलांचे हक्क आणि त्यांच्या समस्या यासंबंधी अनेक ठराव संमत करण्यात आले. निरनिराळ्या क्षेत्रांत स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वाचा स्वीकार करण्याच्या आवश्यकतेवर वरील ठरावांत भर देण्यात आला होता. आदर्श समाज निर्माण करण्यासाठी स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वाचा स्वीकार करणे आणि स्त्रिया, पुरुष व मुलांचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा व न्याय यांचे रक्षण करणे कसे आवश्यक आहे याकडे लक्ष वेधण्यात आले होते.

#### i) जागतिक महिला परिषद (१९८०)

समानता, विकास व शांततेसाठी महिला दशक म्हणून १९७६ ते १९८५ हे दशक साजरे करण्यात आले होते. त्या निमित्ताने १९८० मध्ये कोपनहेगन या ठिकाणी जागतिक महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत महिलांशी संबंधित अनेक प्रश्नांची चर्चा करण्यात आली तसेच अनेक महत्त्वाचे ठराव संमत करण्यात आले.

#### ii) जागतिक महिला परिषद (१९८५)

संयुक्त राष्ट्रसंघाने सन १९८५ मध्ये नैरोबी येथे आणखी एका जागतिक महिला परिषदेचे आयोजन केले. संयुक्त राष्ट्रसंघाने महिलांच्या हक्कांसंबंधी आणि महिलांशी संबंधित समस्या सोडविण्यासंबंधी केलेल्या कार्याचा व प्रयत्नांचा आढावा या परिषदेत घेण्यात आला. तसेच महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी भविष्यात कोणत्या दिशेने वाटचाल करणे गरजेचे आहे यांवर विचारविनिमय करण्यात आला.

#### iii) आमसभेचे महिलाविषयक विशेष अधिवेशन (२०००)

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने सन २००० मध्ये महिलाविषयक विशेष अधिवेशन बोलाविले होते. या अधिवेशनात बीजिंगच्या जागतिक महिला परिषदेने तयार केलेल्या कृती आराखड्याचा आढावा घेण्यात आला. जागतिक समुदायाने लिंग समानता प्रस्थापित करण्याच्या बाबतीत कितपत प्रगती केली आहे याचे मूल्यमापन या वेळी करण्यात आले. या विशेष अधिवेशनात जगातील १८० राष्ट्रांच्या महिला प्रतिनिधींनी भाग घेतला होता. याखेरीज जगातील अनेक महिला संघटना तसेच महिलांच्या प्रश्नांवर विधायक कार्य करणारे महिला समूह यांचाही या परिषदेत सहभाग होता. महिलांशी संबंधित अनेक प्रश्नांवर या वेळी उपयुक्त चर्चा करण्यात आली.

### ५) महिलांच्या सबलीकरणाचे राष्ट्रीय धोरण

केंद्र सरकारने २००१ मध्ये महिला सबलीकरणाचे राष्ट्रीय धोरण जाहीर केले. या धोरणाचे उद्दिष्ट महिलांचे सबलीकरण व विकास घडवून आणणे, महिलांविरुद्ध करण्यात येणारा सर्व प्रकारचा भेदभाव दूर करणे आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांत महिलांचा सक्रिय सहभाग वाढविणे हे आहे. त्याकरिता एक राष्ट्रीय कृती कार्यक्रमही निश्‍चित करण्यात आला आहे. त्यामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराची माहिती घेणे, अन्यायग्रस्त स्त्रियांना न्याय मिळवून देणे, स्त्रियांना शासकीय धोरणे व योजना यांचा लाभ मिळवून देणे, विविध संस्था, संघटना, मंडळे, आयोग यांमध्ये स्त्रियांना अधिकारपदे मिळवून देणे, स्त्रियांना उद्योग व व्यवसाय करण्यासाठी वित्तीय संस्था व बँका यांच्यामार्फत अर्थसाहाय्य उपलब्ध करून देणे, स्त्रियांना व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रशिक्षण देणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांना मदत करणे, नोकरी करणाऱ्या महिलांना नोकरीच्या ठिकाणी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे, इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

**६) राष्ट्रीय महिला आयोग**

सन १९९० च्या राष्ट्रीय महिला आयोग कायद्यांतर्गत भारत सरकारने १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली आहे.

**राष्ट्रीय महिला आयोगाची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील –**

१) महिलांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदींचे अध्ययन करून त्यावर लक्ष ठेवणे.

२) महिलांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या कायद्यांचे पुनरावलोकन करून त्यांत आवश्यकतेनुसार दुरुस्त्या सुचविणे.

३) महिलांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांच्याशी संबंधित विविध बाबींचे संशोधन व अध्ययन करणे.

४) महिलांच्या हक्कांचे रक्षण करणे, त्याकरिता महिला हक्कांचे उल्लंघन झाल्यासंबंधीच्या घटनांची दखल घेऊन त्याबाबत चौकशी करणे.

५) महिलांच्या तक्रारींचे व गाऱ्हाण्यांचे निवारण करण्यासाठी त्यांच्याकडून आलेल्या विनंतीअर्जावर विचार करणे व त्यासंबंधी योग्य ती कारवाई करणे.

६) असाह्य व गरजू स्त्रियांना कायदेविषयक अथवा अन्य बाबींची मदत करण्यासाठी पुढाकार घेणे.

७) महिलांना सन्मानाची वागणूक देण्याबद्दल लोकांत जाणीव निर्माण करणे, इत्यादी.

**७) राज्य महिला आयोग**

महिला सबलीकरणाच्या व विकासाच्या कार्याला चालना देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने जानेवारी, १९९३ मध्ये राज्य महिला आयोगाची स्थापना केली. महिलांच्या प्रश्नांची दखल घेण्यासाठी अशा प्रकारचा आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य होय.

**८) महिलांविषयक धोरण**

महिला विकासाच्या प्रश्नाला चालना देण्यासाठी आणि त्यांच्या विकासाच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने जून, १९९४ मध्ये महिलांविषयक धोरण जाहीर केले. अशा प्रकारचे महिलांविषयक धोरण जाहीर करण्यातही महाराष्ट्राने संपूर्ण देशात आघाडी घेतली आहे. राज्य सरकार महिलांच्या विकासासाठी व कल्याणासाठी कोणकोणत्या योजना राबवू इच्छिते आणि कोणकोणते उपक्रम हाती घेऊ इच्छिते याचा तपशील महिलांविषयक धोरणात देण्यात आला आहे. तसेच राज्य सरकारने या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी काही महत्त्वपूर्ण पाऊले उचलली आहेत. अशाप्रकारे महाराष्ट्र शासनाने आपल्या धोरणाला प्रत्यक्ष कृतीची जोड देण्याचा प्रयत्न केला आहे.

## IV) बालविकास व मानवी हक्क

बालविकास व मानवी हक्क यांचा अतिशय निकटचा संबंध आहे. बालविकास हा एक अत्यंत महत्त्वाचा व सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय मानला जातो. कोणत्याही देशात लहान मुलांच्या विकासाला सर्वाधिक प्राधान्य दिले जाते किंवा तसे ते दिले गेले पाहिजे. याचे कारण असे की, राष्ट्राचे संपूर्ण भवितव्य अखेरीस त्या राष्ट्रातील बालकांशीच निगडित झालेले असते. त्याच अर्थाने मुलांना राष्ट्राचे भावी आधारस्तंभ असे संबोधले जाते. मुले हीच राष्ट्राची खरीखुरी संपत्ती होय हे विधान सर्वार्थाने सत्य आहे. तथापि, बालकांना किंवा मुलांना त्यांचे हक्क मिळाल्याखेरीज त्यांचा सर्वांगीण विकास होणे शक्य नाही, म्हणून प्रत्येक देशाच्या शासनाने बालविकासाच्या प्रश्नाकडे लक्ष देताना त्यांचे हक्क कसे सुरक्षित राहतील याचा विचार करणे गरजेचे ठरते.

**१) जिनिव्हा घोषणापत्र**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्कविषयक सार्वत्रिक जाहीरनाम्यात ज्या हक्कांचा उल्लेख आहे, त्या हक्कांमध्ये लहान मुलांचे किंवा बालकांचे हक्कही अभिप्रेत आहेत, परंतु संयुक्त राष्ट्रसंघाने लहान मुलांच्या मानवी हक्कांची खास दखल

घेण्याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. किंबहुना, संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना होण्यापूर्वीही आंतरराष्ट्रीय संघटनेने या प्रश्नाकडे लक्ष पुरविले असल्याचे आणि त्यास पुरेसे महत्त्व दिले असल्याचे आपणास दिसून येते. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाने (League of Nations) आपल्या जिनिव्हा घोषणापत्रात (सन १९२४) बालकांच्या हक्कांसंबंधी पुढील मुद्यांचा स्वीकार केला जातो –

१) बालकांना पुरेसे अन्न मिळावयास हवे, त्यांना योग्य औषधोपचार व्हावयास हवे. तद्वतच मागासवर्गीय बालकास मदत आणि अनाथ व निराधार बालकास निवारा मिळणे गरजेचे आहे. याबरोबर गुन्हेगार मुलाचा समाजाकडून स्वीकार केला गेला पाहिजे.

२) अडचणीच्या किंवा संकटाच्या काळात सर्वप्रथम मदत बालकास दिली गेली पाहिजे.

३) बालकाला त्याच्या उपजीविकेचे साधन उपलब्ध होईल अशी परिस्थिती निर्माण केली गेली पाहिजे आणि सर्व प्रकारच्या शोषणापासून त्याचे रक्षण केले पाहिजे.

४) मुलांच्या अंगभूत गुणवत्तेचा समाजातील इतरांना उपयोग होईल अशा पद्धतीने त्याचे जाणीवपूर्वक पालनपोषण केले गेले पाहिजे.

### २) मुलांच्या हक्कांसंबंधीचा जाहीरनामा

सन १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाल्यावर त्याचे जिनिव्हा घोषणापत्राची पुन्हा एकदा दखल घेतली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १९५९ मध्ये मुलांच्या हक्कांचा जाहीरनामा स्वीकृत केला. त्यामध्ये पुढील मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे –

१) या जाहीरनानम्यात नमूद करण्यात आलेल्या सर्व हक्कांचा लाभ मुलाला घेता आला पाहिजे. सर्व मुले वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राजकीय वा अन्य दर्जा यांपैकी कोणत्याही आधारावर भेदभाव न करता या जाहीरनाम्यातील हक्क मिळण्यास पात्र आहेत.

२) बालकाला विशेष संरक्षण मिळाले पाहिजे. तसेच त्याचा शारीरिक, मानसिक, नैतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक विकास होण्यासाठी त्यास सर्व प्रकारच्या संधी व सुविधा कायद्याने किंवा अन्य मार्गाने मिळाल्या पाहिजेत.

३) प्रत्येक मूल त्याच्या जन्मापासून नाव व राष्ट्रीयत्त्व प्राप्त होण्यास पात्र मानले गेले पाहिजे.

४) प्रत्येक मुलाला सामाजिक सुरक्षिततेचे लाभ मिळाले पाहिजेत.

५) शारीरिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या अपंग असलेल्या मुलाला खास वागणूक व शिक्षण दिले गेले पाहिजे आणि त्याची काळजी घेतली गेली पाहिजे.

६) मुलाला त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेम मिळणे आणि त्याला समजावून घेतले जाणे गरजेचे असते, म्हणून त्याच्या पालकांनी व समाजाने ही जबाबदारी स्वीकारून ती पार पाडली पाहिजे.

७) त्यास सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा लाभ मिळाला पाहिजे.

८) त्याला सर्व परिस्थितीत संरक्षण आणि मदत यांचा सर्वप्रथम लाभ दिला गेला पाहिजे.

९) दुर्लक्ष, क्रूरता आणि शोषण यांपासून त्याचे संरक्षण केले गेले पाहिजे.

१०) सर्व प्रकारच्या भेदभावापासून बालकाचे संरक्षण केले गेले पाहिजे.

### ३) संयुक्त राष्ट्रसंघ बालनिधी (युनिसेफ)

बालविकासाच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघाने उचलेले आणखी एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघ बालनिधीची (UNISEF) केलेली स्थापना. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १९४६ मध्ये हा निधी स्थापन केला. जगातील जे देश

परकीय आक्रमणाचे बळी ठरले आहेत, अशा देशांतील मुलांना साहाय्य करणे हा या निधीची स्थापना करण्यामागचा मूळ उद्देश होता. या निधीतून संबंधित राष्ट्रांतील गरजू मुलांना आवश्यक ती मदत पुरविण्यात आली होती. पुढे संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने असा निर्णय घेतला की, विकसनशील देशांतील तसेच युद्ध व नैसर्गिक आपत्ती यांची झळ पोहोचलेल्या देशांतील मुलांनाही या निधीतून मदत देण्यात यावी. अशा प्रकारे या निधीच्या उद्दिष्टाची व्याप्ती वाढविण्यात आली.

संयुक्त राष्ट्रसंघाचे आर्थिक व सामाजिक मंडळ संयुक्त राष्ट्रसंघ बालनिधीच्या कार्यावर देखरेख ठेवते.

संयुक्त राष्ट्रसंघ बालनिधी अंतर्गत निरनिराळ्या देशांत आरोग्य केंद्रांची स्थापना, आरोग्य रक्षक कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण, माता आणि मुले यांच्यासाठी पौष्टिक आहार आणि कल्याण कार्यक्रम अशा विविध योजनांसाठी मदत देण्यात येते. तसेच आरोग्यरक्षक कार्यकर्त्यांना मदत म्हणून पाठ्यवेतने, आवश्यक ती साधनसामग्री, वाहने आणि प्रशिक्षण साहित्य दिले जाते.

**४) बालकाच्या हक्कांसबंधीचा करार**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १९८९ मध्ये बालकाच्या हक्कासंबंधीच्या कराराचा (The convention on the Rights of Child) स्वीकार केला. सन १९९० पासून त्याची कार्यवाही सुरू झाली. जगातील बहुसंख्य देशांनी या करारातील पक्ष होण्यास मान्यता दिली आहे.

मुलांच्या हक्कांसंबंधीच्या करारात मुलांचे नागरी हक्क, कौटुंबिक पर्यावरण हक्क, आरोग्यविषयक हक्क, शैक्षणिक हक्क, आणीबाणीच्या काळात विशेष संरक्षण प्राप्त करण्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क अशा अनेक हक्कांचा समावेश करण्यात आला आहे. त्यातील काही महत्त्वाचे हक्क पुढीलप्रमाणे सांगता येतील –

१) प्रत्येक मुलाला जीविताचा आणि विकासाचा हक्क आहे.

२) प्रत्येक मुलाला नाव व राष्ट्रीयत्व प्राप्त करण्याचा हक्क आहे.

३) प्रत्येक मुलाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य व धर्म स्वातंत्र्य यांचा हक्क आहे.

४) प्रत्येक मुलाला कौटुंबिक जीवनाचा लाभ घेण्याचा हक्क आहे.

५) आई-वडील व इतर कायदेशीर पालक यांची मुलांचे योग्य संगोपन करणे व विकास साधणे ही प्राथमिक जबाबदारी आहे.

६) प्रत्येक मुलाला सामाजिक सुरक्षितता प्राप्त करण्याचा हक्क आहे.

७) ज्यामुळे मुलाचा शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक विकास योग्य प्रकारे होईल, असा जीवनमानाचा दर्जा प्राप्त करण्याचा प्रत्येक मुलाला हक्क आहे.

८) प्रत्येक मुलाला आरोग्यविषयक सुविधा प्राप्त करण्याचा हक्क आहे.

९) प्रत्येक मुलाला शिक्षण घेण्याचा हक्क आहे. मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा तर मुलाचा सर्वात महत्त्वाचा हक्क ठरतो.

१०) प्रत्येक मुलाला त्याच्या वयाला अनुसरून विश्रांती, खेळ, करमणूक व सांस्कृतिक कार्यक्रम यासंबंधीचा हक्क आहे.

११) प्रत्येक मुलाला आणीबाणीच्या परिस्थितीत विशेष संरक्षण प्राप्त करण्याचा हक्क आहे.

१२) प्रत्येक मुलाला शोषणापासून संरक्षण मिळण्याचा हक्क आहे, म्हणून लहान मुलांना कामावर ठेवणे, अमली पदार्थांच्या विक्रीसाठी त्यांचा वापर करून घेणे किंवा त्यांचे लैंगिक शोषण करणे हा कायद्याने गुन्हा होय.

**५) जागतिक घोषणापत्र**

सन १९९० मध्ये मुलांचे अस्तित्व, संरक्षण व विकास यासंबंधीचे जागतिक घोषणापत्र (World Declaration on the Survival, Protection and the Developmnet of Children) जाहीर करण्यात आले. या घोषणापत्रात असे म्हटले आहे की, आनंद घेणे, शांतता मिळविणे, खेळणे, शिकणे यांसारख्या गोष्टी मुलांच्या निकोप विकासासाठी अत्यंत आवश्यक असतात, परंतु दुर्दैवाने जगातील अनेक मुलांना वरील गोष्टींचा लाभ घेता येत नाही. बालवयात निरनिराळ्या समस्यांना तोंड देण्याचा प्रसंग त्यांच्यावर येतो. अतएव, मुलांच्या हक्कांचे रक्षण करण्याच्या उद्देशाने या घोषणापत्रात दहा कलमी कार्यक्रम निश्चित करण्यात आला. त्यामध्ये दारिद्र्य निर्मूलनासंबंधीचा कार्यक्रम, पर्यावरण रक्षणविषयक कार्यक्रम, निरक्षरता कमी करण्यासंबंधीचा कार्यक्रम, मुलाच्या हक्कविषयक कराराची अंमलबजावणी करण्यासंबंधीचा कार्यक्रम, मुलाच्या सर्वांगीण विकासासंबंधीचा कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

**६) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण**

केंद्र सरकारने १९८६ मध्ये आपले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले. पुढे सन १९९२ मध्ये त्यात काही सुधारणा करण्यात आल्या. या शैक्षणिक धोरणाची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील –

१) भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, घटनात्मक जबाबदाऱ्या, राष्ट्रीयत्वाची जोपासना, भारताचा समान सांस्कृतिक इतिहास यांचा अभ्यासक्रमात समावेश.

२) भारतीय संविधानातील पायाभूत तत्त्वांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देण्याचे उद्दिष्ट.

३) राष्ट्रीय व सामाजिक एकात्मता, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण संरक्षण आणि वैज्ञनिक वृत्तीची जोपासना यांचा अभ्यासक्रमात समावेश.

४) बालसंगोपन व पूर्वप्राथमिक शिक्षण हा कार्यक्रम प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणास पूरक म्हणून सुरू करणे.

५) चौदा वर्षे वयापर्यंतच्या सर्व मुलांना सन २००० पर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देणे.

६) शिक्षण प्रसारासाठी अनौपचारिक शिक्षणाचा कार्यक्रम व्यापक स्वरूपात हाती घेणे.

७) प्रत्येक प्राथमिक शाळेत किमान सोयी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ऑपरेशन ब्लॅकबोर्ड हा कार्यक्रम राबविणे.

८) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी नवोदय विद्यालये सुरू करणे.

९) अनुसूचित जाती-जमाती व अपंगांसाठी विशेष उपक्रम राबविणे.

१०) स्त्री शिक्षणावर विशेष भर देणे.

११) व्यावसायिक अभ्यासक्रमावर विशेष भर देणे.

१२) शालेय स्तरापासूनच संगणकाचे ज्ञान देणारे उपक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेणे, इत्यादी.

**७) ऑपरेशन ब्लॅकबोर्ड**

प्राथमिक शाळांमध्ये काही किमान शैक्षणिक सोयी निर्माण करण्याच्या उद्देशाने ऑपरेशन ब्लॅकबोर्ड हा कार्यक्रम सन १९८८-८९ या शैक्षणिक वर्षापासून राज्य शासनाने हाती घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत प्राथमिक शाळांच्या पुढील किमान गरजा पूर्ण करण्याकडे लक्ष दिले जाते –

१) शाळेसाठी किमान दोन मोठ्या खोल्या.

२) शाळांमध्ये किमान दोन शिक्षक.

३) खेळणी, फळे, नकाशे, तक्ते व इतर शैक्षणिक साहित्य.

अलीकडील काळात मात्र या कार्यक्रमाची अंमलबजावणी काहीशी थंडावली असल्याचे चित्र दिसून येते.

**८) मुलांसाठी राष्ट्रीय सनद आणि मुलांसाठी राष्ट्रीय कृती योजना**

मुलांसाठी राष्ट्रीय सनद हा भारत सरकारचा धोरणविषयक दस्तऐवज होय. त्यामध्ये शासन आणि समाज यांच्या बालकांप्रती जबाबदाऱ्या व भूमिका तसेच कुटुंब, समाज व राष्ट्र यांच्याप्रती बालकांची कर्तव्ये यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. याशिवाय भारत सरकारने सन २००५ मध्ये मुलांसाठी राष्ट्रीय कृती योजना तयार केली आहे. या योजनेत पुढील दशकासाठी बालकल्याणाची कोणती ध्येये, उद्दिष्टे आणि कार्यक्रम असतील याची माहिती देण्यात आली आहे.

**९) मुलांच्या हक्कांच्या रक्षणासाठीचा राष्ट्रीय आयोग**

सन २००६ मध्ये मुलांच्या हक्कांच्या रक्षणासाठीचा राष्ट्रीय आयोग कायदा संमत करण्यात आला. या कायद्यातील तरतुदीनुसार मुलाच्या हक्कांच्या रक्षणासाठीचा राष्ट्रीय आयोग स्थापन करण्यात आला आहे.

i) **मुख्य उद्देश :** मुलांच्या हक्कांच्या रक्षणासाठीच्या राष्ट्रीय आयोगाच्या स्थापनेमागील उद्देश पुढीलप्रमाणे सांगता येतील –

१) मुलांच्या हक्कांची परिणामकारकरीत्या अंमलबजावणी केली जावी यासाठी प्रयत्न करणे.

२) मुलांच्या हक्कांच्या रक्षणासंबंधी करण्यात आलेल्या कायद्यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी केली जाईल याकडे लक्ष देणे.

३) मुलांच्या हक्कांच्या रक्षणासाठी हाती घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांची योग्य प्रकारे अंमलबजावणी केली जाईल यावर लक्ष ठेवणे.

ii) **आयोगाची रचना :** मुलांच्या हक्कांच्या रक्षणासाठीच्या राष्ट्रीय आयोगात एक अध्यक्ष, सहा सदस्य आणि एक सचिव यांचा समावेश असतो. आयोगाच्या सदस्यांपैकी किमान दोन सदस्य महिला असाव्या लागतात.

मुलांच्या प्रश्नांसंबंधीच्या निरनिराळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश या आयोगात करण्यात येतो.

मुलांच्या हक्कांच्या रक्षणासाठीच्या राष्ट्रीय आयोगाने ५ मार्च, २००७ पासून आपल्या कार्याची सुरुवात केली आहे.

## V) अल्पसंख्याक वर्ग व मानवी हक्क

**१) राज्यघटनेतील तरतुदी**

अल्पसंख्याकांच्या प्रश्नाकडे खास लक्ष देण्याची आवश्यकता आपल्या घटनाकारांनी ओळखली होती, म्हणून त्यांनी राज्यघटनेत अल्पसंख्याकांचे हितरक्षण करण्यासाठी काही विशेष तरतुदी केल्या आहेत.

**२) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क**

अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे म्हणून राज्यघटनेतील मूलभूत हक्कांच्या यादीत धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्काचा समावेश करण्यात आला आहे. धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्कांतर्गत राज्यघटनेने सर्व व्यक्तींना आपल्या सद्सद्‌विवेकबुद्धीनुसार वागण्याचे आणि आपल्या धर्माचे पालन व प्रचार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. मात्र सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्य यांना बाधा येणार नाही अशा रीतीनेच या हक्काचा वापर करता येतो.

राज्यघटनेने प्रत्येक धार्मिक संप्रदायास सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांना बाधा येणार नाही अशा रीतीने धार्मिक व धर्मदाय संस्था स्थापन करून त्या चालविण्याचा, धर्मविषयक बाबतीत कारभार पाहण्याचा, स्थावर व जंगम मालमत्ता मिळविण्याचा आणि त्यासंबंधीचा कारभार पाहण्याचा हक्क दिला आहे.

राज्यघटनेतील धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्कांतर्गत असेही स्पष्ट केले आहे की, ज्या कराचे उत्पन्न एखाद्या धर्माच्या किंवा धार्मिक पंथाच्या प्रसारासाठी अथवा रक्षणासाठी खर्च करण्यात येत असेल असे कर देण्याबाबत कोणत्याही व्यक्तीवर सक्ती केली जाणार नाही.

### ३) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क

अल्पसंख्याकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी सांस्कृतिक व शैक्षणिक हक्काचाही राज्यघटनेत समावेश करण्यात आला आहे.

या हक्कांतर्गत अशी तरतूद करण्यात आली आहे की, भारताच्या प्रदेशात किंवा त्याच्या कोणत्याही भागात वास्तव्य करणाऱ्या नागरिकांच्या कोणत्याही विभागाला स्वत:ची स्वतंत्र भाषा, लिपी किंवा संस्कृती असल्यास ती अबाधित राखण्याचा त्यास हक्क राहील.

या हक्कान्वये देशातील धार्मिक व भाषिक अशा सर्व प्रकारच्या अल्पसंख्याकांना स्वत:च्या पसंतीच्या शिक्षणसंस्था स्थापन करून त्या चालविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शिक्षणसंस्थांना मदत करताना एखादी शिक्षणसंस्था विशिष्ट धार्मिक किंवा भाषिक अल्पसंख्याकांनी चालविली आहे. या कारणावरून राज्य भेदभाव करणार नाही अशीही हमी दिली आहे.

### ४) राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग

भारत सरकारने सन १९७८ मध्ये एका अल्पसंख्याक आयोगाची स्थापना केली होती. पुढे सरकारने १९९२ च्या अल्पसंख्याकांसाठीच्या राष्ट्रीय आयोग कायद्यांतर्गत १९९३ मध्ये अल्पसंख्याकांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाची स्थापना केली. या आयोगाला कायदेशीर दर्जा लाभला होता. सन २००४ मध्ये सरकारने या आयोगाला घटनात्मक दर्जा प्राप्त करून देण्याचा निर्णय घेतला. त्याकरिता १०३ वे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत मांडण्यात आले.

राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगात एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष आणि इतर पाच सदस्य यांचा समावेश असतो. त्यांची नियुक्ती भारताचे राष्ट्रपती करतात.

राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे होत –

१) धार्मिक अल्पसंख्याकांच्या रक्षणासाठी राज्यघटनेत असलेल्या तरतुदींची कार्यवाही कशा प्रकारे होते याचे मूल्यमापन करणे.

२) अल्पसंख्याकांच्या हितरक्षणासाठी करण्यात आलेले कायदे आणि घटनात्मक तरतुदी यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासंबंधी सरकारला शिफारशी करणे.

### ५) धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांसाठी राष्ट्रीय आयोग

धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांकासाठी भारत सरकारने आणखी एक राष्ट्रीय आयोग स्थापन केला आहे.

या आयोगाची स्थापना पुढील उद्देशाने करण्यात आली आहे.

१) धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांमधील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेले विभाग निश्चित करण्यासंबंधीचे निकष ठरविणे.

२) धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांमधील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विभागांच्या कल्याणासाठी उपाय सुचविणे.

### ६) अल्पसंख्याकांसाठी १५ कलमी कार्यक्रम

केंद्र सरकारने अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी एक १५ कलमी कार्यक्रम जाहीर केला असून त्यामध्ये प्रामुख्याने पुढील तीन गोष्टींकडे खास लक्ष पुरविण्यात आले आहे.

१) जातीय दंगलींतून उद्‌भवलेल्या परिस्थितीची हाताळणी करणे आणि जातीय दंगलींना प्रतिबंध करणे.

२) केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि सार्वजनिक उपक्रम यांतील नोकऱ्यांत अल्पसंख्याक जमातीच्या व्यक्तींना योग्य प्रतिनिधित्व मिळेल याची खात्री करून घेणे.

३) अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी इतर उपाययोजना करणे.

**७) अल्पसंख्याकांचा आर्थिक विकास**

केंद्र सरकारने अल्पसंख्याकांच्या आर्थिक विकासासाठी राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त प्रमंडळ स्थापन केले आहे. हे प्रमंडळ अल्पसंख्याक जमातींमधील मागासलेल्या विभागांना त्यांच्या आर्थिक व विकासात्मक बाबींसाठी अर्थसाहाय्य उपलब्ध करून देते. हे अर्थसाहाय्य देताना अल्पसंख्याकांतील व्यावसायिक समूह व स्त्रिया यांना प्राधान्य दिले जाते.

**८) अल्पसंख्याकांचा शैक्षणिक विकास**

अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक विकासासाठी मौलाना आझाद शैक्षणिक फाउंडेशनची स्थापना करण्यात आली आहे.

समाजातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या विभागांच्या आणि खासकरून अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणे हा या फाउंडेशनच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश आहे.

मौलाना आझाद शैक्षणिक फाउंडेशनच्या वतीने मौलाना आझाद सद्‌भावना केंद्र, हुशार विद्यार्थांसाठी मौलाना आझाद राष्ट्रीय शिष्यवृत्ती आणि मौलाना आझाद साहित्य पुरस्कार या तीन नव्या योजना सुरू करण्यात आल्या आहेत.

**९) वक्फ कायदा**

मुस्लिमांसाठी असलेल्या वक्फ व वक्फ बोर्डाच्या प्रशासनासाठी केंद्र सरकारने सन १९९५ मध्ये वक्फ कायदा संमत केला आहे. राज्यातील सर्व वक्फच्या कारभारावर सर्वसाधारण देखरेख ठेवण्याचे अधिकार राज्य वक्फ बोर्डाला देण्यात आलेले असतात. केंद्र सरकार देशातील वक्फ आणि वक्फ बोर्ड यांच्या प्रशासनाशी संबंधित बाबींवर फक्त सल्ला देण्याचे कार्य करते.

●●●

## प्रकरण - ५

# पोलीस तपासासंबंधी हवालतीमधील गुन्ह्यांबाबत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या मार्गदर्शक सूचना :-

# Guidelines of NHRC relating to police investigations in custodial Crime.

**अ) पोलीस एन्काऊंटर (Police Encounter Death) :**

१. पोलीस एन्काऊंटरमधील मृत्यूची खबर मिळताच पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याने त्याबाबत असलेल्या योग्य रजिस्टरमध्ये त्याची नोंद केली पाहिजे.

२. एन्काऊंटर पार्टीमधील सदस्य हा गुन्हे अन्वेषण विभागाशी (सी.आय.डी.) संबंधित असेल तर त्याबाबत तपास हा त्याच विभागाला हस्तांतरित करणे योग्य असेल.

३. सदोष मनुष्यवधाच्या संदर्भात फौजदारी स्वरूपाची विशिष्ट फिर्याद पोलीसांविरुद्ध झाल्यास त्याबाबत भा.दं.सं. च्या योग्य त्या कलमांबाबत पहिली खबर (F.I.R.) नोंदवली पाहिजे आणि तपास सी.आय.डी.कडे दिला पाहिजे.

४. पोलीसांच्या कृत्यामध्ये मृत्यू झालेल्या अशा प्रत्येक घटनेमध्ये दंडाधिकारीय चौकशी झाली पाहिजे. त्या चौकशीबाबत मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या जवळच्या नातलगाचाही सहभाग असला पाहिजे.

५. दंडाधिकारीय चौकशी किंवा पोलीस तपासामध्ये दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांविरूद्ध तत्काळ खटला चालला पाहिजे किंवा शिस्तीबाबत कारवाई झाली पाहिजे.

६. मृत्यू पावलेल्या व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्यांना नुकसानभरपाई ही त्या-त्या तथ्यावर व परिस्थितीवर अवलंबून असेल.

७. घटना घडल्यानंतर लगेचच त्या संबंधित अधिकाऱ्यांना प्रमोशन किंवा शौर्याबाबत बक्षीस, देण्याआगोदर त्याबाबत कोणतीही शंका नसल्याची सर्व दृष्टीने खात्री केली पाहिजे.

८. पोलीस कृत्यामध्ये मृत्यू पावलेल्या केसेसचे स्टेटमेंट सहा महिन्यांनी डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस यांच्याद्वारे राष्ट्रीय मानव हक्क आयोगाकडे १५ जानेवारी आणि १५ जुलैदरम्यान प्रत्येक वर्षी पाठवले पाहिजे.

पोस्टमार्टेम, इन्क्वेस्ट आणि चौकशी अहवालासोबत खालीलप्रमाणे दिलेल्या नमुन्यात जबाब पाठवला पाहिजे.

१) तारीख आणि घटना घडल्याचे ठिकाण.

२) पोलीस ठाणे आणि जिल्हा.

३) मृत्यूची परिस्थिती.

अ) एन्काऊंटरमधील स्वत:चा बचाव.

ब) बेकायदेशीर जमाव पांगवताना.

क) अटक करताना.

४) घटनेच्या तथ्थ्यांबाबत सविस्तर माहिती.

५) गुन्हयाचा केस नंबर.

६) तपासी यंत्रणा.

७) दंडाधिकारीय किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चौकशीची टिप्पणी.

अ) मृत्यूबाबत जबाबदार अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा.

ब) बळाचा केलेला वापर योग्य आहे कां? आणि केलेले कृत्य कायदेशीर आहे का?

**ब) अटकेबाबतची मार्गदर्शक सूचना**

**i) अटक करण्यापूर्वी अवलंबण्याची पद्धत–**

वॉरंटशिवाय अटक खालील परिस्थितीत योग्य आहे.

१) जर खून, दरोडा, बलात्कार इ. प्रकारच्या गंभीर गुन्ह्यातील संशयित व्यक्ती पळून जाऊ नये. न्यायालयात हजर करणेकामी म्हणून अटक आवश्यक असेल, आणि

२) संशयित हा उद्दाम वृत्तीचा आणि आणखी गुन्हे करण्यासारखा असेल, आणि

३) पुरावे नष्ट करू नये, साक्षीदारांवर दडपण आणू नये म्हणून प्रतिबंध करणे आवश्यक असेल.

४) संशयित हा सराईत गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून त्याला अटक केली नसता पुन्हा त्याचप्रमाणे गुन्हे करण्याची शक्यता असेल.

**ii) अटक करतानाची कार्यपद्धत–**

१) बळाचा वापर शक्यतो टाळावा.

२) अटक व्यक्ती अटक करताना विरोध करीत असेल तर कमीत कमी बळाचा वापर केला पाहिजे आणि कोणतीही इजा होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

३) अटक व्यक्तीचा स्वाभिमान, इभ्रत राखली पाहिजे. सार्वजनिकरीत्या अटक व्यक्तीला फिरवणे याला परवानगी नाही.

४) अटक व्यक्तीची झडती त्याच्या स्वाभिमानाचा आदर ठेवून घ्यावी. महिलेची झडती ही दुसऱ्या महिलेद्वारेच सभ्यतेशी काटेकोरपणे सांभाळून घेतली जाईल.

५) महिलांना सूर्यास्त आणि सूर्योदय या दरम्यान अटक करता येणार नाही, तर महिलेला अटक करते वेळी महिला पोलीस अधिकारी सोबत असावी.

६) बाल गुन्हेगार आणि मुलांना अटक करतेवेळी बळाचा वापर करू नये.

७) अटक व्यक्तींना तात्काळ त्याच्या अटकेची कारणे त्याला समजतील त्या भाषेत कळवली पाहिजे.

८) जामीनपात्र अपराधामध्ये अटक केली असेल तर अटक व्यक्तीला जामिनावर सुटण्याच्या अधिकाराची माहिती दिली पाहिजे.

९) अटक आणि ताब्याची माहिती विनाविलंब पोलीस नियंत्रण कक्षाला आणि जिल्हा, राज्य मुख्यालयाला कळवली पाहिजे.

**iii) प्रश्न–उत्तराबाबतची कार्यपद्धती–**

१) संशयित व्यक्तीला त्रास आणि हीन, अपमानाच्या वागणुकीला मनाई.

२) शासनाने सुचविलेल्या जागेवरच अटक व्यक्तींची विचारपूस (प्रश्न–उत्तर) घेतली पाहिजेत.

३) प्रश्न–उत्तराची जागा सोयीची असली पाहिजे.

४) त्या व्यक्तीला कुठे विचारपूस होणार याची माहिती त्याच्या नातेवाईक किंवा मित्राला दिली पाहिजे.

५) विचारपूस (प्रश्न उत्तर) दरम्यान अटक व्यक्तीला त्याच्या अधिवक्त्यास / वकिलास भेटण्याची परवानगी असावी.

●●●

## प्रकरण - ६

# मानवी हक्क संरक्षणाबाबत पोलिसांची भूमिका

# Role of police in protection of Human rights

**१) प्रस्तावना :**

प्रत्येक देशातील पोलीस दलाची निर्मिती ही प्रामुख्याने कायदा व सुव्यवस्था यांचे पालन, गुन्हे तपास, प्रतिबंध व दक्षता घेणे यासाठी असते. स्वराज्यापूर्वी पोलिसांची जी मुख्य कर्तव्ये होती, ती आजही आहेत. परंतु त्या व्यतिरिक्त मुख्य कर्तव्ये जबाबदाऱ्या कितीतरी पटीने वाढल्या आहेत.

बदलत्या कालानुसार पोलीस अधिकाऱ्यांकडून समाजाच्या अपेक्षा वाढत आहेत. एखादा गुन्हा दाखल झाला की त्याचे निराकरण लवकर व्हावे, वस्तू लगेच परत मिळावी; माणसे सुशिक्षित असो वा अशिक्षित, अपराध झाल्याबरोबर संशयितास पोलिसांनी अटक करावी व त्याच्याकडुन कबुलीजबाब मिळवावा किंवा प्रत्येक घटनेच्या वेळी पोलिसांनी हजर रहावे व ती घटना थांबवावी अथवा मदत करावी अशी भावना असते.

गुन्ह्यास आळा घालणे, गुन्ह्यांचा तपास करणे आणि सर्वतोपरी शांतता व सुव्यवस्था राखणे ही पोलिसांची आद्य कर्तव्ये होती व तशीच आजही आहेत. मात्र आज या मूलगामी कर्तव्यात कितीतरी अधिक कर्तव्याची भर पडली आहे.

**२) पोलिसांची मुख्य कर्तव्ये -**

१) स्वतःच्या कार्यकक्षेत डोळ्यात तेल घालून पहारा करणे.

२) हवामानाची तमा न करता कर्तव्य पालन करणे.

३) नागरिकांवर कोसळणाऱ्या धोक्यांना व दैवी अपत्तींना कर्तव्यनिष्ठेने तोंड देणे व सर्वतोपरी मदत करणे.

४) गुन्हेगारांना काबूत राखणे व त्याकरिता प्रतिबंधक उपायांची योजना करणे.

५) गटागटातील मारामाऱ्या टाळणे व त्या झाल्यास शांतता प्रस्थापित करून कायदेशीर इलाज योजणे.

६) जातीय दंगली टाळणे व त्या झाल्यास ताबडतोब शांतता प्रस्थापित करण्याकरिता कार्यवाही करून कायदेशीर उपाय योजना करणे.

७) नैसर्गिक आपत्तींना तोंड देणे व नागरिकांस त्यास तोंड देण्यास मदत करणे.

८) वाहतूक नियंत्रण करणे व ती करताना लोकमत अजमावून कायदेशीर तरतूद करणे.

९) वाहतुकीचे अपघात टाळण्याकरिता अभ्यास करून उपाययोजना करणे व जे अपघात घडतात त्यांची कारणे शोधून काढून प्रतिबंधक उपाय योजणे.

१०) सामाजिक समाजाला अप्रिय असेल तरी कायद्याची अंमलबजावणी करणे.

११) वाममार्गाला जाणाऱ्या मुला-मुलींचे संरक्षण करणे व प्रतिबंधक उपाय योजणे.

१२) सराईत गुन्हेगारांचा प्रतिशोध करणे.

१३) गुंडांना काबूत राखणे.

१४) मुली व स्त्रियांची चेष्टा करणाऱ्या समाजकंटकांना प्रतिबंध घालणे आणि वाममार्गाला लागलेल्या किंवा पतित स्त्रियांवर कायदेशीर उपाययोजना करणे.

१५) बड्या पाहुण्यांचा बंदोबस्त राखणे.

१६) मुख्य कर्तव्य म्हणजे – गुन्ह्याचा तपास लावणे.

**३) मानवी हक्क संरक्षण व पोलिसांची भूमिका**

अलीकडच्या काळात मानवी हक्क रक्षण व संवर्धन याला संपूर्ण जगात व भारत देशात बरेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. याबाबत आपल्या पोलीस अधिकाऱ्यांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. पोलीस व जनता यांचे संबंध खेळीमेळीचे, सलोख्याचे व आदरभावाचे राहण्याकरिता पोलीसांना काही गोष्टी आत्मसात करून आपल्या विश्वासपात्रतेबद्दल लोकांची खात्री केली पाहिजे.

१) सभ्य जनतेशी वर्तणूक व त्यांच्या तक्रारी समजावून घेऊन कायद्याचे कक्षेत तक्रारीचे निवारण करण्याची वृत्ती.

२) अत्यंत निकड असेल तरच एखाद्यास अटक करणे व अटक केलेल्या इसमास त्याच्या योग्यतेप्रमाणे वागणूक देणे.

३) सर्वसामान्यपणे आम जनतेला मदत करण्याची उत्सुकता व तयारी असणे. त्यांची गाऱ्हाणी शांततेने ऐकणे व त्वरित कार्यवाही करणे.

४) कायद्याचे कक्षेत काही गोष्टी करता येत नसल्यास तक्रार निवारणार्थ मार्गदर्शन करणे.

५) सचोटी.

६) धंद्यातील कार्यक्षमता.

७) सराईत गुन्ह्यांवर वचक आणि धाक.

८) उत्कृष्ट शिस्त.

९) प्रसिद्धी पराङ्मुखता.

१०) गर्हणीय गुन्ह्यांचा निकडीने शोध.

११) अल्पसंख्याकांशी योग्य वर्तणूक.

१२) घटनेतील मूलभूत हक्कांशी सुसंगत वर्तन.

१३) कसल्याही दबावाखाली कायद्याविरुद्ध वर्तन न करण्याची शाश्वती.

१४) सुसंस्कृत, सुशिक्षित व कार्यक्षम अधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी असल्याबद्दलची जनतेची खात्री.

वरील सर्व बाबतीत जास्तीत जास्त गुण आत्मसात करण्याकरिता पोलीस अधिकारी कार्यप्रवण असावेत व हे सर्वच्या सर्व गुण त्यांच्यात उतरावेत म्हणजे सुधारण्यास हातभार लागेल.

**४) मानवी हक्क जोपासनेसाठी वागणूक**

तुमच्याकडे येणारी प्रत्येक व्यक्ती आणि सर्वसामान्य लोक याबरोबर वागताना पुढील नियमांचे पालन केले तर पोलिसांच्या कर्तव्य पालनाच्या दृष्टीने हिताचे ठरेल.

१) इतरांच्या सुख-दु:खाशी समरस व्हा.

२) सदा हसतमुख राहा.

३) प्रत्येक माणसाला आपले स्वत:चे नाव हे प्रिय असल्याचे वाटत असते हे लक्षात ठेवा.

४) दुसऱ्याचे म्हणणे लक्षपूर्वक ऐका आणि स्वत:विषयी सांगण्यास त्याला उत्तेजन द्या.

५) दुसऱ्याच्या भावनांकडे त्यांच्या नजरेतून पाहा.

६) दुसऱ्याशी वागताना तुमच्या दृष्टीने ती महत्त्वपूर्ण व्यक्ती आहे असे तिला वाटेल असे वागा आणि हे मनापासून करा.

पोलिसांची भारताच्या राज्य घटनेवर संपूर्ण निष्ठा असली पाहिजे आणि घटनेने नागरिकांना बहाल केलेल्या हक्कांचे संरक्षण त्यांनी केले पाहिजे. पोलीस यंत्रणा ही मुख्यत: कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता यंत्रणा आहे. रीतसर पास करण्यात आलेल्या कायद्याचे औचित्य किंवा आवश्यकता याबद्दल पोलिसांनी शंका उपस्थित करू नये व त्यांनी कायद्याची ठामपणे व नि:पक्षपातीप्रमाणे अंमलबजावणी करावी; ती करीत असताना त्यांनी भरतीत, कृपादृष्टी, दुष्टावा, द्वेष व सूडबुद्धी यांना थारा देता कामा नये.

पोलिसांनी सर्व लोकांशी सहानुभूतीने, समंजसपणे वागावे आणि त्यांच्या कल्याणाविषयी सतत दक्ष राहावे. त्यांनी सांपत्तिक स्थिती किंवा सामाजिक प्रतिष्ठा यांचा विचार न करता सदैव तत्परतेने लोकांची सेवा केली पाहिजे आणि त्यांना मदतीचा हात पुढे केला पाहिजे.

●●●

## प्रकरण - ७

# मानवी हक्कांसंबंधात पोलिसांविरुद्ध तक्रारी

# Common complaints against police regarding human rights

# (Case studies)

**प्रस्तावना :**

भारतीय राज्यघटनेमध्ये मानवी हक्कांचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने अनेक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत व वेळोवेळी अनेक कायदेही करण्यात आलेले आहेत. परंतु मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या पोलीस कैदेतील/अटकेतील हिंसाचाराच्या घटना, बातम्या वाचावयास किंवा ऐकावयास मिळतात त्यामुळे अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या वागणुकीबद्दल सामान्य व्यक्ती साशंक असते. खाली दिलेल्या न्यायनिवाड्यावरून मानवी हक्कांसंबंधात पोलिसांविरुद्ध असणाऱ्या तक्रारी व न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करता येईल.

1) **Navrata Rama Vs. State of Hariyana 1995, Cr. L.J. 1565.**
   पोलीस अधिकाऱ्यांना एफ.आय.आर. (F.I.R.) रजिस्टरमध्ये सर्व केसेसची नोंदणी करणे कायद्याने बंधनकारक आहे. आधीच त्याचा खरेखोटेपणा ठरवू नये.

2) **State of Andhra Pradesh Vs. Punti Ramlu, AIR 1993, Sc. 2644**
   अपराध आपले पोलीस स्टेशनमध्ये घडला नाही. म्हणून फिर्यादीस नकार देता येत नाही. तर नोंदणी करून संबंधित पोलीस स्टेशनकडे पाठविली पाहिजे.

3) **D.K. Basu Vs. State of West Bengal, AIR 1997, SC 610**

४) **खेदात मजदूर चेतना संघटना वि. मध्यप्रदेश सरकार, AIR 1995, SC 31.**
   जे आरोपी किंवा कैदी पोलीस किंवा जेल अधिकाऱ्यांच्या मते हिंसक आहेत, पळून जातील अशा व्यक्तींना कोर्टासमोर हजर करताना जर बेड्या घालाव्या लागल्या तर त्यासाठी सबळ कारण संबंधित अधिकाऱ्याने कोर्टासमोर लेखी स्वरूपात दिले पाहिजे. आणि त्याबाबत न्यायालयाची पूर्व संमती घेऊनच संबंधित व्यक्तीला बेड्या घातल्या पाहिजे.

5) **Haribhai Channabhai Vhoara Vs. Keshubhai Haribhai Vhora, AIR 2005, Guj 157**
   सक्तीची डी एन ए टेस्ट म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यामध्ये हस्तक्षेप.

●●●

## प्रकरण - ८

# पोलीस मानवी हक्कांचे संरक्षण करणारे असल्याची प्रतिमा वाढीस लावण्याची आवश्यकता -

# Need and initiatives to improve image of police as custodian of Human Rights.

**प्रस्तावना :**

सर्वसामान्य लोकांच्या मनात पोलीस हे मानवी हक्कांचे रखवालदार असल्याची प्रतिमा वाढीस लागावी या उद्देशाने केंद्रीय गृह मंत्रालयाने ४ जुलै ८५ व १० जुलै ८५ रोजी संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने न्याययंत्रणेतील अधिकाऱ्यांसाठी तयार केलेली आचारसंहिता लागू केली. सदरील आचारसंहितेतील तरतुदी या खालीलप्रमाणे आहेत.

१. पोलीस हे राज्य घटनेला बांधील असतील आणि राज्य घटनेने नागरिकांना दिलेल्या सर्व मूलभूत हक्कांचा आदर आणि संरक्षण करतील.

२. पोलीस अस्तित्वात असलेल्या कुठल्याही कायद्याची योग्य-योग्यता किंवा आवश्यकतेबद्दल प्रश्न उपस्थित करू शकत नाही. कुठलाही कायदा पोलिसांनी जसाच्या तसा, नि:पक्षपातीपणे कुठलीही भीती किंवा आमिषास बळी न पडता, सूड वा द्वेषबुद्धीची वर्तणूक न ठेवता राबवला पाहिजे.

३. पोलिसांनी त्यांचे अधिकार आणि कार्य याबरोबरच त्याची मर्यादाही समजून घेणे व त्याचा आदर करणे आवश्यक आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये आरोपीस शासन करण्याचे काम हे केवळ न्यायालयच करू शकते.

४. कायदा व सुव्यवस्थेच्या उपायासाठी पोलिसांनी शक्यतो मन वळवणे, उपदेश आणि इशारा या मार्गाचा अवलंब केला पाहिजे. जर बळाचा वापर करणे भाग असेल तर शक्य तेवढ्या कमीत कमी बळाचा वापर केला पाहिजे.

५. पोलिसांचे गुन्हे आणि शांतता भंगाच्या अपराधांना प्रतिबंध करण्याचे प्राथमिक कर्तव्य आहे.

६. समाजातील लोकांच्या हितसंबंधाप्रमाणे पोलिसांना त्यांचा सभासद म्हणून मान्यता दिली पाहिजे, आणि त्यांच्या वतीने त्यांना कर्तव्य बजावण्यासाठी पूर्ण अधिकार दिले पाहिजे.

७. आपले कार्यक्षम कर्तव्य हे लोकांच्या मिळालेल्या सहकार्यावर अवलंबून आहे असे पोलिसांनी मानले पाहिजे. हे सर्व लोकांचे सहकार्य, त्यांच्या वर्तणुकीला मिळालेली दाद आणि लोकांचा आदर, आत्मविश्वास यावर अवलंबून आहे.

८. पोलिसांच्या मनामध्ये नेहमी लोकांचे कल्याण असले पाहिजे आणि त्याप्रमाणे सहानुभूतीचा विचार ठेवला पाहिजे. त्यांनी पैसा आणि सामाजिक प्रतिष्ठा यांना महत्त्व न देता सर्वांना वैयक्तिक सेवा आणि मैत्रीपूर्वक संबंध जोपासले पाहिजेत.

९. पोलिसांनी कर्तव्याला प्राथमिकता दिली पाहिजे. तसेच भीती, थट्टा, तिरस्कार या समोर शांत राहिले पाहिजे आणि दुसऱ्यांच्या संरक्षणासाठी स्वत:चे बलिदान देण्यास तयार असले पाहिजे.

१०. पोलिसांनी नेहमीच आदरभावी आणि चांगल्या शिष्टाचाराचे असले पाहिजे. ते विश्वास ठेवण्याजोगे नि:पक्षपाती असले पाहिजेत, ते धीट तसेच त्यांचे चारित्र्य संवर्धन करणारे आणि लोकांच्या विश्वासास पात्र असले पाहिजेत.

११. प्रामाणिकपणा हा पोलिसांच्या प्रतिष्ठेचा सर्वात मोठा मूलभूत घटक आहे. या मान्यतेने पोलीस त्यांच्या खासगी जीवनात स्वविवेकी, स्वच्छ, आत्मसंयमी असले पाहिजेत. तसेच खासगी जीवनात आणि अधिकार पदावर विश्वासपात्र आणि प्रामाणिक विचाराचे असावेत.

१२. पोलिसांनी मानले पाहिजे की, त्यांची राज्याप्रती उपयुक्ततेची खात्री ही–उच्च दर्जाच्या शिस्तबद्धतेचे पालन प्रमाणिकपणे कायद्यानुसार केलेले कर्तव्य आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांची बजावणी आणि बलासोबतची निष्ठा तसेच स्वत:ला नेहमी प्रशिक्षित आणि तयारीत ठेवल्यास होईल.

१३. धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही राज्याचा सभासद म्हणून पोलिसांनी खासगी कुलुषित मन, पूर्वग्रहदूषित वृत्तींपासून निरंतर झगडले पाहिजे आणि भारतातील सर्व लोकांमध्ये बंधुभाव, ऐक्याच्या उन्नतीसाठी महत्त्व दिले पाहिजे. तसेच धार्मिक, भाषिक किंवा सांघिक विवादापलीकडे असले पाहिजे.

●●●